१८५६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १०६५३



REFBK-0010904

# पुढे पाऊल

लेखक

श्रीपाद वामन काळे

संपादक, "अर्थ", पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थानक मार्ग)

१९५६

REFBK-0010904

दोन रुपये

: प्रकाशक :
श्री. वा. काळे
दुर्गाधिवास,
पुणें ४.

" पुढे पाऊल " च्या लेखकाची कृति

**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृ. सं. १६८. किंमत २॥ रु.

| | | |
|---|---|---|
| १ ली मराठी आवृत्ति | ... | ऑक्टोबर, १९५३ |
| २ री मराठी आवृत्ति | ... | जुलै, १९५४ |

**સુખી જીવનની પગદંડી**

| | | |
|---|---|---|
| १ ली गुजराती आवृत्ति | ... | फेब्रुवारी, १९५५ |
| २ री गुजराती आवृत्ति | ... | नोव्हेंबर, १९५५ |

: मुद्रक :
के. ग. शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय,
पुणें ४.

निर्व्याज चारित्र्याचा
आदर्श

**कै. अण्णा**

( ग. वा. दे. )

ह्यांस समर्पण.

# प्रास्ताविक

प्रस्तुत लेखकाचें "कण आणि क्षण" हें पुस्तक सुमारें तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालें. महाराष्ट्रांतील रसज्ञ वाचकांनी त्याचें अपूर्व स्वागत आणि कौतुक केलें, इतकेंच नव्हे तर सुप्रसिद्ध गुजराती साहित्यिक, प्रा. शशिन ओझा ह्यांनी त्याच्या सुंदर गुजराती अनुवादाच्या द्वारा "महाराष्ट्रांतील सामाजिक जीवन, विशेषतः स्त्रियांचें जीवन, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्ट्या किती प्रगतिशील आहे" हें गुजराती वाचकांना दाखवून दिलें. मराठी आणि गुजराती पुस्तकाच्या मिळून दोन वर्षांत चार आवृत्त्या निघाल्या. हिंदी अनुवादहि आतां तयार होत असून, त्याच्या प्रकाशनाची सिद्धता झाली आहे. लेखकाचें प्रस्तुत प्रकाशन, "पुढे पाऊल" असेंच लोकप्रिय होईल, अशी आशा आहे.

"कण आणि क्षण" मध्ये मुख्यतः आजकालच्या घरगुती प्रश्नांची चर्चा करण्यांत आली होती, तर प्रस्तुत पुस्तकांत अधिक व्यापक समस्यांचा विचार प्रामुख्याने करण्यांत आलेला आहे. तरुण पिढी बिघडल्याची जाता–येता जी हाकाटी करण्यांत येते, तिचें वास्तव स्वरूप ह्या संग्रहांतील पहिल्या लेखांत स्पष्ट करून उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. दैनंदिन गृहजीवन सुव्यवस्थित व सुखी करून न थांबतां, व्यापक जीवनांतील समस्याहि जाणतेपणाने, जबाबदारीच्या भावनेने आणि आपआपल्या कुवतीप्रमाणे सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे; दोन्ही गोष्टी एकमेकाला पूरक आणि परस्परावलंबी अशाच आहेत. व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या विरोधीहि गरजांचा व हितसंबंधांचा मेळ कसा घालता येईल, हें दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. लेखकाने येथे चर्चिलेल्या प्रश्नांचें स्पष्टीकरण आणि त्यापासूनचा बोध सापेक्ष असणार, हें उघड आहे. पण हें सर्व विवेचन या ठिकाणीं केवळ नमुन्यादाखल दिलेलें असून, दैनंदिन व्यवहारांतील विविध प्रसंगांचे वेळीं त्याची आठवण ठेविली जावी एवढीच लेखकाची अपेक्षा आहे.

ज्या लेखांचे द्वारा लेखकाने आजवर ह्या दृष्टीने आपले विचार व्यक्त केले, त्यांतील कांहीं लेख येथे सुसंगत रीतीने सादर करण्यांत आले आहेत. ते उद्धृत करण्यास किर्लोस्कर, स्त्री, उद्यम, केसरी, सह्याद्रि व ज्ञानेश्वर ह्या मासिकांच्या संपादकांनी मोठ्या आनंदाने संमति दिली आहे.

लेखकाचे सहविचारी व कल्पक मित्र, डॉ. मो. वा. चिपळूणकर, पुणें विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचे प्रमुख, ह्यांनी "कण आणि क्षण" प्रमाणे ह्या वेळींहि आपण होऊन पुस्तकाचें नांव सुचविलें असून मुखपृष्ठावरील समर्पक चित्राची योजनाहि त्यांचीच आहे. लेखकाचे चित्रकार-मित्र, श्री. अनंत गोखले, ह्यांनी आत्मीयतेने ही योजना प्रत्यक्षांत उतरविली आहे.

आर्यभूषण मुद्रणालयाच्या चालकांनी त्यांच्या लौकिकाप्रमाणे आपुलकीने आणि तत्परतेने छपाईचें काम केलें आहे, आणि मजकुराच्या शुद्धतेच्या बाबतींत श्री. य. ए. धायगुडे ह्यांचें बहुमोल साहाय्य झालें आहे.

ह्या सर्व साहाय्यकांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

२ आक्टोबर, १९५६ श्री. वा. काळे

"कण आणि क्षण" चा

## —हिंदी अनुवाद—

**श्री. पं. मु. डांगरे,** *बी. ए., बी. टी., रा. भा. कोविद,* संचालक, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति, पुणें, ह्यांनी केलेला हा अनुवाद प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी | ... १ |
| २ | कर्तव्य करणाऱ्याला पाठीराखा पाहिजे | ... १४ |
| ३ | रोजच्या जीवनांतील परस्परावलंबन | ... १६ |
| ४ | प्रत्येक शब्दाला अर्थ असतो | ... २१ |
| ५ | आधी स्वतः आरशांत पाहा ! | ... २६ |
| ६ | चांगले आणि वाईट शेजारी | ... ३३ |
| ७ | खरी आणि खोटी काटकसर | ... ४० |
| ८ | हेकट म्हातारे आणि कडवट तरुण | ... ५१ |
| ९ | संसारांतील सारंगी | ... ५४ |
| १० | कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप | ... ६३ |
| ११ | वरसंशोधनाची आर्थिक मीमांसा | ... ७४ |
| १२ | तुम्ही अधिक चांगला पति होऊं शकता ! | ... ८२ |
| १३ | पाहुण्यांनो, यजमानाचा चष्मा लावा ! | ... ८९ |
| १४ | बॅडमिंटन कोर्टावरील शिष्टाचार | ...१०१ |
| १५ | बॉब केसांच्या हौसेचें मोल ! | ...११० |
| १६ | मिश्रजीवनांतील खाचखळगे | ...११९ |

# समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी

कायदा किंवा नियम मोडून आर्थिक लाभच झाला पाहिजे किंवा पैसा वांचला पाहिजे असाच लोकांचा कटाक्ष असतो, असें नाही. आपली थोडी सोय झाली किंवा त्रास टळला तरी ते वाममार्गाचा अवलंब करण्यास तयार असतात. सायकलीवर डबलसीट किंवा बिगरबत्ती जाणें हें या सदरांत मोडतें. परदेशांत कित्येक वर्षें राहून आलेले सुशिक्षित लोकहि एकदोन फर्लांग चाल टाळण्यासाठी पोलीस आजूबाजूस नाही असें पाहून रहदारीचे हे प्राथमिक नियम मोडतात; मग तरुण पोरांनी थोडी दडपेगिरी केली तर त्याचें आश्चर्य वाटत नाही. भ्रष्टाचारांचा प्रारंभ निरुपद्रवी दिसणाऱ्या अशा लहानसहान गोष्टींतून होतो आणि नदीच्या प्रवाहाप्रमाणे ते वाढत जातात आणि अनावर होतात. सुरुवातीला त्यांचे दुष्परिणाम लक्षांत येत नाहीत; म्हणूनच ते दृढमूल होतात आणि अपायकारक ठरतात.

परवा बसमध्ये घडलेली ही गोष्ट आहे. अशा गोष्टी नेहमीच होतात; पण मीं पाहिली ती सांगतों. रामभाऊ ग्रामोद्योग प्रदर्शन पाहून बसने परत घरीं येत होते. त्यांच्याबरोबर त्यांचीं तीन मुलेंहि होतीं. त्यांपैकी एक मुलगा कॉलेजांत शिकणारा होता. बस-कंडक्टरने मुलांचीं तीन अर्धीं व रामभाऊंचें सबंध अशीं तिकिटें फाडलीं व रामभाऊंनी दिलेल्या रुपयाच्या नोटेंतील बाकीचे पैसे त्यांना परत दिले. रामभाऊंनी व त्यांच्या शेजारीं बसलेल्या त्यांच्या कॉलेजकुमारानेहि कंडक्टरच्या चुकीकडे दुर्लक्ष केलें. आपण होऊन खोटें वय सांगून त्यांनी कंडक्टरला कुठे फसविलें होतें ?

भाजीवाल्याने तागडीने भाजी तोलून देतांना भाजीच्या पारड्यांत त्याचीं छटाक व अदपाव हीं वजनें नकळत राहिलीं व गवारीच्या

शेंगांबरोबर तीं गोपाळरावांच्या पिशवींत आलीं. चार आणे शेर ह्या भावांत त्यांना हीं वजनें मिळालीं ! रद्दीवाला वजनांत फसवतो, म्हणून ह्या वजनांचा उपयोग करूनच गोपाळराव आपल्या घरची रद्दी दर महिन्याला विकीत असतात !

"दादा, दादा, हें पाहा कोरं तिकीट ! माईचं पत्र आलं आहे; पण त्यावरच्या तिकिटावर छापच नाही !" असें म्हणत चंदू पाकीट घेऊन दादांच्याकडे धावत गेला.

"बघूं बघूं !" असें म्हणत दादांनी आपल्या हातांत पाकीट घेतलें व तिकीट नीट तपासून पाहून ते म्हणाले, "चंदू, थांब. आपल्याला माईला उत्तर धाडायचं आहे ना; त्या पाकिटाला लावायला आयतं तिकीट मिळालं !"

"मी काढणार तिकीट !" असें म्हणत चंदूने दादांच्या हातांतून पाकीट ओढून घेतलें व त्यावरील तिकीट तो हळूहळू सोडवूं लागला.

"चंदू, अशानं तिकीट फाटेल ना !" असें रागाने ओरडून दादांनी चंदूच्या हातांतून पाकीट हिसकावून घेतलें व त्याच्या थोबाडींत लगावली. "उषा, ए उषा !" अशा हाका मारून त्यांनी चंदूच्या धाकट्या बहिणीस बोलावलें व तिला एका वाटींत पाणी आणण्यास सांगितलें. नंतर दादांनी त्या पाकिटाचा तिकीट असलेला कोपरा फाडून तो अलगत पाण्यावर तरंगत ठेवला. अर्ध्याच मिनिटांत तिकिटाचा खालचा कागद भिजून तिकीट त्यापासून मोकळें झालें. दादांनी तें नीट पुसलें व पानिपत जिंकल्याच्या मुद्रेने ते चंदूला हाका मारूं लागले.

धाकटी उषा हें सर्व कुतूहलपूर्वक पाहात होती. तिने विचारलें, "काय हो दादा, हें कसलें तिकीट आहे ?"

त्यावर ते उत्तरले, "बघ, मीं आत्ता दोन आणे मिळविले. चंद्यानं तें तिकीट फाडून टाकलं असतं व दोन आणे बुडवले असते ! माईच्या पत्रावरचं तिकीट बिनछापाचं होतं. कुठं छाप पडलेला नाही !"

"पण दादा, तें तिकीट पुन्हा लावतां येईल का?" उषानें प्रश्न केला.

"कां नाही लावतां येणार? पोस्टखात्यानं छाप मारला नाही, ही त्याची चूक! आपल्याला काय, कोरं तिकीट आयतं मिळालं!"

"पण पोस्टखात्याला जर कळलं, की हें तिकीट जुनंच आहे, तर मग? समजा, माईंना पत्र पाठवलं त्यावरच्या ह्या तिकिटावरहि छाप उठला नाही, तर तें तिकीट माईंना आणखी पुन्हा लावतां येईल का?"

"अर्थात्! जोपर्यंत तिकीट कोरं आहे, तोपर्यंत कुणाची आहे भीति?"

सरस्वतीबाई हा संवाद आंतून ऐकत होत्या. त्यांना दादांचा हा युक्तिवाद कांही पटला नाही. त्या म्हणाल्या, "वापरलेलं पोस्टाचं तिकीट पुन्हा लावणं म्हणजे रेल्वेचं न फाडलेलं तिकीट पुन्हा वापरण्यासारखं नाही का? माईंनी त्यांच्या पाकिटावर तिकीट लावलं तेव्हा त्यांचा उद्देश तें पाकीट नागपुराहून पुण्याला पोचावं, हा होता. त्यासाठी त्यांनी पोस्टाला दोन आणे भरले. आता पुन्हा तेंच तिकीट आपण वापरणं म्हणजे पोस्टाच्या चुकीचा गैरफायदा घेणं नव्हे काय? ह्याचा अर्थ, एक प्रकारें चोरी करणंच नव्हे काय?"

जुन्या तिकिटाचा अशा रीतीनें बेमालूमपणें पुन्हा उपयोग करूं पाहणारे कितीतरी लोक आढळतात. अर्थात् हें खरें आहे, की दोन आणे वांचविण्याच्या इच्छेप्रमाणेच ते दोन आणे युक्तीनें मिळविले ह्या आनंदाचा वांटाहि ह्या कृत्यांत असतो! पण त्या आनंदामुळे एकंदर व्यवहाराचें दूषण नाहीसें होत नाही.

आपण नेहमी वाचतों व ऐकतों, की कित्येक कंत्राटदार व सरकारी संबंधित अधिकारी असे दोघे मिळून सरकारला लुबाडतात. कंत्राटदार तेंच फर्निचर दोनदा दिल्याचें दाखवितो, सरकारी अधिकारी पावती

देतो आणि त्याबद्दल कंत्राटदाराला दुप्पट पैसे मिळतात. त्यांत हा अधिकारी साहजिकच वांटा घेतो. आता, तेंच तिकीट पुन्हा वापरणारा मनुष्य आणि हा कंत्राटदार ह्यांत वास्तविक फरक काय? दोन आण्यांत त्याचा कोणी भागीदार नसतो, एवढाच ना ?

हीहि पण अशीच घडलेली गोष्ट आहे. क्रिकेटचा प्रेक्षणीय सामना होता. एम्. सी. सी. विरुद्ध महाराष्ट्र, असा तो बहुधा असावा. दोन दिवसांचा हा खेळ पाहण्यासाठी आठ रुपयांचें तिकीट होतें. प्रेक्षकांसाठी मोठा मांडव उभारला होता. त्यांत मला आमच्या बाळासाहेबांच्या बरोबर त्यांचा विजयहि सामना पाहावयास आलेला आढळला. बाळासाहेबांनी विजयला पैसे खर्चून कसें काय आणलें, ह्याचें मला आश्चर्य वाटून मीं विजयला विचारलें, “काय, आज चैन आहेना अगदी ?”

त्याने उत्तर देण्याच्या आंतच बाळासाहेब म्हणाले, “विजयची ऐट विचारूं नका, आणि तीहि फुकट बरं का ! मीं आठ रुपयांचें एक तिकीट मागितलं, तेव्हा तें देणाऱ्या कारकुनानं मला चुकून दोन तिकिटं फाडून दिलीं. एकदा मनांत विचार आला, की दुसरं तिकीट परत करावं. पण म्हटलं, मीं कांही आपण होऊन दोन तिकिटं फाडून घेतलेलीं नाहीत. त्यानं मला अगदी स्वतःच्या हातानं दिलीं. मग काय, विजयलाहि सामना दाखवावा म्हटलं. तो दुसऱ्या तिकिटावर यायला जरा भीतच होता. मीं म्हटलं, अरे त्यांत काय आहे ? तूं हें पहिलं तिकीट घे आणि चुकीनं मिळालेलं दुसरं तिकीट मला दे, मग तर हरकत नाहीं ना !”

तिकीट विकणाऱ्या कारकुनाला आठ रुपये भुरदंड बसला असेल बिचाऱ्याला; पण त्याबद्दल क्षिति न बाळगतां, मुलाला सामना पाहावयास नेणाऱ्या बाळासाहेबांच्या क्रीडाप्रेमाचें आणि पुत्रप्रेमाचें कौतुक करणें मला तरी शक्य झालें नाही.

आमच्या एका शेजारीणबाईच्याकडे उदबत्त्यांच्या कारखान्यांत

काम करणारी एक बाई उदबत्त्या आणून देते; त्या अर्थातच स्वस्त पडतात. चोरीच्या ह्या मालाचा पूजेसाठी उपयोग केला जातो! ही कामगार बाई कांही उदबत्त्या आणते व सांगते, की त्या अद्‌पाव आहेत. आमच्या शेजारीणबाई त्या उदबत्त्या घरांत घेऊन जातात, त्यांतील मूठभर बाजूला काढून ठेवून बाकीच्या उदबत्त्या बाहेर आणतात आणि त्याचे दोन समान वाटे करून त्यांपैकी एक वाटा परत करतात. "आज छटाकच पुरेत" असें सांगून त्याचे पैसे त्या देऊन टाकतात! हा प्रकार कित्येक वर्षे चालू आहे.

रेल्वे-नोकरांच्या पासावर काशी-रामेश्वराच्या तीर्थयात्रा करणारे कितीतरी भाविक स्त्री-पुरुष जरुरीप्रमाणे वेगवेगळीं नातीं धारण करीत असतात. त्यांना यात्रा केल्याचें पुण्य मिळालें तरी त्यांचें वर्तन समाजहितास मारक असतें, हें त्यांच्या लक्षांत येत नाही.

पोस्टमास्तरांच्या घरीं मुलांना तारेचे कोरे फॉर्म गणितें सोडविण्यासाठी दिले जातात. दळणासाठी पोस्टाच्या कापडी पिशव्या वापरल्या जातात. कॉलेजांतील ग्रंथालयामधील पुस्तकें स्वतःच्या नांवावर घेऊन प्राध्यापक आपल्या नातेवाइकांची सोय पाहात असतात; इतर शेकडो विद्यार्थ्यांची मग गैरसोय होईना का!

परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासावयास आल्या म्हणजे त्यांतील कोरीं पानें फाडून घेणारे एक परीक्षक मला माहीत आहेत. दुसऱ्याची छत्री विसरून आपल्या घरीं राहिली व ती छत्री कोणाची आहे हें माहीत असलें तरी आपण होऊन परत न देणारे कितीतरी आढळतात! परत मागायला मालक आलाच तर "कुणाची छत्री आहे हें कांही लक्षांत येईना!" अशी थाप तयार असतेच. जवळच्या बिऱ्हाडकरूने बाहेर जातांना त्याचें दूध घेऊन ठेवावयास सांगितलें, तर त्यांतील अर्धी वाटी दूध काढून घेऊन त्याऐवजी पाणी घालणाऱ्या स्त्रियांचा शेजार कित्येकांच्या परिचयाचा असेल.

एका पुढाऱ्याच्या घरीं विवाहसमारंभ झाला, तेव्हा पानसुपारीला बरीच गर्दी लोटली होती. पादत्राणें अस्ताव्यस्त पसरलीं होतीं व ज्याचीं त्यास पादत्राणें मिळणें कठीण झालें. आमच्या बंडोपंतांनी खुशाल दुसऱ्याच्या पठाणी वहाणा पायाला आवळल्या व मुलीलाहि चांगल्यापैकी सँडल्स शोधून दिल्या. विवाहाच्या वेळच्या गर्दीवर टीका करतांना बंडोपंत अजूनहि त्यांच्या पठाणी वाहणा कौतुकाने इतरांना दाखवीत असतात! त्यांच्या मुलांमुलींना ते चांगलीं पादत्राणें कशाला विकत घेऊन देतील?

शाळेंतील मुलांमुलींना सहलीस नेण्यांत येतें. त्यावेळीं कित्येक सहलप्रमुख शिक्षक-शिक्षिका बरोबर चाळीस मुलें असलीं तरी दडपून तीसबत्तीस मुलांचींच तिकिटें काढतात व रेल्वेखात्याला उघडपणें लुबाडतात! अर्थात् ही 'काटकसर' मुलांच्यापर्यंत पोंचतेच, असें नाही. आणि समजा जरी ती पोंचली, तरी शैक्षणिक दृष्ट्या ती किती हानिकारक ठरेल ह्याचा कोणी विचारच करीत नाही! रेल्वेखात्याने सरकारकडे ह्याबाबत तक्रार केली आहे व सरकारच्या शिक्षणखात्याने आता शाळांच्या चालकांना समज दिली आहे, असें समजतें.

विद्यापीठांच्या सभांना जाणारे कांहीं प्राध्यापक दुसऱ्या वर्गाच्या तीन तिकिटांचे पुरे पैसे घेऊन, तिसऱ्या वर्गाने जाग्रण करून प्रवास करतात व भत्ता मिळण्यास आवश्यक त्या सहीसाठी सभेंत जरासें तोंड दाखवून, पण तें न उघडतांच, भत्त्याची रक्कम घेऊन पोबारा करतात, असें ऐकतों. त्यांचें वर्तन तरी कितपत अनुकरणीय ठरतें?

कांहीं सरकारी अधिकारी फिरतीवर गेले म्हणजे तेथील सर्व खर्च तर बाहेर काढतातच; पण त्याबरोबर तेथे बऱ्याचशा जिनसा जमा करून घरीं घेऊन येतात. रोजच्या संसाराच्या गरजाच नव्हे, तर चैनहि ते फुकट भागवीत असतात. वरिष्ठ अधिकाऱ्याचा 'बंदोबस्त' त्याचा कनिष्ठ अधिकारी करतो; पण तो स्वतःच्या खिशांतून थोडाच खर्च करणार?

त्याने दुसऱ्या कोणास तरी लुबाडल्याखेरीज त्याचें कसें भागणार? आणि शेवटीं जो लुबाडला जाईल, तो तरी त्याची भरपाई वाममार्गाने केल्याखेरीज कसा राहील? अशा रीतीने हें लोण वरती सुरू होऊन खालपर्यंत पोचतें. ह्या साखळींतील प्रत्येक दुवा नाइलाजाने कांही गोष्टी करूं लागतो व पुढे तशी त्याला सवयहि जडते! वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याच्या पत्नीस ह्या कामगिरींत महत्त्वाची भूमिका असते; अधिकारी पति तिला विचारतो, "सर्व कांही झालं आहे ना?" आणि मगच तो सही करतो व मंजुरी देतो, असें सांगतात.

कित्येक सरकारी व बिनसरकारी नोकरांच्या घरांत त्यांच्या प्राप्तीच्या मानाने कितीतरी भरमसाट चैन चाललेली दिसते. भारी किंमतीचा रेडिओग्राम, विजेचे पंखे, उत्कृष्ट फर्निचर, मौल्यवान् पेलेबशा, चांदीचीं भांडीं, इत्यादि पाहून आश्चर्य वाटतें. त्यांच्याकडील विजेचे दिवे नेहमीच मोठ्या झगझगीत उजेडाचे असावयाचे. केव्हाहि जा, त्यांच्याकडे सरबताच्या बाटल्या व बिस्किटांचे पुडे तयार! परटा-कडून धुऊन आलेल्या त्यांच्या कपड्यांची कोचावर पडलेली प्रचंड चवड पहिली व ती बाजूला करून बसण्याची पाळी आली म्हणजे आपण अत्यंत क्षुद्र दिसतों. त्यांनी आपल्या न्याय्य प्राप्तींत ह्या सर्व खर्चाच्या चतुर्थांश तरी खर्च बसवून दाखवावा, असें त्यांना आव्हान द्यावेसेंहि वाटतें. त्यांच्या इतक्याच प्राप्तीच्या शाळामास्तरला बसने जाणें परवडत नाही; पण हे लोक टॅक्सींतून फटाके आणावयास जाऊं शकतात. त्यांच्या घरचा गणपति पांच–पांच रुपयांचा असतो व त्याला दररोज पेढे–बर्फीची खिरापत लागते!

आमच्या शेजारच्या एका घरीं कुठल्यातरी खात्याच्या इन्स्पेक्टरांच्या दोघां मुलांच्या मुंजी झाल्या. दोन मुंजी एकदम उरकल्या म्हणजे काटकसर वास्तविक व्हावयाची. पण ह्या मेजवानीच्या वेळीं बाळयाच्या आवडीचा मोतीचूर व विलासच्या आवडीची बासुंदीपुरी, अशीं दोन

मिष्टान्नें केलीं होतीं; प्रत्येक मुलाच्या मुंजीचा एक, असे दोन-दोन नारळ वाटण्यांत आले ! मुंजा मुलांच्या परिचयाची उधळपट्टीची राहणी व त्या राहणीच्या अपकृत्यांचा पाया ह्यांचा परिणाम त्यांच्यावर त्या व्रतबंधविधीं-तील गुरूपदेशापेक्षा केव्हाहि अधिकच होणार,हें काय सांगावयास पाहिजे?

अशा तऱ्हेने वागणारे आई-बाप, काका-मामा असल्यावर मुलांनी व तरुणांनी त्यांचें अनुकरण कळत-नकळत न केलें तरच नवल! ते परीक्षेच्या वेळीं उत्तरपत्रिका लिहितांना शेजारच्या उमेदवाराचा कागद कां नाही हिसकावून घेणार? ग्रंथालयांतील पुस्तकें कां नाही पळवणार? त्यांतील पानें कां नाही फाडणार? हातीं आलेल्या पैशाचा अपहार कां नाही करणार? रहदारीचे नियम कां नाही मोडणार? वसतिगृहांतील आपल्या खोलीमध्ये दिवा कां नाही निष्कारण जळत ठेवणार? इतर विद्यार्थ्यांच्या जिनसा कां नाही चोरणार?

अशा मुलांनी सामाजिक शिष्टाचार कां पाळावे? देशप्रेम कां बाळगावें? स्वदेशाचें व्रत कां अंगीकारावें? दोन-चार आण्यांच्या स्वार्थासाठी जे लोक आचारभ्रष्ट होतात, त्यांनी नव्या पिढीवर ताशेरे झाडावे व तिच्याकडून भरमसाट अपेक्षा बाळगाव्या हें कसें चालणार?

ज्याला सवय जडलेल्या उंची राहणीच्या मानाने अत्यल्प पगार मिळतो व ज्याची आर्थिक परिस्थितीमुळे कुचंबणा होते, असाहि तरुण अर्धपोटीं राहून, स्वार्थत्याग करून, देशाकरिता व समाजाकरिता अविरत कष्ट करण्यास तयार होईल; त्याचा पिंड देशभक्तीचा व सदाचाराचा असतो; पण त्याच्यापुढील आदर्श मात्र त्याला भलतीकडेच घेऊन जातो! समाजविघातक कृत्यें करणारांची चलती चाललेली तो पाहतो. घराघरांतून तात्कालिक फायद्यासाठी व्यापक हिताचा बळी पडत असलेला त्याला दिसतो, मोठमोठ्या सरकारी खात्यांतील उधळपट्टीचीं व पैशाच्या अपहारांचीं वर्णनें तो ऐकतो आणि सरळ वृत्तीच्या माणसाची कशी कुचंबणा होते ह्याचाहि कटु अनुभव त्याला येतो!

अशा परिस्थितींत तरुण पिढीस दोष देऊन केवळ भागणार नाही. त्याच्या आधीच्या पिढीलाच चटके देऊन सामाजिक कर्तव्यांची इष्टता सर्वांना पटवून दिली पाहिजे. हें कार्य सामोपचाराने झालें तर ठीकच; नाहीतर अधिक कडक उपाययोजना आवश्यक होईल. पण त्या बाबतींत दिरंगाई झाली तर वेळींच औषधयोजना न केलेल्या दुखण्याप्रमाणे तरुण पिढीला जडूं लागणारा हा रोग बळावत जाण्याची भीति वाटते आणि त्याच्या पुढील दुष्परिणामांची कल्पनाहि असह्य होते.

व्यक्तिगत व तेंहि तात्कालिक हित व्यापक हितापेक्षा प्रिय मानण्याची प्रवृत्ति रुजून तिने खोलवर मूळ धरलें, तर इतिहासाची पुनरावृत्ति होऊन लोभी लोकांच्या हातीं राष्ट्राचीं सूत्रें जातील व त्याचा फायदा मतलबी शत्रुराष्ट्रें घेतल्याविना राहणार नाहीत! कस लागण्याचा प्रसंग अद्याप आला नाही, म्हणून आपण बाह्य देखाव्यावर खूष राहून पाया व जोतें ह्यांच्या भक्कमपणाकडे दुर्लक्ष केलें व गैरसावध राहिलों, तर नाश अटळ आहे!

सुदैवाने, वंशांचा व समाजाचा ऱ्हास अशा रीतीने होऊं नये ह्याची निसर्गानेच तरतूद केलेली आहे; आपण तिचा फायदा करून घेतला पाहिजे.

प्राणिमात्रांचे गुणदोष कांही अंशीं आनुवंशिक असतात, तर कांही अंशीं ते आजूबाजूच्या वातावरणामुळे निर्माण झालेले असतात. मूळ पिंड समान असला तरी वेगवेगळ्या वातावरणाचा त्यावर जसा परिणाम होईल त्याप्रमाणे त्याचे गुणदोष बदलूं शकतात.

कांही आनुवंशिक गुणदोष वातावरणास न जुमानतां पिंडापिंडांतून वाहात राहतात, तर कांही आनुवंशिक गुणदोष अनुकूल किंवा प्रतिकूल वातावरण लाभेल त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रकाराने प्रकट होतात. गेल्या पिढ्यांमध्ये आजूबाजूच्या वातावरणाला दाद न देणारे जे बळकट गुणदोष असतील, ते नव्या पिढीमध्येहि उमटणार हें साहजिकच आहे.

नव्या पिढींत जो कांही बदल होईल तो वातावरणास बळी पडणाऱ्या कमकुवत आनुवंशिक गुणदोषांमुळेच होणार आणि वातावरणाच्या परिणामामुळे निर्माण झालेल्या उपऱ्यांची त्यांत भर पडणार.

नवी पिढी बेजबाबदार, बेशिस्त, लटपटीत, ढिली अशी झाली असेल तर त्याला ती स्वतःच फक्त कितपत कारणीभूत असणार असा प्रश्न येथे निर्माण होतो. नव्या पिढीमधील दोषांस आनुवंशिकतेचा कांही भाग कारण आहे असें मानलें तर त्याचा दोष त्या प्रमाणांत मागील पिढ्यांवर जाईल! पण निर्णायक कारण बदललेली परिस्थिति, बिघडलेलें वातावरण हेंच असणार. वातावरण बनत जातें, त्यास अनेक कारणें असतात आणि तीं जागतिक स्वरूपाचीं, सर्वांच्या आवाक्याबाहेरचींहि असूं शकतात.

तेव्हा, वातावरण व परिस्थिति बदलली तर त्याबद्दल एखाद्या पिढीलाच किंवा गटाला जबाबदार धरणें न्यायाचें होणार नाही. जबाबदारी टाकावयाची ठरविलेंच व त्याची वाटणी केली, तर ज्या वातावरणांत नवी पिढी उदयास येत आहे, त्या वातावरणास नव्या पिढीपेक्षा आधीचे लोकच जास्त जबाबदार धरले पाहिजेत! त्यांनी वातावरण बिघडण्यास नकळत हातभार लावलेला असो, वा बिघाड होऊं न देणें त्यांना प्रयत्न करूनहि साधलेलें नसो. नवी पिढी सुधारावयाची असेल, तर हें वातावरण आधी सुधारलें पाहिजे व तें काम अधिक अनुभवी अशा आजच्या कर्त्या पिढीचेंच आहे हें उघड आहे.

वंशांचा अधःपात होत आहे, त्यांचे गुण नाहीसे होत चालले आहेत आणि त्यामुळे आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा ऱ्हास होत आहे अशी समजूत फैलावत चालली आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा तऱ्हेने संकटयुक्त परिणाम सत्वर घडून येऊं शकतो, ह्या कल्पनेसच फारसा शास्त्रीय आधार सापडणार नाही. कुटुंबें आणि राष्ट्रें नाश पावतात त्याचें मुख्य कारण ज्या परिस्थितींत मुलांची वाढ होते व

29130 निबंध 2053 30/1.71

प्रौढ लोक राहतात ती परिस्थिति प्रतिकूल झालेली असते हेंच आढळतें. आनुवंशिकतेमुळे पुढील पिढीचा अपकर्ष इतका झपाट्याने क्वचितच झालेला असतो. अधःपात झाल्यासारखें वाटलें तरी त्यांत भिण्याजोगें कांही नाही; उत्कर्षाच्या तीव्र तळमळीमुळे असा ग्रह होतो असेंच मानून चालणें योग्य नाही काय?

प्रत्येक पिढी कांही विशिष्ट वातावरणांत वाढत असते; आजच्यासारखेंच वातावरण मागच्या पिढ्यांच्या वाढीच्या काळांत त्यांच्या वाट्यास आलें असतें तरी त्यांची कृति बदलली नसती, असें कोण सांगू शकणार?

क्रिकेटच्या सामन्याचें उदाहरण देणें येथे सोईचें होईल. विजय व अर्जुन हे दोघेहि एकाच जिमखान्यावर तयार झालेले पट्टीचे फलंदाज होते. एका कसोटीच्या सामन्यांत त्यांच्या संघनायकाने ओली–सुकी जिंकून फलंदाजी पत्करली. कारण, हिरवळ धावा काढणारांना अनकूल होती. विजयने धावांचें शतक पुरें केल्यावर कांही वेळाने पाऊस पडला आणि त्यामुळे हिरवळीची अनुकूलता नष्ट होऊन ती फलंदाजांना धोकेबाज झाली. अशा वेळीं अर्जुन क्रीडांगणांत उतरला व तो गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूच्या अनिच्छित, फसव्या गतीस बळी पडला! आता विजयने अर्जुनला लवकर बाद होण्याबद्दल दोष देणें कितपत युक्त ठरेल? अर्जुन आधी खेळावयास गेला असता तर सुक्या हिरवळीवर त्यानेहि शतक काढलें नसतें कशावरून? दुसऱ्या डावांत पावसाळी हवेंत विजयला फलंदाजी करण्याची पाळी आली तेव्हा तो आपल्या संघाच्या धावांत भर न घालतांच परत आला की नाही? एकाच दर्जाच्या खेळाडूंचा वेगवेगळ्या वातावरणांत कसा वेगवेगळ्या प्रतीचा खेळ होतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे खेळाची चर्चा करतांना क्रिकेट–तज्ज्ञ साधकबाधक विचार कां करतात, त्याचें मर्म लक्षांत येईल. खेळाडूंच्या पराक्रमाचें मूल्यमापन सर्व गोष्टी विचारांत घेऊनच करावयाचें असतें.

नव्या पिढींत पूर्वीच्या पिढ्यांचे सत्प्रवृत्तीचे अंश कायमच आहेत; ते कदाचित् सुप्त असतील; प्रतिकूल वातावरण निवळण्याचाच काय तो अवकाश आहे. पण त्यासाठी वाट पाहात बसावयाचें, का तें प्रयत्न-पूर्वक, योजनापूर्वक बदलून टाकून शुद्ध केलेल्या वातावरणांत नव्या पिढीस वाढवावयाचें, हें जाणत्या नेत्यांनी वेळींच ठरविलें पाहिजे. तें त्यांनी केलें नाही, तरी आनुवंशिकता शास्त्राप्रमाणे नव्या पिढींतहि कांही मोजक्या व्यक्ती इतरांपेक्षा कणखर, प्रबळ, दमदार, बहुगुणी, अशा निश्चित निघतील आणि नेतृत्व पत्करून, कडक उपायांनी वातावरण बदलून टाकून त्याचे दुष्परिणामहि नाहीसे करतील; इतकेंच नव्हे, तर नवे गुण 'इंजेक्ट' करून सुधारणा घडवून आणतील! त्याबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाही. पण त्यासाठीं किती वाट पाहावी लागेल हें कोण सांगणार? आणि तोपर्यंत जुनी पिढी नव्यांना नुसते दोषच देत बसणार काय?

समाजाच्या ऱ्हासास अटकाव करण्याचा स्वतः कांहीहि प्रयत्न न करतां त्या ऱ्हासाची केवळ हाकाटी करीत राहण्याने कांहीच साधणार नाही. ज्याने त्याने आपल्या मर्यादित क्षेत्रांत इष्ट ते प्रयत्न नेटाने चालविले पाहिजेत हें काय सांगावयास पाहिजे? वैयक्तिक बाबीपुरता जो तो स्वतंत्र आहे ना? स्वतःच्या कुटुंबांत तरी सुधारणेचे प्रयोग करण्यास भरपूर वाव मिळेल ना? अधिकाराच्या जागांवरील लोकांनी आपल्या अधिकाराचा वाजवी रीतीने उपयोग केला तरी कितीतरी साधेल!

जनमत निर्माण करण्याची व त्यास वळण लावण्याची शक्ति असणारीं वृत्तपत्रें तर पुष्कळच कार्य करूं शकतील. समाजाला घातक अशा घटनांवर भर देण्याची त्यांची सवय मोडली व त्यांनी विधायक उपक्रमास बुद्धिपुरःसर प्रोत्साहन दिलें, तर समाजाच्या दृष्टिकोनाचा कायापालट होईल. व्यक्ती-व्यक्तींच्या राष्ट्रोद्धारक विचारसरणीचें

प्रतिबिंब सामाजिक जीवनांत व राष्ट्रीय धोरणांत कालांतराने पडल्याविना राहणार नाही आणि जें घडवून आणण्यासाठी व्यक्तींना रखडावें लागून निराशा पदरीं घेण्याची तयारी ठेवावी लागेल, तेंच सरकारी पुरस्काराने व शक्तीने कितीतरी लवकर घडून येऊं शकेल.

हा पुरस्कार व पाठिंबा समाजाच्या सामान्य घटकांतील मनोभूमीवर आणि चिकाटीवरच अखेर अवलंबून राहणें अपरिहार्य आहे. म्हणूनच आज ज्याला ज्याला भवितव्याविषयी आस्था वाटत असेल, त्याने त्याने स्वतःच्या उदाहरणानेच कार्यास प्रारंभ करावा, हें उत्तम. तरुण पिढीचा वृत्तिपालट घडवून आणण्यासाठी, तिच्यामधील ध्येयवादीपणा टिकविण्यासाठी, तिच्या उत्साहास निष्ठेचें पाठबळ देण्यासाठी, जाणत्या लोकांनी इतरांच्यासाठी खोळंबून न राहतां वाट चालूं लागावें, हेंच सर्वथैव श्रेयस्कर आहे.

—*किर्लोस्कर*

ग्रेट ब्रिटनची राणी एलिझाबेथ हिच्या आईसाहेबांनी कॅनडाला भेट दिली. त्या जेव्हा ओटावा येथे विमानाने उतरल्या, त्यावेळीं कॅनडाच्या जकात-अधिकाऱ्यांनी त्यांचीं सर्व पंचवीस बोजकीं नेहमीप्रमाणे कसून तपासलीं. "जकात देण्याजोगें कांहींहि सामान त्यांत नाही" असें सांगण्यास आईसाहेबांनी आपल्या नोकरांस सुचविलें. त्यावर, एक वरिष्ठ जकात-अधिकारी म्हणाला, "प्रत्येकाची तपासणी आम्हांला करावीच लागते; मग तो कोणीहि असो!" आईसाहेबांच्या परिवारांतील नोकर चिडून जाऊन जकात-अधिकाऱ्याशीं वाद घालूं लागले, तेव्हा "मी तुमच्या राणीची आई आहे, असें त्या म्हणत आहेत; बरें, आम्ही तसें मानून चालतों" असें तो जकात-अधिकारी म्हणाला! नेहमीचा प्रघात असा आहे की, राजघराण्यांतील मोठी व्यक्ति प्रवास करते, तेव्हा तिचा जबाबदार नोकर जवळील जिनसांची यादी तयार करून देतो; प्रत्यक्ष सामान कोणी तपाशीत नाही.

मेलबर्न ( ऑस्ट्रेलिया ) येथील क्रिकेटच्या सामन्याच्या वेळीं इंग्लिश खेळाडू डेनिस कॉम्प्टन यास त्याने पास न दाखविल्यामुळे मैदानांत प्रवेश करण्यास तेथील रखवालदाराने कसें अडविलें याचा वृत्तान्तहि उद्‌बोधक आहे. कॉम्प्टन पास विसरला होता आणि खेळ सुरू होण्यास फारच थोडा अवधि होता, म्हणून रखवालदाराला न जुमानतां तो फाटकावरून उडी मारून आंत घुसला. जातां जातां तो म्हणाला, "माफ कर, आता मला जाऊं दे. सेक्रेटरीला मी मग समजावून सांगेन." कॉम्प्टनबरोबर डकवर्थ होता, त्याच्याजवळहि पास नव्हता. ऑस्ट्रेलियन खेळाडू जॉन्स्टन याने त्याचा पास आणून देईपर्यंत डकवर्थला फाटकाबाहेर उभे राहावें लागलें. रखवालदार नंतर म्हणाला, "मीं कॉम्प्टनला खरोखर ओळखलं होतं. पण, पासाशिवाय कोणाला

सोडायचं नाही, असा नियम आहे आणि तो पाळला जावा म्हणून तर माझी येथे नेमणूक आहे. खुद्द गव्हर्नर आला, तरीं त्याचा पास पाहिल्याखेरीज त्याला मी आंत सोडणार नाहीं. कॉम्प्टन पास विसरून पुनः येऊं दे तर खरा; मी बघतों तो कसा आंत जातो, तें !"

कांही दिवसांपूर्वी मी पुणें स्टेशनच्या घड्याळाखाली एका मित्राच्या येण्याची वाट पाहात उभा होतों. त्यावेळीं समोरील पोलीस रहदारीचें नियंत्रण कसोशीने करीत असल्याचें पाहून मला फार बरें वाटलें. पण थोड्याच वेळाने त्याच्या मागील बाजूने एक रुबाबदार तरुण लष्करी अधिकारी सायकलीवरून आला व पोलिसाच्या आडव्या हाताची पर्वा न करतां त्याला वळसा घालून ऐटीने सायकल स्टँडकडे जाऊं लागला. पोलिसाने शिट्टी वाजविली, तरी तो फिदीफिदी हसत तसाच पुढे निसटला. पोलीस त्या सायकलस्वाराच्या मागोमाग धावूं लागला, पण त्याच्या गटांतील आजूबाजूच्या लोकांनी पोलिसाला त्याच्या जवळ येऊं दिलें नाही. बिचारा पोलीस परत आपल्या जागेवर येऊन पुन्हा वाहतूक-नियंत्रण करूं लागला.

गव्हर्नरलाहि अडवूं शकणारा रखवालदार आणि राजघराण्यांतील माननीय व्यक्तीच्या तक्रारीस न जुमानणारे जकातदार, हे आपलें कर्तव्य पार पाडूं शकले; "आपण उगीच कशाला भानगडींत पडलों" असें पोलिसाला वाटलें ! कॅनडा व ऑस्ट्रेलिया येथील सर्वच नोकर इतके कर्तव्यदक्ष असूं शकतील असें नाही, आणि येथील नोकरांनाहि नेहमीच बिचाऱ्या पोलिसाप्रमाणे अनुभव येईल असेंहि नाही. एवढें खरें की, कायदा किंवा नियम यांच्या अंमलबजावणींत नोकराला त्याच्या भूमिकेबद्दल खात्री वाटावयास हवी; त्याला त्याचें कर्तव्य आत्मविश्वासाने पार पाडतां आलें पाहिजे. ह्या बाबतींत वरिष्ठांनीच आदर्श घालून दिला पाहिजे, हें उघड आहे.

— केसरी

" डॉक्टरने विजेचें बटन दाबलें आणि थोड्या मिनिटांतच एक्स–रेमुळे कळून आलें की ऑपरेशन आवश्यक आहे.

आता विजेच्या दिव्यांच्या झगझगीत प्रकाशाच्या साहाय्याने सर्जनचा हात किती अचूक काम करतो; विजेच्या साहाय्याने उकळून शुद्ध केलेलीं आपलीं हत्यारें तो अगदी निर्धास्तपणें वापरतो. वीज प्राण वांचविण्यांत साहाय्य करीत आहे.

दिवसाचे २४ तास, वर्षाचे १२ महिने – नेहमीच – आणि दिवस असो वा रात्र असो,

ज्या ज्या वेळीं तुम्ही
विजेचें बटन दाबतां त्या त्या वेळीं...
टाटा संस्थेंतील कोणी ना कोणी इसम
तुमच्यासाठी सतत काम करीत असतो."

टाटा वीज कंपन्यांच्या एका जाहिरातीमधील मजकूर आहे हा. ह्यांत अर्थातच विजेपुरताच उल्लेख आहे. पण जरा अधिक विचार केला तर आपणांस असेंच दिसून येईल की, आपला प्राण, आपल्या सोयी, आपलें सुख, आपलें सर्व कांही अनेकांच्याच नव्हे तर लक्षावधि, कोट्यवधि लोकांच्या कर्तव्यनिष्ठेवर आणि सहकार्यावर अवलंबून असतें.

विमानांतून प्रवास करणारा उतारू विमान चालविणाऱ्यावरच केवळ नव्हे तर विमान तयार करणारे, विमानाला लागणारें पेट्रोल उत्पादन करणारे, त्याचप्रमाणे विमानांच्या वाहतुकीची व्यवस्था पाहणारे अशा स्वदेशांतील व परदेशांतील हजारो लोकांवर विसंबून असतो. विमानतळावरील साध्या रखवालदारांनी नीट राखण केली नाही व तेथे चरण्यासाठी गुरें शिरलीं तरी त्यामुळे विमानाला अपघात व्हावयाचा

व त्यांतील उतारू प्राणास मुकावयाचे ! नेहमीच्या आगगाडीची गोष्ट घेतली तरी हेंच आढळतें. ड्रायव्हर, गार्ड, सांधा बदलणारे, निशाण दाखविणारे, आपल्याला डोळ्यांनी दिसतात; पण त्यांच्यामागे केवढी तरी मोठी संघटना उभी असते ! त्या संघटनेंतील प्रत्येकानेच नेमलेलें काम नीट केलें पाहिजे. नाहीतर तासागणिक अपघात होतील. शहरांतील गर्दीच्या रस्त्यावरून बस जात असतांना तिचेसमोर सायकल-वाला आला तर बसचा ड्रायव्हर ब्रेक दाबून अपघात टाळतो. त्याला खात्री असते की, ब्रेक लावताक्षणींच वेग रोधला जातो. ह्या विश्वासा-वरच वाहनें वेगाने हाकतां येतात. मोठमोठ्या खाणींत उतरावयाचें म्हणजे पाळण्यांतून खाली जावें लागतें. ह्या पाळण्यांचे लोखंडी दोर तुटले किंवा यंत्रें वक्तशीर चाललीं नाहीत तर किती घोटाळे होतील ! इंजेक्शनें बनविण्यांत चुका झाल्या तर हाहाकार उडेल. इस्पितळांतील नर्सने ताप पाहण्यांत निष्काळजीपणा केला, रुग्णांना द्यावयाच्या औषधांत गफलत केली, तारमास्तराने तारेंतील शब्द किंवा आंकडे अवधान न राहून बदलले, तर कठीण प्रसंग निर्माण होतील.

फार मोठ्या गोष्टी सोडल्या आणि घरगुती गोष्टींपुरता विचार केला तरी सहकारी जीवनाची ही बाजू लक्षांत आल्याविना राहात नाही. घराच्या दाराला रात्रीं निजण्यापूर्वी कडी लावून घेण्याचें काम ज्याच्याकडे असेल त्याने ह्या कामांत हयगय केली तर चोरी होऊन सबंध घर धुतलें जाईल. बिनकल्हईच्या भांड्यांत गृहिणीने कळकणारे जिन्नस ठेवले तर मुलाबाळांच्या जिवावरच बेतण्याचा प्रसंग यावयाचा. न्हाणीघरांत अंग पुसण्याचा पंचा ठेवा-वयाचा राहिला हें फार उशीरा लक्षांत आलें म्हणजे बाहेर पडण्याची पंचाईत व्हावयाची. रात्रीं रेडकूं नीट बांधलें नसेल तर म्हशीला घातलेलें अंबोण तिच्या समोरून ओढून घेण्याची पाळी आल्याविना राहणार नाही. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका घंटेच्या ठोक्याला विद्यार्थ्यांना वांटण्यांत

येतात. ह्या पात्रिका वेळच्यावेळीं छापून तयार होतात, त्याला कितीतरी जणांची दक्षता कारणीभूत झालेली असते. खिळे जुळविणाऱ्याला छापखान्यांत अगदी सकाळीं जावें लागतें. त्याला त्याच्या पत्नीने पहाटे उठून गरम चहा करून दिलेला असतो व बरोबर भाकरीहि बांधून दिलेली असते. म्हणून त्याच्या हातून शांत चित्ताने, बिनचूक काम होऊं शकतें.

थोडक्यांत म्हणजे प्रत्येकाने आपापलें काम व्यवस्थितपणें पार पाडलें पाहिजे; त्याच्यावर दुसऱ्याला विसंबून राहतां आलें पाहिजे. मनुष्याच्या रानटी अवस्थेंत अशा सहकार्याची विशेष आवश्यकता कदाचित् भासली नसेल; परंतु जसजशी आर्थिक व औद्योगिक प्रगति होत जाते तसतसें हें अवलंबन वाढत जातें. श्रमांची व जिनसांची देवघेव सुरू झाली म्हणजे दुसऱ्याच्या शब्दावर व कृतीवर विश्वास ठेवल्याखेरीज चालतच नाही; आणि असा विश्वास निर्माण झाला नाही तर आर्थिक संसार नक्कीच बिघडेल हें स्पष्ट आहे.

खिशांतला साधा हातरुमाल जरी घेतला तरी कदाचित् तो ईजिप्त-मधील कपाशीच्या धाग्यापासून, अहमदाबादच्या एखाद्या गिरणींत तयार झालेला असेल. ती कपाशी पिकविणारे, ती आगबोटींतून भारतांत आणणारे, आगबोट तयार करणारे, आगबोटीला लागणारा कोळसा खाणींतून खणून काढणारे, बंदरें बांधणारे, आगगाड्यांचे रूळ टाकणारे व पूल उभारणारे, गिरणीची यंत्रसामुग्री बनविणारे, अशा असंख्य लोकांच्या कामगिरीमुळे व पद्धतशीर सहकार्यामुळेच आपल्याला तो हातरुमाल शेजारच्या दुकानांत विकत मिळूं शकतो. उपवासाच्या दिवशीं आजीबाईच्यासाठी आपण बाजारांतून जे बटाटे आणतों, त्यांचें बेणें पूर्वीं इटलीमधून येत असे; आता तें सिमल्याहून आणावें लागतें. बटाट्यांच्या लागवडीसाठी सहकारी बँका दर एकरीं ४०० ते ६०० रुपये कर्ज देतात. हजारो लोकांनी पोटाला चिमटा घेऊन चार पैसे बचत करून बँकेंत ठेवलेले असतात; त्यांतूनच बटाट्याच्या लागवडी-

साठी कर्ज देणें बँकेला शक्य होतें. एका साध्या बटाट्याच्या मागे इतक्या लोकांचे उपकार असतात, हें आजीबाईंना कळणारहि नाही. अशा आजीबाईच्याप्रमाणेच आपल्या बहुतेकांची अवस्था आहे; पण ज्यांना हें परस्परावलंबन समजलें आहे त्यांनी तरी त्याचें मर्म कोठे लक्षांत घेतलें आहे आणि त्याप्रमाणे स्वतःमध्ये सुधारणा कोठे घडवून आणली आहे ?

वीज-निर्मितीचें प्रारंभीचेंच उदाहरण पुनः घेऊन आपण दुसऱ्याच्या कर्तव्यनिष्ठेवर किती अवलंबून असतों हें पाहणें उद्बोधक होईल. मुंबई-पुणें रस्त्यावरील खोपोली येथे, डोंगराच्या तळाशीं, वीजगृहांत वीज निर्माण करण्यांत येते. त्याचीं यंत्रें फिरविण्याचें काम डोंगरावरील धरणांत साठविलेल्या पाण्याच्या साहाय्याने केलें जातें. यंत्रांची गति विजेच्या क्षणागणिक खपावर अवलंबून राहते व साहजिकच यंत्रांना गति देण्यासाठी पाणीहि कमी-जास्त लागतें. पाण्याचा हा पुरवठा योग्य प्रकारें राखण्याचें काम धरणावरील एक मनुष्य, त्याला मिळत राहणाऱ्या संदेशानुसार करीत असतो. पाऊस, वारा, थंडी, ह्यांना न जुमानतां ह्या मनुष्याने सदैव जागृत राहून पाण्याचा प्रवाह जरूरीप्रमाणे चालूं ठेवावयाचा असतो. त्याच्या हातून चूक झाली तर त्याचा दुष्परिणाम मुंबई-पुणें भागांतील सर्व ग्राहकांवर तात्काळ होईल. गिरण्या बंद पडतील, ट्रामगाड्या जागच्या जागीं उभ्या राहतील, यंत्रें बिघडतील, इस्पितळांतील दिवे जातील, अशा अनेक प्रकारें नुकसानी व गैरसोयी होतील. धरणांतील पाणी सोडणाऱ्या ह्या मनुष्याच्या कर्तव्यनिष्ठेवर कितीतरी जणांचें भलें-बुरें होणें अवलंबून आहे, पाहा! अशाच प्रकारें कमी-अधिक प्रमाणांत सर्वत्र आढळतें; डोळे उघडे ठेवून आपण पाहिलें मात्र पाहिजे.

इंग्लंडमध्ये जाऊन आलेल्याने सांगितलेली ही हकीकत आहे. तो व त्याचा एक इंग्रज मित्र मोटारींतून जात असतांना वाटेंत चौक लागण्यापूर्वीच मित्राने मोटारीचा वेग कमी करून आडव्या रस्त्याने

जाणाऱ्या मोटारीस वाट करून दिली. "आपण आधी जाऊं शकलों असतों; मग तूं कां थांबलास?" असें त्याला विचारलें, तेव्हा त्या इंग्रज मित्राने उत्तर दिलें, "खरें आहे. पण मी न थांबतां गेलों असतों तर त्यालाहि तसेंच करण्याची इच्छा झाली असती. आणि मग प्रत्येक जणच पुढे जाण्याची घाई करील आणि त्यांत सर्वांनाच धोका आहे. त्यापेक्षा आपणच दुसऱ्याची सोय पाहण्याचें ठरविलें तर त्याचें अनुकरण इतरहि करतात. नागरी गुण अशाच प्रकारें वाढीस लागतात व त्यामुळे सर्वांच्याच हिताचें संवर्धन होतें."

आपण सात्त्विक, धर्मनिष्ठ, निर्व्यसनी असून केवळ भागणार नाहीं. स्वर्गप्राप्ति होण्यास त्याचा कदाचित् उपयोग होईल; पण ह्या पृथ्वीवरील जीवनाची काय वाट? आपल्या कर्तव्यतत्परतेवर सामाजिक व राष्ट्रीय उत्कर्ष अवलंबून आहे आणि ह्या उत्कर्षांत आपल्याला व आपल्या मुलाबाळांना वांटा मिळावयाचा आहे, ह्या भावनेने आपण सर्वांनी वागण्याचें ठरविलें तर प्रगतीचें पाऊल पुढे पडण्यास निश्चित मदत होईल. आपण समाजाचे एक घटक आहोंत व आपल्यावर समाजाच्या हितास हातभार लावण्याची जबाबदारी आहे ह्या जाणिवेने प्रत्येकाने काम केलें तर किती चांगलें होईल! "कनिष्ठ दर्जाचें काम करूनहि मोबदला कापला जात नाही; मग काळजीपूर्वक काम करण्याची जरूरी काय?" अशा स्वार्थी विचाराचीं माणसें स्वतःच्या तात्कालिक फायद्याकडेच पाहणारीं असतात. पण राष्ट्रीय संपत्तींत त्यांच्या हातून त्यामुळे भर पडूं शकत नाहीं आणि त्याचे दुष्परिणाम इतरांना व मागाहून येणाऱ्यांना भोगावे लागतात. केवळ मोबदल्यासाठी काम करण्यापेक्षा त्या कामाच्या मागे राष्ट्रीय व सामाजिक हिताची जाणीवहि असेल तर काम अधिक चांगलें होईल; इतकेंच नव्हे तर काम करणाऱ्याला मानसिक सुखहि लाभेल. अशा प्रकारच्या सुखाची चव घेऊन पाहिली तर त्याची चटकच लागेल!

—*उद्यम*

"काल लतातार्ईच्या नाटकाचं एक तिकीट तूं दिलंच आहेस, पण मला आणखी एक पाहिजे बरं का. माझी बहीण आजच मुंबईहून इथं आली आहे तिलाहि लतातार्ईचं नाटक बघायला यायचं आहे; तेव्हा कसंहि करून आणखी एक तिकीट मिळवच" असें शरदने माधवला आग्रहाने सांगितलें. माधवच्या पत्नीने नाटकांत काम केलें असल्याने तिचें कौतुक करण्यासाठी नाटक पाहावयास जाण्याची शरदने फार उत्कंठा दाखविली होती. नाटकाचीं तिकिटें बंद झालीं होतीं तरी माधवने पांच रुपयांचें आणखी एक तिकीट घरचा वशिला लावून मिळविलें व त्याप्रमाणे लागलीच शरदला फोन करून कळविलें. शरदची गैरसोय होऊं नये म्हणून माधव नाटक सुरू होण्याच्या आधी नाटक-गृहाच्या प्रवेशद्वाराजवळच तिकिटें घेऊन उभा राहिला. नाटकाची वेळ केव्हाच होऊन गेली आणि आंत त्याच्या पत्नीच्या कामास मिळत असलेल्या टाळया त्याला ऐकूं येऊं लागल्या. तरी तो शरदची गैरसोय टाळण्यासाठी त्याच्या मोटारीची वाट पाहात थांबला होता. नाटकाचा पहिला अंक संपल्यानंतर मात्र तो नाटकगृहांत जाऊन बसला. दोन दिवसांनी त्याला समजलें की, मित्राचा बेत आयत्या वेळीं बदलून तो नाटकाऐवजी सिनेमालाच गेला होता. माधवची सर्व खटपट फुकट गेली; दहा रुपयेहि बुडाले. परंतु त्याचें वाईट वाटण्याइतकी त्याच्या मनाची परिस्थितीच उरली नव्हती. चांगलें वागण्याचा तोटाच त्याच्या पदरीं आला होता.

आमच्या शेजारच्या डॉक्टरीणबाईंच्याकडे एकदा पहाटे तीन वाजतां तांतडीचें बोलावणें आलें व त्या घाईने उठून पेशंट बघावयास गेल्या. पेशंटची स्थिति खरोखरच गंभीर झालेली होती. डॉक्टरीणबाईंनी तिला तपासलें व इंजेक्शन देऊन परततांना त्यांनी सांगितलें की, सकाळीं

पेशंटची प्रकृति कशी आहे तें सांगायला या; म्हणजे त्याप्रमाणे औषध-योजना करीन. पेशंटच्या पतीने सांगितलें, "अगदी नक्की येतों; कृपा करून बाहेर जाऊं नका; माझी वाट पाहा." पेशंटची अवस्था पाहून डॉक्टरीणबाई खरोखर अस्वस्थ झाल्या होत्या व त्यांना झोप येणें शक्यच नव्हतें. पेशंटकडून काय निरोप येतो ह्याची वाट पाहात त्या बसल्या. दोन महिन्यांनी त्यांची व पेशंटच्या पतीची सहज गांठ पडली; तेव्हा त्यांना कळलें की, पेशंट केव्हाच बरी झाली होती. इंजेक्शनने पेशंटला जरा बरें वाटल्यानंतर डॉक्टरकडे निरोप पाठविण्याची कोणालाच गरज भासली नाही. मग डॉक्टरने तरी एवढें जिवाला का लावून घ्यावें? साहजिकच, अशा कटु अनुभवांमुळे डॉक्टरचें वागणेंहि अनास्थेचें झालें तर नवल नाही.

एका बँक मॅनेजराने खातेदारास त्याच्या शब्दावर विसंबून चांगुलपणा दाखविला तो त्याच्या गळ्याशींच आला. खातेदाराचा पांचशें रुपयांचा चेक पास करावयाचा होता, पण त्याच्या खात्यांत दीड रुपया कमी पडत होता. तेव्हा त्याने मॅनेजरला सांगितलें की कृपा करून चेक पास करा, आत्ता बँक बंद होण्याच्या आंत कमी पडणारी रक्कम भरतों. खातेदाराची मालमत्ता व प्राप्ति दीड रुपयाइतका विश्वास ठेवण्यापुरती निश्चित मोठी होती. म्हणून बँक मॅनेजरने चेक पास केला. खातेदाराने मात्र ठरल्याप्रमाणे दीड रुपया भरला नाही, तेव्हा त्याच्या घरीं चिठ्ठी पाठवावी लागली, स्मरणपत्रें धाडावीं लागलीं आणि अखेर मॅनेजरला त्याच्या घरीं स्वतः जाऊन तो दीड रुपया वसूल करावा लागला. 'अब्रूदार' लोकहि असें वागूं लागले तर बँक मॅनेजरने कोणावर विश्वास ठेवावा व कोणाची सोय पाहावी?

सांगलीच्या तात्यारावांची राधामामी व त्यांची थोरली विधवा बहीण पुणें येथे बिऱ्हाड करून एकत्र राहतात व कसेबसे दिवस मोजत आयुष्य काढतात. त्यांच्या गावची म्हणजे सांगलीची कांही नातेवाईक

मंडळी त्यांच्याकडे पुष्कळ वेळां उतरतात. एके दिवशीं पाहुणे म्हणून आलेले तात्याराव त्यांच्या घरून सकाळीं स्नान करून "जेवायला बारा वाजतां येतों" म्हणून सांगून निघाले, ते रात्रीं आठ वाजतां परत आले. राधामामींनी पाहुण्यांसाठी मुद्दाम पावशेर भाजी विकत घेतली, आदपाव दूध जास्त घेतलें, सकाळचा चहा न घेतां दुधाचें विरजण लावलें, स्वैपाक तयार करून ठेवला. हा सर्व खटाटोप आता वाया गेला. कारण काय तर तात्यारावांना त्यांचे एक मित्र म्हणाले, "अहो, आता जेवा की इथंच". मग दुपारचा सिनेमाचा कार्यक्रम आणि संध्याकाळीं पेशवे पार्क! तात्याराव घरीं केव्हा परत येतील ह्याची खात्री नसल्यामुळे बिचाऱ्या राधामामींना त्यांची दुपारची ज्ञानेश्वरी बुडवावी लागली आणि शिजवलेलें अन्न दुसऱ्या दिवसासाठी तसेंच झाकून ठेवून संध्याकाळीं नवा भात टाकावा लागला.

देणगी जाहीर करून ती न देणारे किंवा देण्याची अळंटळं करणारे किती तरी आढळतात. कबूल केल्याप्रमाणे प्रत्यक्ष रक्कम दिली नाही तर त्यांचें कांहीच नुकसान होत नाही; उलट, संस्थांचे चालक त्यांना खूष ठेवण्याचा अधिकच नेटाने प्रयत्न करतात. देणगी देण्याचें मान्य केलें काय किंवा उसनी रक्कम परत करण्याचे हप्ते ठरविले काय, वास्तविक दोन्ही वचनांच्या पालनांत फरक पडता कामा नये. तसा तो पडतहि नाही म्हणा! कारण, कर्जफेडहि ठरल्याप्रमाणे करणारे विरळाच असतात.

पुणें येथील एका व्यायाम मंडळाला पद्मजी शेटनी १,००० रुपयांची देणगी मंडळाच्या वाढदिवशीं जाहीर केली. देणगीची रक्कम देण्यास त्यांना एक महिना विलंब लागला, तेव्हा त्यांनी ६ टक्के दराने त्या रकमेवरील व्याज देणगीबरोबर मंडळाला दिलें! "एक महिनाभर मंडळाची रक्कम मीं वापरली" ही त्यांची भावना. अशा देणगीदाराचें उदाहरण वर्गणीदारांनी जर गिरवलें तर सार्वजनिक संस्थांचा कारभार पुष्कळच सुधारेल.

आपण जें बोलतों त्याला कांही अर्थ असतो आणि त्या शब्दावर दुसरे लोक अवलंबून राहतात, ह्याची जाणीव कित्येक लोक ठेवीत नाहीत. त्या कारणाने कोणीच कोणावर विश्वास ठेवीत नाही किंवा जे सरळ वृत्तीचे लोक असा विश्वास ठेवतात, ते सपशेल फसतात. पैशाचे मोठे व्यवहार तर बाजूलाच राहिले; परंतु आपल्या दैनंदिन वागण्यांतहि वेळ मारून न्यावयाच्या दृष्टीनेच कितीतरी लोक आश्वासनें देतात. तीं आश्वासनें पाळण्याची जबाबदारी त्यांच्या ध्यानींमनींहि नसते. "उद्या सकाळीं परत करतों" असें म्हणून शेजाऱ्याने एखादा जिन्नस उसना नेला तर 'उद्याची सकाळ' कधीच उगवत नाही असें कित्येकदा घडतें. स्वतःची गैरसोय करणारी कोणतीहि गोष्ट करावयाची नाही, इतरांची मग कितीहि गैरसोय होवो, अशीच वृत्ति सर्वत्र आढळते. एक विदेशी पंडित, प्रा. प्रमुदा संशोधनासाठी पुणें येथे येऊन राहिले होते. त्यांचे मित्र म्हणविणारे एक स्थानिक प्राध्यापक त्यांना म्हणाले, "पुण्याची गणपतीची मिरवणूक फार चांगली असते; मी तुम्हांला ती दाखविण्यासाठी घेऊन जाईन. पुढल्या रविवारीं तीन वाजतां तयार राहा." प्रा. प्रमुदा वाट पाहून पाहून कंटाळून गेले! त्या दोघांची कालांतराने भेट होईल तेव्हा "कांही हरकत नाही" असें म्हणावयाची प्रा. प्रमुदांनी तयारी ठेवली होती. परंतु त्यांना तेवढीहि तसदी पडली नाही!

ह्याच्या उलट, दुसरें एक उदाहरण सांगतों. डॉ. हॉवर्ड जेंट्री हे कॅलिफोर्नियांतून भारतांत निरीक्षण करण्यासाठी आले होते. त्यांच्या बरोबर श्री. आनंद राव हे महाबळेश्वराला गेले होते. श्री. राव यांना डॉ. जेंट्रीच्या अमेरिकन सिगारेट्स् अतिशय आवडल्या. म्हणून त्यांचा एक डबा श्री. राव ह्यांना त्यांनी देऊं केला. परंतु त्यांच्याजवळचा डबा तेव्हा संपला होता. एक महिन्यानंतर डॉ. जेंट्री स्वदेशीं परत जाण्यास निघाले. त्या वेळीं त्यांना निरोप देण्यासाठी श्री. राव पुणें स्टेशनवर

गेले, तेव्हा तयार ठेवलेला सिगारेटचा बंद डबा डॉक्टरसाहेबांनी श्री. राव ह्यांना गाडी सुटतां सुटतां काढून दिला.

आम्हींहि प्रेम करतों, सहानुभूति दाखवितों, मदत करतों, सारें कांही करतों. परंतु त्याला व्यवस्थित स्वरूप नसतें, सुसूत्रता नसते, वेळेचें बंधन नसतें, असें कित्येक ठिकाणीं आढळतें. योजनेप्रमाणे शब्द पाळण्यांतील औचित्यास आम्हीं अधिक महत्त्व दिलें नाही, तर सामाजिक जविनाचा दर्जा कधीच वाढणार नाही, इतकेंच नव्हे, तर तें जीवन दु:सह होईल.

आपल्या कौटुंबिक जीवनांतहि शब्दाप्रमाणे वागण्यास अतिशय महत्त्व आहे. लहान मुलालाहि एखादी गोष्ट करतों म्हणून आपण सांगितलें तर ती गोष्ट न चुकता केली पाहिजे. एखादी गोष्ट करतां येणार नसेल तर तसें समजावून सांगितलें पाहिजे. "मुंबईहून तुला मेकॅनो आणीन" असें सांगतांनाच मेकॅनो न आणण्याचें ठरलेलें असतें किंवा त्या बाबतींत आळस होतो, परंतु त्याचा परिणाम मात्र अनिष्ट होतो. पत्नीला सांगावयाचें कीं तूं तयार राहा, मी अगदी वेळेवर येतों आणि मग आपण संभाजी पार्कमध्ये जाऊं; आणि पतीने तसें कांही कारण नसतांना भरमसाट उशीर करून पत्नीची निराशा व गैरसोय करावयाची, असें कित्येकदा घडतें. पत्नीनेहि माहेरीं किंवा विवाहसमारंभासाठी परगावीं गेल्यावर आग्रहाच्या सबबीवर मुक्काम वाढवावयाचा आणि पतीने तारांवर तारा पाठवावयाच्या, असेंहि कधीकधी होतें.

ह्या सर्वांचा परिणाम, कोणीच कोणाच्या शब्दास मानीनासा होतो व तात्कालिक फायद्याकडे जो तो लक्ष देऊन स्थिर व चिरकालीन सुखास मुकतो. म्हणून जें मनांत असेल व करावयाचें असेल तेंच उघड बोलावें हें उत्तम. जाणूनबुजून फसवणूक करण्याचाच ज्यांचा हेतु असेल त्यांची मात्र गोष्ट वेगळी !

—*केसरी*

" काय, मनोहर काय करतो आहे ? " असें विचारीत विजयने त्याच्या घरांत प्रवेश केला. पण मनोहर बाहेर गेलेला होता. वहिनींनी विजयचें स्वागत करून त्याला बसायला खुर्ची ओढून दिली व त्या समोरच्या स्टुलावर बसल्या. इतक्यांत पोस्टमन आला आणि त्याने एक निमंत्रणपत्रिका वहिनींच्या हातांत दिली. " कुणाचं आहे लग्न ? " असें विजयने विचारतांच वहिनी म्हणाल्या, " आपल्या मंदाताईचं. एक तारखेला लग्न आहे. आजची तारीख एकतीस म्हणजे उद्या सकाळीं लग्न ! नोंदणी पद्धतीचा एवढा पुरस्कार करणारी पण लग्न करते आहे वैदिक पद्धतीनं ! आहे की नाही गंमत ? आता लावील की नाही कपाळाला कुंकू आणि उभी राहील की नाही बोहल्यावर ? मंदाताईचं लग्न असं एकाएकी, झटपट उरकून टाकताहेत; मला वाटतं त्यांत कांही तरी भानगड असावी."

" तुम्ही अशी शंका कां घेतां वहिनी ? आणि समजा तसं कांही असलं, तर त्यांत तुमचं काय बिघडलं ? व्यवस्थितपणें लग्न झाल्यावर मग काय हरकत आहे ? " विजयने विचारलें.

" पुरुष हे असेच. त्यांना कशांतच कांही वाटत नाही. घराणं, शिक्षण, शील, चारित्र्य, संस्कार, ह्यांना कांही किंमत आहे की नाही ? तुमच्यापुढे हॉलिवुडच्या नट्यांचेच आदर्श असायचे. आम्हांला कांही ह्या गोष्टी पटत नाहीत. आज रमाकाकूंच्या मंदाचं ऐकलं; उद्या रामभाऊंच्या चंद्रूचं ऐकूं येईल; लक्ष असूं द्या. त्याच्च घरांत सोवळी आजी, आणि इकडे त्याच्या एल्सीचे बॉब केलेले केस आणि आखूड झगा. छान जमेल त्यांचं ! मीं माझ्या सरलेला बजावून ठेवलं आहे की तूं कांही अशा लोकांच्या घरीं जाऊं नकोस. "

" समजा, एका बाबतींत त्यांची चूक झाली. पण इतर बाबतींतहि त्यांचं चुकलेलंच असेल, हें कशावरून ? कदाचित् इतर बाबतीत त्यांचे गुण इतके मोठे असतील की, त्यांची मैत्री न करणें सरळेच्याच तोट्याचें होईल ! मंदाताईचं कॅप्टन कुमारशीं लग्न जमावं म्हणून तिचेच आईबाप त्यांना वाटेल ती मोकळीक आपणहून देत होते. मग आता मंदाताईचा काय दोष ? कुमारला मोटर-सायकल विकत घ्यायला मंदाताईच्या वडिलांनीच पैसे दिले होते, त्याचा हेतु साध्य झाला. मला वाटतं, तुम्ही इतर लोकांच्या खाजगी गोष्टींना भलतें महत्त्व देतां आणि त्या उगीच उगाळीत बसतां. आपल्या स्वतःच्या जीवनांत कितीतरी गोष्टी त्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या आहेत. "

" कांही झालं तरी मूलग्राही गोष्टींची किंमत कमी होत नाही. त्या असल्या तरच बाकीच्या गोष्टींना महत्त्व. म्हणून आम्ही अशा लोकांना नांवें ठेवणारच; त्यांना समाजकंटकच म्हणणार. त्यांच्याशीं व्यवहार ठेवूं नये असेंच सांगणार. सामाजिक बहिष्काराखेरीज हे प्रकार थांबायचे नाहीत."

" चारित्र्याला मी तुमच्याइतकीच मोठी किंमत देतों, वहिनी ! पण चारित्र्य कशाला म्हणावयाचें, हें मात्र लक्षांत घेतलें पाहिजे. केलेल्या गोष्टींची जबाबदारी न टाळतां धैर्यानें ती पत्करणें, ह्याला मी महत्त्व देतों. जबाबदारी टाळणारे आढळतात, पण ती स्वीकारून अडचणींना तोंड देणारे मात्र थोडे असतात. तात्कालिक स्वार्थासाठी तत्त्वें सोडणाऱ्या व लपूनछपून सर्व कांही स्वतः करून आणखी संभावितपणें मिरविणाऱ्या लोकांच्या टीकेला काडीइतकीहि किंमत नाही. आता स्पष्टच विचारतों वहिनी, आपल्याला तरी दुसऱ्याला नांवें ठेवण्याचा काय अधिकार ? तुमच्याच मुलाचं लग्न ठरलं तेव्हा बोला-वणीं करतांना बहिष्काराची ही भाषा कोठे गेली होती ? पहिली पत्नी टाकून दुसरी करणें हा मोठा सामाजिक गुन्हा असल्याचें तुम्ही

इतरांना सांगतां; पण अशा ' गुन्हेगारां'च्या घरीं अक्षत घेऊन तुम्ही बोलवायला गेला होतां म्हटलं ! "

" त्याचा अर्थ आम्हीं त्यांना मानपत्र दिलं असा होत नाही. जी जी गोष्ट वाईट असेल, ती ती ओरडून सांगितलीच पाहिजे; समाजाला जागे केलेंच पाहिजे. तरच समाज सुधारेल, एरवी नाही. आमच्याहि घरांत सर्व कांही ठीक आहे असं मींहि म्हणत नाहीं. पण त्याचा अर्थ आपल्याला जें खपत नाही तें बोलून दाखवूं नये, असा कांही होत नाही, एवढचं माझं म्हणणं."

" एखादे वेळेसहि बोलूं नये असा माझाहि आग्रह नाही ! जीवनांतील वैचित्र्य व मौज ह्या दृष्टीने अशा गोष्टीबद्दल आपसांत बोलण्यास कांहीच हरकत नाही. आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांबरोबर बोध घेण्याच्या दृष्टीने चर्चा करणें श्रेयस्करहि ठरेल. मुख्य प्रश्न आहे आपण कुठं, कुणाशीं व किती जबाबदारीन बोलतों. पण तसं कांही कारण नसतांना चारचौघांत बेफिकीरपणें अशी निंदा आपण करूं लागलों, तर आपल्या बोलण्याला जाणता मनुष्य कांहीं किंमत देईल काय ? आणि आपणा स्वतःला तरी अगदी छातीठोकपणें आपल्या बोलण्याचें समर्थन करतां येईल काय ? निदान मी तरी ह्या बाबतींत माघार घेतों. दुसऱ्याला नांवें ठेवून त्याच्यावर शिंतोडे उडविणें कितपत न्याय्य होईल ह्याचा ज्याने त्याने विचार केला पाहिजे; आणि अर्धवट माहितीच्या आधारावर कुचेष्टा करण्याचें तर अजिबात टाळलें पाहिजे. कुटुंबविघातक कृत्य करणारा तें कां करतो आणि त्याच्या मानसिक यातना त्याला किती होतात, ह्याची इतरांना कल्पना येणें शक्य नाही. अगदी बेरड माणसें फारच थोडीं असतात. नेमकी वस्तुस्थिति फारच थोड्यांना माहीत असते, आणि ती जाणून घेण्याची कोणाची इच्छाहि नसते. कोणी खरी माहिती सांगूं लागला, तर ' नाही हो, तुम्हांला ठाऊक नाही ' असें म्हणून निंदक त्यालाच गप्प बसवितात. परवाचीच गोष्ट सांगतों.

कोर्टात् वकिलांच्या खोलींत चर्चा चालली होती की 'अमक्या'ची बायको नवऱ्याला टाकून सोलापूरला दुसऱ्याकडे राहावयास निघून गेली; मुलालाहि सोडून गेली ! हा अमका माझा मित्र असल्याने माझ्या एका वकीलमित्राने हळूच माझ्याकडे चौकशी केली तेव्हा मला खूपच आश्चर्य वाटलं. वस्तुस्थिति अशी होती की, भावाला नोकरी लागल्यापासून व त्यानं संसार थाटल्यापासून बहीण त्याच्याकडे गेलीच नव्हती. म्हणून त्याच्या आग्रहावरून तिला तिच्या नवऱ्यानेच सोलापूरला धाडलें. शाळा बुडवण्यास मुलगा तयार नव्हता. म्हणून तो चार–पांच दिवस पुण्याला वडिलांजवळ खुषीनं राहिला. इतका सरळ व्यवहार असतांनासुद्धा शिकल्यासवरलेल्या लोकांत जर असा बभ्रा होऊं शकतो, तर इतरांची काय कथा ?"

"तुम्ही म्हणतां तें कांही खोटें नाही. मीं कितीतरी वेळा ऐकलं की, हे क्लबांत जाऊन इतर बायकांबरोबरहि रमी खेळतात. नुकतीच झालेली गोष्ट. हे संध्याकाळीं क्लबांत गेले ते रात्रीं १॥ वाजतां परत आले. आम्ही वाट पाहून कंटाळलों आणि काळजीने घाबरून गेलों. हे घरीं आले तेव्हा कळलें की नूतन वर्षानिमित्त झालेलं नृत्य पाहण्यासाठी ते इतका वेळ क्लबांत थांबले होते. माझी ह्यांच्याबद्दल पूर्ण खात्री आहे. पण लोक कांही सांगूं लागले म्हणजे मात्र मला चैन पडत नाही."

"तुम्ही घरचीच गोष्ट काढली हें बरं झालं. प्रत्येक माणसानं एकाच पद्धतीनं वागलं पाहिजे असं कसं ठरवितां येईल ? मी विचारतों, तुम्हाला त्यांचा कोणत्याहि प्रकारें त्रास होत नाही ना ? तुमचा अपमान होत नाही ना ? त्यांची बाहेर थोडी करमणूक झाली, तर घरांतील चिरचिर कमी होते असाच तुमचा नाही का अनुभव ? मग इतरांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायला काय हरकत आहे ? तुम्हाला ते महाशिवरात्रीच्या दिवशीं भीमाशंकराला घेऊन गेले होते आणि दर चतुर्थीला ते तुम्हांला गणपतीला घेऊन जातात ना ? आणि मागच्या रविवारीं तुमच्या

भावाचं गाणं त्यांनी घरीं केलं होतं, तें आठवतं ना तुम्हाला? त्या वेळचीं तुमची ऐट माझ्या अजून लक्षांत आहे! क्रिकेटच्या सामन्याचीं दोन तिकिटं त्यांनीं काढून ठेवलीं होतीं, पण तुम्ही त्यांच्याबरोबर गेला नाहीत. ही सर्व परिस्थिति ध्यानांत घ्या."

"तुम्ही आज खूपच मोकळेपणानं बोललां. खरोखर, चारित्र्याला तुम्ही किंमत देत नाही, अशीच माझी आजवर समजूत होती. ह्यांना क्लबांतून घरीं येण्यास उशीर झाला, तर मी आता सासूबाईंची री ओढणार नाही. तुमच्या बोलण्यांत बराच अर्थ आहे."

"फार छान बोललांत वहिनी! त्या परिस्थितींत दुसरे कदाचित् अधिक वाईट वागले असते हें नेहमी ध्यानांत ठेवलें म्हणजे दुसऱ्याबद्दल अनादर वाटत नाही; आणि दुसरी गोष्ट अशी की, पैशाने सर्व कांही झाकलें जातें नि गरिबीने तें सारें उघडें—नागडें केलें जातें. मित्राच्या पत्नीबरोबर रस्त्याने चालत जाणें हा गुन्हा ठरतो; मोटारींतून परस्त्रीला संभावितपणें रेसला घेऊन जाणें ही प्रतिष्ठित रीत समजली जाते. असो. तुम्ही तुमच्या कुटाळकंपूचा राजिनामा जाहीर करा, म्हणजे ज्यांची कुटाळकी केली जाते त्यांपैकी कितीतरी लोक तुमच्या कंपूंतील लोकांपेक्षा अधिक उच्च दर्जाचे आहेत हें लक्षांत येईल. त्यांची मैत्री केली तर ती अधिक हितावह होईल. उगीच एखाद्या गोष्टीवरून इतरांबद्दल वाईट ग्रह करून घेऊं नका."

"समाजकंटकांचा बचाव करीत करीत त्यांना आदर्श मानण्यापर्यंत तुमची मजल चालली आहे! आपल्या घरांत जें चालतं तें दुसऱ्याच्या घरीं असलें तर गप्प बसावें इथपर्यंत मी मान्य करीन. पण त्याच्याहि पुढे जाऊन दुसऱ्यांचे गुण मुद्दाम शोधून काढून स्तुति करायला मी नाहीं तयार! आणि लोकांच्याबद्दल बोलायचं नाही ठरवलं तर बोलायचं तरी कशाबद्दल? कुटाळक्या होतात म्हणून तर चार माणसं एकत्र येतात! आपल्या नात्यांतील एखाद्याच्या हातून कधी

काळीं चूक झाली तर आपण जन्मभर तोंड मिटून बसलें पाहिजे, आणि परक्याबद्दलसुद्धा एक अक्षरहि बोलतां कामा नये, हें कांही मला पटत नाही. मी स्वतःपुरत्या गोष्टींची जबाबदारी पत्करण्यास तयार आहें, पण माझे मामेसासरे आणि मावस नणंदा ह्यांच्या दोषांशीं माझा काय संबंध ?"

"अगदी खरं आहे. त्यांच्या दोषांबद्दल तुम्ही लावून घेण्याचं कांहीच कारण नाही. त्याच्याहि पुढे जाऊन मी म्हणतों की, अपरिचितांच्या दोषांशीं तर तुमचा मुळीच संबंध पोचत नाही. मग त्यांची निष्कारण निंदा काय म्हणून करावी ? तुम्ही दोष उगाळूं लागला तर त्यामुळे बाकीचे गुण नाहीसे होत नाहीत."

"टीकेच्या भीतीमुळेच लोकांच्या स्वैर वर्तनाला आळा बसतो; नाहीतर ते इतके वाहवले असते, की बोलायची सोयच नाही. हें तरी तुम्हांला पटतं की नाही ?"

"ह्या तुमच्या बोलण्यांत, वहिनी, बरेंच तथ्य आहे. समाजाला लगाम लावण्याला टीकेचा निश्चित उपयोग होतो. पण योग्य टीका व बेजबाबदार निंदा–कुचेष्टा ह्यांत मात्र फरक आहे. आपला दोष झाकण्यासाठीच कांही लोक इतरांचें उणें काढीत असतात, तर कांहींच्या निंदेच्या मागे त्यांना वाटणारा मत्सर हा असतो. दुसऱ्याला दोष देणें व ते फुगवून दाखविणें हें सर्वत्र आढळलं, तरी तें सामान्यच नव्हे कनिष्ठ दर्जाचें लक्षण आहे. म्हणूनच मी म्हणतों, की आपल्या बोलण्याचा हेतु विधायक असावा; विध्वंसक नसावा. जेव्हा आपण एखाद्या गोष्टीची चर्चा करतों, त्यावेळीं त्या गोष्टीपुरताच विचार केला पाहिजे. क्रिकेटचा सामना बघत असतांना खेळाडूच्या खेळाकडेच लक्ष हवें. पाहिलेल्या चित्रपटाची चर्चा करतांना त्यांतील नटीच्या खासगी जीवनाबद्दल बोलण्यांत काय स्वारस्य आहे ? गुणांकडे जास्त लक्ष दिलं तर त्यामुळे आपलाच फायदा होईल. दोष उगाळल्याने वेळेचा मात्र अपव्यय होऊन

आपला दृष्टिकोन विकृत होईल, घरांतील मुलांबाळांसहि वाईट वळण लागेल. जेव्हा आपल्या मुलासाठी अथवा मुलीसाठी स्थळ बघावयाचें असेल तेव्हा सूक्ष्म चौकशी करणें वेगळें आणि उठल्यासुटल्या इतरांना नांवें ठेवीत सुटणें वेगळें. त्यापेक्षा आपला स्वतःचा तोल नीट संभाळावा हेंच श्रेयस्कर. आपलीं खरकटीं भांडीं तशींच ठेवून जाणाऱ्या येणाऱ्यांची कुचेष्टा करीत वाटेंत उभें राहण्यांत काय अर्थ आहे!"

* * *

"बरी आठवण झाली! खरोखरच्च माझीं धुणीं अजून वाळत घालायचीं आहेत आणि दुपारसाठी तांदूळ पण निवडायचे आहेत. आपल्या आजच्या चर्चेला मात्र तुमचा नियम नाही ना लागू?"

"आणि खरंच, मलाहि बाजारांत जायचं आहे. मंदाताईसाठी प्रेझेंट आणायचं आहेना! येतों मी!"

—केसरी

2913 दि. 30-1-54
1063

## चांगले आणि वाईट शेजारी : ६

आपण चांगलें वागलों तरच आपल्याला दुसऱ्याकडून चांगली वागवणूक मिळण्याचा हक्क निर्माण होतो; म्हणून शेजारधर्माची पहिली पायरी प्रत्यक्ष कृति ही आहे; त्याखेरीज, पोकळ अपेक्षा व्यर्थ आहे. तथापि, आपण चांगलें वागलों आणि शेजाऱ्यांनी मात्र त्याचा गैरवाजवी फायदा घेतला, तर आपल्या चांगल्या वागण्याचा काय उपयोग ? असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. तेव्हा, शेजाऱ्यांनी एकमेकांशीं कसें वागावें, ह्याचा विचार करतांना सर्वांना एकच नियम लावतां येणार नाही; तरी पण कांही सामान्य नियम सांगतां येतील.

शेजाऱ्याकडून उसनें कांहीहि न आणण्याचा नियम कटाक्षाने पाळावा; अगदीच नाइलाज झाला तर गोष्ट वेगळी. पण पुष्कळ वेळा किरकोळ कारणासाठींहि लोक उसनें मागत असतात. एखादा बटाटा किंवा टामाटू किंवा लिंबू उसनें आणावयाचें व त्याचा आकार आणि वजन हें लक्षांत ठेवून परत देतांना जास्त जिन्नस जाणार नाही ह्याची काळजी घ्यावयाची, असें नेहमी चालतें. वेळेवर गोष्टी विकत आणून ठेवावयाच्या नाहीत आणि मग चमचाभर चहा आणि सुपारीचीं दोन खांडें उसनीं आणावयाचीं, ह्यांत काय अर्थ आहे ? आपण स्वतः उसनें आणण्याचें टाळलें, म्हणजे शेजाऱ्यावर त्याचा थोडातरी नैतिक परिणाम होतोच आणि दुसऱ्याकडे त्याने उसनें मागितलें तरी निदान आपल्याकडे उसनें मागण्यास त्याला संकोच वाटूं लागतो. तेव्हा, उसनें न मागण्याचे दोन फायदे होतात : एक तर आपल्याला चांगली सवय लागते आणि आपण दुसऱ्यासहि चांगली सवय थोडीफार लावतों.

उसनें आणण्याच्या पद्धतीचें व्यावहारिक समर्थन असें की, घरांत जिन्नस आणन ठेवला म्हणजे तो संपून जातो आणि पुनः पुनः

आणावा लागतो; त्यापेक्षा जरूर लागेल तेव्हा तो उसना आणला म्हणजे अगदी आवश्यक तेवढाच आपणास मिळूं शकतो आणि त्यामुळे खर्च टळतो. परंतु दुसऱ्याच्या चांगुलपणामुळे आणि व्यवस्थितपणामुळेच हें साधतें, हें उघड आहे; स्वतःच्या गुणांमुळे नव्हे. म्हणून अशा तऱ्हेने वागणें खऱ्या सुसंस्कृत माणसाला शोभेसें नाही. त्यानेच संयम करावयाची शिस्त स्वतःला लावून घेतली पाहिजे.

पुष्कळ वेळा ऐपत असूनहि उसनें आणण्याची पाळी येते. त्याचें कारण केवळ गबाळेपणा हें असतें. चहाची पूड संपण्यापूर्वी ती विकत आणली जात नाही, कार्ड घरांत शिल्लक नसतें आणि आमटीचा गूळ संपलेला असतो. उसनें आणावयाचें नाही असें ठरविलें म्हणजे होणारी गैरसोय टाळण्यासाठी मनुष्य आगाऊ विचार करून वागूं लागतो आणि संसार अधिक चांगला होऊं शकतो.

शेकण्याची पिशवी, थर्मामीटर, इत्यादि जिनसा प्रत्येकास विकत घेऊन ठेवणें परवडत नाही आणि चाळींत किंवा वाड्यांत त्या जिनसा ज्याच्याजवळ असतील, त्याला नेहमीच त्रास होतो. दुसऱ्याच्या जिनसा काळजीपूर्वक वापरण्याची कुणालाच सवय नसल्यामुळे त्या खराब होतात आणि मग खराबी लपविण्याची लटपट केली जाते. त्यामुळे साहजिकच गैरसमज व भांडणें होतात. कोणीं काय उसनें मागावें, ह्याला मर्यादाच नसते. अचानक अडचणीच्या वेळीं कोणतीहि गोष्ट मागणें क्षम्य ठरेल; पण ज्या गोष्टी मागितल्या नाहीत तरी चालेल, त्या कधीच न मागणें श्रेयस्कर. ग्रामोफोन, ग्रामोफोनच्या तबकड्या, दुर्बीण, चांदीचीं भांडीं, तक्के-लोड, कोट, पातळ, इत्यादि जिनसा शेजाऱ्याकडून उसन्या आणून इतरांना श्रीमंती दाखविण्याचें कारण नाही. कांही गरीब लोक स्वतःजवळ जें कांही असेल त्यांतच भागवितात आणि मोठ्या नेकीने राहतात. अशा लोकांचें उदाहरण गिरवणें श्रेयस्कर आहे. आपल्याजवळ जे जिन्नस नाहीत, ते उसने आणून त्यांचा उपभोग घेणें हें मानसिक दौर्बल्याचें

लक्षण आहे. परंतु, असेच शेजारी फार असतात. ते एकमेकांकडून वाटेल तें मागतात, एकमेकांची निंदा करतात आणि त्याच वातावरणांत जन्मतात आणि मरतात. त्यापेक्षा उच्च दर्जाचें जीवन अशक्य आहे काय?

जमिनींतील सत्त्व नाहीसें झालें म्हणजे तींत झाडें नीट वाढत नाहीत; म्हणून माझ्या एका मित्राने कुंड्यांतून गुलाबाचीं झाडें लावलीं. त्या कुंड्या त्याने जमिनीवर नीट मांडून ठेवल्या, पण कांहीं दिवसांनी बागेंतील मोठ्या झाडांचीं मुळें ह्या कुंड्यांच्या बुडांतून आंत शिरलीं व गुलाबाचीं झाडें सुकूं लागलीं! आजूबाजूच्या शेजाऱ्यांपेक्षा आपण अधिक चांगल्या तऱ्हेने, आपल्याला ऐपत असली तरी, राहूंच शकत नाही, असा कित्येकांचा अनुभव असेल. पैसे भरून 'सकाळ' चालू करणाऱ्याला स्वतःलाच शेजाऱ्यांकडून तो आणण्यासाठी बिचाऱ्या बाळ्याला हेलपाटे द्यावे लागतात. ते पेपरवाल्याकडून परस्पर वर्तमानपत्र लांबवतात आणि "अजून वाचून झाला नाही" असें ते बाळ्याला खुशाल सांगतात! ज्याचे घरीं ॲस्पिरिनच्या गोळ्या असतील, त्याच्या स्वतःच्या डोकेंदुखीच्या किंवा पोटदुखीच्या वेळीं मात्र त्या संपलेंल्या आढळतील. घरांत कोणाला एनिमा घेण्याचा प्रसंग आला, तर एनिमाच्या भांड्याची नळी शेजाऱ्याने खराब केलेली असल्याचा शोध तेव्हा लागेल आणि सायकलीचा पंप शेजाऱ्याकडेच नेहमी पडून राहील. बॅटरी संपली म्हणजेच सायकलीचा दिवा शेजाऱ्याकडून परत मिळेल. अशा परिस्थितींत सत्प्रवृत्त लोकांचा टिकाव कसा लागणार? तेहि मग बचावाचें धोरण पत्करतात; पण ज्यांनी त्या वस्तूंचा पुरेपूर फायदा घेतला, असे सर्वच शेजारी एकजुटीने त्यांच्यावर टीका करूं लागतात.

शेजाऱ्या-शेजाऱ्यांत वाकडें येण्याचें एक प्रमुख कारण, त्यांपैकी कांहींची स्वतःच्या ऐपतीबाहेर राहण्याची सवय हेंच असतें, असें विचारान्तीं आढळून येईल. जी गोष्ट परवडत नाही, ती आपण विकत

घेत नाहीं; म्हणून ती चोरावयाची किंवा उसनी आणावयाची असें करतां कामा नये. शेकण्याच्या पिशवीचें काम विटेचा टोला, बाटली किंवा मिठाची पुरचुंडी हीं करूं शकतात. पण शेकण्याच्या पिशवीची सोय तर हवी; मग उसनवारीचा आश्रय ओघाने आलाच. ह्याच चालीवर बाकीचें वागणें घडतें. तेव्हा, खरा प्रश्न मिळणाऱ्या प्राप्तींत समाधानाने राहण्याचा आहे; ती मर्यादा ओलांडल्यावर उसनवारी, परतफेडीची टाळाटाळ, उचलेगिरी, चोरी, हे प्रकार क्रमाक्रमाने येतात आणि मुलांना अनिष्ट वळण लागतें.

उसनें आणण्यासाठी स्त्रियांनाच भांडें घेऊन जावें लागतें, म्हणून त्यांच्यावर टीका होते; परंतु पुरुषच उसनवारीच्या सवयीस पुष्कळ वेळीं कारणीभूत असतात. दळणासाठी दोन पैसेसुद्धा गृहिणीला नवऱ्याकडून मागून घ्यावे लागतात, अशी परिस्थिति कांही ठिकाणीं अजून आढळते. घर चालविण्याचें दैनंदिन काम गृहिणीकडे असतें, पण त्यासाठी आवश्यक तें आर्थिक स्वातंत्र्य तिला नसतें. तेल इतक्यांत कसें संपलें आणि आगपेट्या इतक्या लवकर कशा जाळल्या, असें म्हणून पुरुष जर सतावूं लागले, तर बिचाऱ्या गृहिणीनें काय करावें ? स्वैपाकाला तेल, मीठ, तिखट आणि चहाला साखर ह्या गोष्टी तरी पाहिजेतच ना ! पुरुषाला ह्या गोष्टी समजत नाहीत असें नाही, पण तिकडे लक्ष देणें त्याला परवडतच नाही ! मग गृहिणीने उसनें आणूं नये, तर काय करावें ? उसनें आणण्यांत स्त्रियांना आनंद वाटत असतो, असें कोणी म्हणूं शकेल काय ?

आपल्या मुलांचा शेजाऱ्यांना त्रास होतो काय, ह्याची चौकशी करून मुलांना योग्य तें वळण लावलें पाहिजे. आपल्या मुलांनी शेजाऱ्याकडे भलत्या वेळीं जाऊं नये, त्यांच्या खाण्याच्या वेळीं तेथे घिरट्या घालूं नयेत, ह्याची दक्षता घेतली पाहिजे. आपल्याला दुपारीं सुखाने झोप घेतां यावी, यासाठी मुलांना शेजाऱ्यांकडे पिटाळणाऱ्या कितीतरी आया

असतात. शेजारी चुकून मुलांना जरा बोलले, की ह्या आया मुलांची बाजू घेण्यास पुनः तयार असतातच. मुलांचेवरून त्यांच्या आयांत नेहमी भांडणें होतात; तीं टाळण्याचा उत्कृष्ट उपाय म्हणजे 'आपला बाळ्या कधीच खोडी काढीत नाही आणि दुसऱ्याचें कारटें मात्र नेहमी आगळीक काढतें,' ह्या समजुतीने बाळ्याची बाजूच नेहमी खरी असें न मानणें, हा होय.

आपल्या वागण्याने शेजाऱ्यांना त्रास होणार नाही, ह्याची काळजी घेतलेली बरी. रेडिओ विनाकारण मोठा लावून न ठेवणें; जिन्यांतून पाय वाजवीत न जाणें; पत्ते-कॅरम-सोंगट्या खेळतांना हसण्या-खिदळण्या-वर नियंत्रण ठेवणें, ह्या मार्गाने शेजाऱ्यांचें जीवन अधिक चांगलें करतां येईल. मुलें खेळत असलीं म्हणजे त्यांच्या आवाजाने शांतता नष्ट होणें अपरिहार्य असतें. परंतु आपल्या मुलांचें ओरडणें आपल्यास कर्णमधुर वाटलें तरी इतरांना तें कर्णकटु वाटतें; म्हणून आपल्या मुलांच्या खेळ-ण्यास योग्य तें वळण लावणें इष्ट होईल.

शेजाऱ्याच्या उपयोगी पडण्याचा प्रयत्न केला पाहिजे; त्याच्या भावनांचा विचार झाला पाहिजे; त्याच्या सुखदुःखांत सहभागी झालें पाहिजे. आजारीपणांत तर अशा मदतीची फारच आवश्यकता भासते. एकाच कामासाठी दोघांनी जावयाचें, त्याऐवजी एकानेच दोघांचीहि कामें केलीं, तर किती तरी सोय होईल. त्या दृष्टीने सहकार्याचे मार्ग शोधून काढले पाहिजेत. एकाने नेहमी इतरांच्या मदतीसाठी धावत जावयाचें व दुसऱ्याने ही मदत घेतली तरी त्याची परतफेड साध्या गोड शब्दांनीहि करावयाची नाही, हा एकतर्फी व्यवहार दीर्घ काळ कसा चालणार?

शेजाऱ्यांच्या आवडीनिवडीवर टीका न करतां, त्यांच्या चांगल्या गोष्टींचें कौतुक केलें तर त्याचें कांही बाबतींत तरी चीज होईल. स्वयंपाकीण, मोलकरीण, ह्यांचेमार्फत बातम्या काढून त्याचे आधारावर

निंदा करीत सुटायची खोड फार स्त्रियांना असते. पाहुण्यांच्यासाठी कोणतें पक्वान्न केलें त्याची माहिती शांताबाईकडून मिळवायची आणि "इतक्या दिवसांनी जावई आले, तर साध्या शिकरणीवरच का भागवायचें?" अशी जयश्रीबाईविरुद्ध सर्व शेजाऱ्यांत टीका करावयाची, हे प्रकार अनिष्ट आहेत. पुरुष मंडळी दीर्घकाळ घराबाहेर असल्यामुळे शेजाऱ्यांशीं नीट वागण्याचा प्रश्न मुख्यतः स्त्रियांशींच संबंधित असतो. आपली पत्नी शेजारी म्हणून कशी वागते ह्याची पतीला कधी कधी माहितीहि नसते! तेव्हा पत्नीच्या शब्दावर विसंबून, तिची बाजू घेऊन भांडणारा पति मूर्ख ठरण्याचा कधी कधी संभव असतो.

कांही पुरुष शेजाऱ्याबद्दल विनाकारण कुतूहल दाखवीत असतात; "मास्तरीणबाईंच्या खोलींत काल दिवा बराच वेळ होता," अशी निष्कारण कुचेष्टा करणारे कांही पुरुष आढळतात. शेजाऱ्याला नाखूष न करतां, त्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करून, त्याच्याविषयी सद्भावना ठेवणें, हाच खरा शेजारधर्म आहे. आपल्या स्वतःच्या वागणुकीने आणि सदाचाराने प्रत्येक जाणत्या माणसाने शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सुखात भर घातली पाहिजे.

शेजाऱ्याला आपला निष्कारण त्रास होऊं देतां कामा नये. कित्येकांना एकसारखे शेजाऱ्याच्या घरीं जाऊन बसण्याची सवय असते. शेजाऱ्याकडे येणाऱ्या मित्रमंडळीबरोबर व नातेवाईकांबरोबर हेच लोक बोलत बसतात आणि स्वतःखेरीज बाकी सर्वांची गैरसोय करतात. शेजाऱ्याच्या विश्रांतीच्या, जेवणाच्या व चहाच्या वेळेस तर त्याचेकडे आपण होऊन सहसा फिरकूं नये.

शेजाऱ्याकडे गेल्यावर गैरहजर लोकांची निंदा व कुचेष्टा सुरू होते. सासूबरोबर बोलतांना सुनेविरुद्ध तिचे कान भरवावे आणि सुनेशीं बोलतांना सासूविरुद्ध सूर लावावा आणि सून काय बोलली किंवा न बोलली तें तिखटमीठ लावून सासूला सांगावें, असे शेजाऱ्यांचे उपद्व्याप

चालू असतात. तेव्हा, आपण स्वतः अशा गप्पांत भाग घेण्याचें टाळणेंच बरें. अर्थात्, ज्याच्याकडून बातम्या कळत नाहीत त्याचा इतरांना उपयोग वाटत नाही. उलट, बाजारगप्पांचा साठा नेहमी जवळ बाळगून त्यांत भर घालणारे लोक कुटाळीच्या भांडवलावर चहापाणी मिळवीत असतात.

आपण दुसऱ्याच्या उपयोगी पडतांना, इतरांनी आपला गैरवाजवी फायदा घेऊं नये, ह्याबद्दल सावधानता बाळगावी लागते. सर्वसाधारणपणें आचरावयाचे नियम कांही शेजाऱ्यांच्या बाबतींत गुंडाळून ठेवणेंच भाग पडतें. ज्याला अप्रत्यक्ष सूचना समजत नाही, त्याला स्पष्टपणें सांगावें लागतें. कधीकधी खोटेंहि बोलावें लागतें. पण आचरणाचा पाया मात्र सद्भावाचा व सद्धर्माचा असला पाहिजे. तोंडावर गोड बोलणारे कित्येक लोक पाठीमागे निंदा करतात, हें जाणून स्तुतीला बळी पडतां कामा नये. उलट, तोंडावर टीका करणारे लोकच कांही वेळा आपले खरे हितकर्ते ठरतात. तेव्हा, आपल्या शेजाऱ्यांपैकी कोणास जवळ करावयाचें व कोणास दूर ठेवावयाचें ह्याचा योग्य निर्णय योग्य वेळीं घेतला पाहिजे. नव्या वस्तींत राहावयास जातांना तर फारच दक्षता बाळगली पाहिजे. कारण, चांगले शेजारी त्यांच्या चांगुलपणाची जाहिरात करीत नसल्याने बाकीच्यांना फावतें व ते अशा शेजाऱ्यांविषयी खरें-खोटें सांगून त्यांच्याविषयी गैरसमज निर्माण करून ठेवतात. म्हणून, शेजाऱ्यांशीं रहस्यांत येण्यापूर्वी शक्य ती दक्षता घेतलेली बरी. घाईने लग्न करावयाचें आणि मग सावकाशीने पस्तावत बसावयाचें, असें होतां कामा नये.

—*ज्ञानेश्वर*

भारत सरकारच्या एका बड्या महाराष्ट्रीय अधिकाऱ्याचें हें उदाहरण आहे. स्वतःचे फाटलेले कपडे ते फुरसतीच्या वेळीं स्वतःच दुरुस्त करतात; शर्ट विरला म्हणजे तो नीट रफू करून किंवा शिवून वापरतात, कॉलर नवी लावतात आणि खांद्यावरहि शर्ट गेला म्हणजे मात्र त्याची पाठ तेवढी चांगल्या स्थितींत राहते तिच्यांतूनहि उत्कृष्ट दर्जाचा हातरुमाल तयार करतात. त्यांच्या खिशांतील हातरुमालाची पूर्वपीठिका ही अशी आहे! ह्याचा अर्थ, ते फाजील काटकसरी वा चिक्कू आहेत असा मुळीच नाही. पैसे वांचविण्याचें त्यांना वेड नाही; पैसे कुजत ठेवण्याची त्यांची वृत्ति नाही. त्यांनी आपल्या प्राप्तीच्या मानानें कितीतरी मोठी रक्कम इतरांना मदतीदाखल दिलेली आहे.

जिन्नस वाया गेलेला त्यांना खपणार नाही. गरज भागविण्यास योग्य त्याच प्रकारचा जिन्नस ते उपयोगांत आणतील. पाठकोऱ्या कागदाने भागेल तेथे ते कोरा कागद वापरणार नाहीत, काळी पेन्सिल चालेल तेथे तांबड्या, निळ्या पेन्सिलीने ते लिहिणार नाहीत कीं वर्तमान-पत्राचा कागद चालेल तेथे ब्राऊन पेपरचा उपयोग करणार नाहीत. सकाळीं वेळ भरपूर असेल तर स्टेशनपर्यंत चालत जातील. पण मुंबईला किंवा नागपूरला गेल्यावर मात्र वाहनांतून हिंडतील. वेळ आणि पैसा ह्यापैकी ज्याची किंमत अधिक असेल त्याची ते नेहमी बचत करतील. त्यांच्या टेबलावरील दिवा पाहिजे तेवढा उजेड देणारा असेल; सायकल ते नेहमी उत्कृष्ट स्थितींत ठेवतील; टायर फुटण्याची भीति निर्माण होतांच बदलून घेतील. मुलांच्या व पत्नीच्या आवडीचीं मासिकें व पुस्तकें घेतील. त्यांना वरचेवर चांगला खाऊ आणतील; पण कपाटांतील मिरची-कोथिंबीर वाळून गेलेली त्यांना पाहवणार नाही; साबण ओला राहिल्यामुळे झिजून गेलेला त्यांना खपणार नाही

किंवा बंबांतील गरम पाणी थंड होऊन चाललें तर त्यांना आवडणार नाही. त्यांच्या घरीं सर्व सोयी आढळतील. सर्वांचे योग्य ते लाड पुरवले जातील, पण जिन्नस किंवा वेळ फुकट जाणें त्यांना दूषणास्पद वाटतें. त्यांच्या घरच्या शिवणाच्या मशिनला विजेची मोटार लावलेली आहे; त्यामुळे शिवणकाम फारच सोयीचें व हलकें होतें. त्यांच्या गृहिणीलाहि खर्च व काटकसर ह्यांतील तारतम्य चांगलें साधलेलें आहे. ती घरीं कपडे शिवते; पण काजीं मात्र पैसे देऊन मशिनवर करवून घेते; त्यासाठी वेळ दवडत नाही. तिने जुन्या कपड्यांच्या शिलकीं चिंध्यांची बनविलेली गादी दिवाणखान्यांतील कोचास शोभा आणीत असून उभयतांच्या लौकिकांत भर घालीत आहे!

अल्प प्राप्तीच्या माणसांना प्रत्येकच ठिकाणीं पैसा वांचवावा लागतो. त्यांच्या बाबतींत तें अपरिहार्य म्हणतां येईल. त्यामुळे कित्येक वेळा समजलें तरी कृतींत उतरत नाही अशी परिस्थिति निर्माण होते. कधीकधी अधिक पैसा खर्च केल्यानेच खरी काटकसर साधते. परंतु हें पटलें तरी तो पैसा खर्च करणें शक्य नसल्याने गरीब बिचाऱ्यांचें नुकसान होतें. स्वस्त कापडाचे कपडे शिवले तर ते लवकर फाटतात आणि कपडे फाटले की त्यांच्या शिलाईच्या खर्चाचा मोबदलाहि संपुष्टांत येतो. पण टिकाऊ कापड घेतलें तर त्याचे शिवलेले कपडे जास्त दिवस टिकतात. शिलाई मात्र तेवढीच पडलेली असल्यामुळे शिलाईच्या पैशांत बचत होते. म्हणून टिकाऊ कापड थोडें महाग पडलें तरी अखेर तें काटकसरीचें ठरतें. रोखीचा व्यवहार उधारीपेक्षा श्रेयस्कर, हें माहीत असूनहि गरीबांचा इलाज चालत नाही. तथापि, ज्या ज्या वेळीं शक्य होईल त्या त्या वेळीं विचारपूर्वक निर्णय घेण्याची सवय जडवून घेतली पाहिजे.

आपल्या रोजच्या व्यवहारांत प्रत्येक वेळीं खर्चाची छाननी करून योग्य काटकसर घडवून आणण्याचा प्रयत्न करावा लागतो. कचेरींत

कामाला जाते वेळीं स्वच्छ व इस्त्रीचे कपडे घालावे लागतात; मग तें परवडो वा न परवडो. कामाच्या ठिकाणीं वेळेवर पोहोचण्यासाठी करावा लागणारा वाहन-खर्च टाळण्याजोगा नसतो. त्याचप्रमाणे, बरोबरीच्या लोकांसमवेत मधल्या वेळीं चहा घेण्याचें टाळणें अवघड जातें. कांही लोक कचेरींतच फक्त बूट वापरतात; घरीं येतांना ते अनवाणी येतात. वरिष्ठ मात्र त्यांच्या बुटांच्या चकाकीवर खूष असतात. वरिष्ठाच्या घरीं मंगलकार्य असेल तर हाताखालच्या लोकांना ऐपतीबाहेर अहेर द्यावा लागतो. मोटार ठेवण्याची संपन्नता प्राप्त होण्यापूर्वींच डॉक्टरला मोटार-गाडी ठेवावी लागते व तीहि इतर डॉक्टरांच्या मोटारींच्या दर्जाची. त्याखेरीज त्याला प्रतिष्ठा प्राप्त होत नाही, आजाराला घाबरणारें श्रीमंत गिऱ्हाईक लाभत नाही आणि लाभलें तरी टिकत नाही.

कांही धंदेवाल्यांना स्वतःलाच नव्हे तर स्वतःच्या पत्नीलाहि सजविणें आवश्यक वाटतें. सामाजिक प्रसंगींचा पत्नीचा उठावदारपणा त्यांच्या व्यवसायाला उपकारक ठरत असतो. त्यांची ऐपत खालच्या वर्गानें प्रवास करण्याची असली तरी ते नेहमी वरच्या वर्गानेच जातात. सिनेमाचींहि तिकिटें भारी दरांचींच काढतात. स्वतःच्या आईला औषध-पाणी देण्याच्या बाबतींत मात्र त्यांना काटकसर सुचते.

बँकेतून मोठालीं कर्जें काढणाऱ्यांना मोटार, टेलिफोन, हीं तर पत निर्माण करण्याचीं मोठींच साधनें वाटतात. टेलिफोन डिरेक्टरींतील नांवें चाळून पाहिलीं, तर ज्यांच्याकडे न्हावी किंवा धोबी देखील उधारी ठेवणार नाहीत अशा कांही मंडळींचींहि नांवें त्यांत आढळतील! रात्रंदिवस गिरणी चालत असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी यंत्रें नुसतींच फिरवून विजेवर हजारो रुपये खर्चणाऱ्या उद्योगपतींनी लक्षावधि रुपयांचीं कर्जें मिळविल्याचीं उदाहरणें आहेत. मागांवर सूत नसलें तरी ते चालविणें व त्यासाठी वीज जाळणें त्यांना किफायतशीर वाटतें. ह्यांतील इष्टानिष्टतेचा भाग वगळला तरी त्यांतील रहस्य विसरून चालणार नाही.

एखादी गोष्ट घडवून आणण्यासाठी कमींत कमी खर्च करणें किंवा तेवढ्याच पैशांत अधिक मोबदला मिळविणें अथवा जास्त खर्च करून पण त्या खर्चाच्या मानाने कांहीं पटीने मोबदला पदरांत पाडणें, ह्यालाच काटकसर म्हणतां येईल. उलट, मोबदला आणि त्यासाठी केलेला खर्च ह्यांचें प्रमाण व्यस्त झालें तर त्यामुळे खोटी काटकसर होईल. ह्याकरिता उद्दिष्ट केव्हाहि स्पष्ट व हितकारकच असावयाला पाहिजे आणि परिस्थितीचा वरचेवर आढावा घेतला पाहिजे.

कौटुंबिक जीवनांतहि जीव वांचविण्यासाठी आणि आरोग्य-रक्षणासाठी करावयाच्या खर्चाला प्राधान्य दिलें जाणें अपरिहार्य आहे. शस्त्रक्रिया, बाळंतपण, दीर्घ मुदतीचे आजार, इत्यादींवर मोठा खर्च करण्याची जेव्हा पाळी येते तेव्हा स्वजनांच्या जिवासाठी शेतें व घरेंदारें गहाण टाकून, दागिने विकून, कर्जें काढून, इतर ठिकाणचे खर्च वांचवून आपण उपचार करीत असतों. त्यांतहि, कुटुंबांतील मिळवत्या माणसांच्या औषधी योजनेवर जास्त खर्च केला जातो. कारण, त्यांच्या जीविताची किंमतहि अधिक असते. सेवानिवृत्त, म्हाताऱ्या माणसाच्या मासिक पेन्शनीच्या रकमेवर त्याच्या औषधपाण्यासाठी केला जाणारा खर्च अवलंबून असतो; म्हाताऱ्या, अवलंबित बायाबापड्यांना घरगुती औषधांवरच मरणाची वाट पाहात बसावें लागतें.

असाध्य रोग झालेल्या कुटुंबियांवर हजारो रुपये खर्च करून घरांतील इतर सर्वांची आबाळ करणाऱ्यांचींहि उदाहरणें आढळतात. निष्ठुरपणें विचार केला, तर खर्चाच्या ह्या बाबीपैकी कित्येक बाबी खोट्या काटकसरीच्या सदरांत घालाव्या लागतील. भावना आणि त्यांसाठी द्यावयाची किंमत ह्याचा विचार ज्याने त्याने शांतपणाने, साधकबाधक गोष्टी लक्षांत घेऊन, शेजाऱ्यांची भीति न बाळगता, करावयाला पाहिजे.

आवश्यक गरजा कोठे संपतात व सुखसोयींचा प्रारंभ कोठे होतो हें

सांगणें कठीण आहे. मनुष्याच्या गरजा व सुखसोयींच्या अपेक्षा अमर्याद असतात; त्या सर्व भागविणें केवळ अशक्य आहे; त्यांच्या मानाने कितीहि पैसा केव्हाहि अपुराच पडणार. म्हणून तर काटकसरीचा प्रश्न उपस्थित होतो. रोजच्या खाण्यापिण्यावरील खर्चास प्राधान्य देऊन उरलेल्या पैशांतूनच कपडेलत्ते, शिक्षण, करमणूक, इत्यादींवर खर्च करतां येतो. त्यानंतर सुखसोयींचा व चैनीचा क्रमांक लागतो.

प्राथमिक गरजा न भागवतां एकदम चैनीकडे उडी घेणारा मनुष्य खोटी काटकसर करीत असतो; परंतु अशी चैन त्याला फार दिवस करतां येत नाही आणि पूर्वीपेक्षाहि हलाखी प्राप्त होते. ह्याकरिता खर्चाच्या पायऱ्या क्रमाक्रमानेच चढल्या गेल्या पाहिजेत. मुलांच्या शिक्षणाची आबाळ करून सिनेमा व सिगारेटवर खर्च करणें केव्हाहि चुकीचेंच. त्याचप्रमाणे, मुलांच्या योग्य विकासाकडे दुर्लक्ष करून वा त्यांच्या बिघडलेल्या डोळ्यांसाठी चष्मा घेण्याची अळंटाळ करून त्यांच्या मुंजीसारख्या प्रसंगावर बेसुमार खर्च करण्यांत काय हशील ?

आज हातांतून जाणारा पैसा ‘खर्च’ स्वरूपाचा वाटतो; पण तो खर्च जर भांडवली स्वरूपाचा असेल व त्या भांडवलावर चांगला नफा सुटणार असेल तर त्या खर्चांतून खरी काटकसर साधेल. शिवण्याच्या यंत्राचीच गोष्ट घ्या. घरांत दोन–चार मुलें असतील व त्यांचे आणि स्वतःचे कपडे मुलांची आई स्वतः शिवणार असेल तर शिवण्याचें यंत्र विकत घेणें निश्चितच फायदेशीर ठरेल. त्यामुळे शिंप्याला द्यावी लागणारी शिलाई वांचेल व कालान्तराने यंत्राची किंमत भरून निघेल. त्यानंतर तें यंत्र मोफत शिवणकाम करीत राहील. पैसे वांचण्याच्या फायद्यांत काटकसरीच्या व स्वावलंबनाच्या आनंदाची भर पडेल. यंत्र न वापरतां शोभा म्हणून जर तें ठेवलें तर मात्र गोष्ट वेगळी. स्वतःचीं छोटीं घरें बांधणाऱ्या मध्यम वर्गीयांची घरांतील गुंतवणूकहि खऱ्या काटकसरीच्या स्वरूपाची असते; अर्थात् बांधलेलें घर त्यांच्या आवाक्यांतील असलें

पाहिजे. रेडिओ, विजेचा पंखा, इत्यादि उपकरणीं काटकसरीचीं ठरतील किंवा नाही हें त्यांचा उपयोग करण्याच्या पद्धतीवर अवलंबून राहील. त्यांच्या वापरामुळे सौख्य वाढून कार्यक्षमतेंत भर पडली पाहिजे. पण डोक्यावर पंखा आणि बाजूस रेडिओ चालू ठेवून गोष्टी वाचत लोळणाऱ्या, पत्ते कुटीत बसणाऱ्या स्त्री-पुरुषांना तात्कालिक आराम मिळाला तरी त्याचें खऱ्या काटकसरीच्या कसोटीवर समर्थन करतां येईलच असें नाही.

घरांत नळाचें पाणी आहे म्हणून तो नळ कायमचा सोडून ठेवणें कितपत योग्य होईल? त्याचप्रमाणे, घरीं रेडिओ आहे म्हणून सकाळ–दुपार–संध्याकाळ–रात्र तो चालूं ठेवणें श्रेयस्कर नाही. रेडिओ ऐकण्यापासून आपला फायदा होईल, शरीराची व मनाची झीज भरून येईल, इतपतच त्याचें आपल्या आयुष्य-क्रमांत स्थान आहे. वीज काटकसरीने वापरली तरी विजेचें बिल फार कमी होणार नाही म्हणून दिवे नकोत तेव्हा जळत ठेवणें योग्य नव्हे. काटकसरीच्या चांगल्या सवयी लागण्यासाठी अशा लहानसहान, निरुपद्रवी वाटणाऱ्या गोष्टींपासूनच प्रारंभ केला पाहिजे. ज्यांच्याजवळ त्यांच्या लायकीपेक्षा अधिक पैसा आहे त्यांनी पाहिजे तर रेफ्रिजरेटरमध्ये बोरें आणि सीताफळें खुशाल ठेवावींत; कारण त्यांच्या प्राथमिक वा अधिक महत्त्वाच्या गरजा भागलेल्या असतात; काटकसर करणेंच त्यांना कमीपणाचें वाटावयाचें!

येथे व्यापक स्वरूपाचा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. माझ्याजवळ भरपूर पैसा आहे म्हणून मीं तो कसाहि खर्च करावा; शेजारी अर्धपोटी असतांना मीं परदेशांतून खाद्य–पेयें मागवावींत, नातेवाइकांना उपाशी ठेवून मी चैन करावी, देशाच्या आर्थिक विकासासाठी पैशाची गरज असतांना मीं माझ्या पैशाची उधळपट्टी करावी, हें यापुढे समर्थनीय ठरणार नाही. जबाबदारीने वागणारा मिळवता मनुष्य एकट्या स्वतःवरच कांही सबंध पगार खर्चून टाकीत नाही; त्याच्या

कुटुंबांतील घटकांचाहि त्या पगारावर हक्क असतो. त्यांच्या मानाने तो स्वतःवर थोडा अधिक खर्च कदाचित् करीलहि; पण मर्यादेबाहेर जाणें त्याला इष्ट वाटणार नाही. जरूरीप्रमाणे कौटुंबिक खर्चावरहि त्याला मर्यादा घालावी लागेल आणि आपल्या देशबांधवांच्या हितासाठी सरकारला शिलकी पैसा उपलब्ध करून द्यावा लागेल. मला परवडतें म्हणून जरूर नसतांनाहि मीं मोटार घेणें समर्थनीय नाही; तो पैसा सरकारला कर्जरूपाने देणें हेंच निदान सद्यःस्थितींत तरी माझें कर्तव्य ठरतें आणि तीच खरी काटकसर होय. व्यक्ति आणि कुटुंबें आपण होऊन असें वागणार नाहीत तर त्यांना खऱ्या काटकसरीचे धडे सक्तीने शिकवावे लागतील. असा काळ कांही फार लांब नाही.

स्वदेशी जिनसा वापरण्याचा निश्चय, हा व्यापक काटकसरीचाच एक प्रकार होय. आज स्वदेशी जिन्नस कदाचित् महाग पडेल किंवा त्याचा दर्जाहि समाधानकारक नसेल; पण कालान्तराने तो स्वस्त व चांगला मिळूं शकेल आणि त्यांतच सर्वांचें कल्याण आहे. संरक्षक जकातींचा उद्देश अगदी हाच असतो. दूरदृष्टीने पुढील पिढ्यांसाठी हा अल्पसा त्याग करणें जरूरच असतें. उद्योगधंद्यांच्या वाढींतूनच व्यापार निर्माण होतो. देशी उद्योगधंद्यांना कोणत्याहि प्रकारें हातभार न लावतां त्यांत आपल्या मुलांसाठी नोकऱ्या मागणाऱ्या लोकांनी स्वतःच्या वर्तनाची छाननी करणें खासच उपकारक होईल.

प्रत्येक बाबीवर आवश्यक तेवढा खर्च करणें व्यक्तींना, कुटुंबांना व सरकारला शक्य होत नाही; म्हणून तर काटकसरीचा प्रश्न उपस्थित होतो. चलतीच्या काळांत सरकार भव्य इमारती उभारतें व त्यांचे दर्शनी भाग सजवितें खरें; पण पुढे मंदीच्या काळांत त्या इमारतींचीं फुटकीं तावदानें बदलणेंसुद्धा शक्य होत नाही. इस्पितळांच्या प्रचंड इमारती पण आंत खाटांच्या अभावीं रुग्ण मात्र फरशीवर पडलेले, हें कशाचें द्योतक समजावयाचें ? औषधासाठी पुरेसा पैसा नसतांना बगीचावर

मोठ्या रकमा खर्ची टाकणें व रुग्णांची आबाळ होऊं देणें सुबुद्ध काटकसरीचें लक्षण खास नव्हे. डोंगरांतून बोगदा खणणें अति खर्चाचें म्हणून डोंगरांना वळसे घेत आगगाडीचे रूळ घातले तर १० मैलांच्या प्रवासासाठी २५ मैलांचा फेरा पडतो. यामुळे रेल्वे रस्ता स्वस्तांत झाला तरी त्या रस्त्याचा वापर करणाऱ्या उतारूंना व मालाला, म्हणजेच अखेर सर्व समाजाला व पर्यायाने देशाला प्रत्येक वेळीं अडीच पट भाडें भरावें लागतें व अडीचपट वेळ खर्चावा लागतो. भांडवली स्वरूपाच्या खर्चाची तात्कालिक काटकसर अखेर ह्या हिशेबाने अंगलटच येते.

पहिल्या महायुद्धानंतर नव्या जर्मनीची निर्मिति करतांना तेथील सरकारने बेकारी निवारणाचा एक उपाय म्हणून मोठमोठे हमरस्ते तयार केले. शक्य तितकें काम यंत्रांच्या साहाय्यावाचून करावयाचें, असें ह्यांत धोरण होतें. तथापि, ह्या रस्त्यांमुळे मोटारवाल्यांच्या वेळांत, वाहनास लागणाऱ्या जळणांत व यंत्रांच्या झिजेमध्ये बचत होऊं लागली हा फायदा काय कमी झाला? मोटारवाल्यांना अधिक कर देणें परवडूं लागलें व सरकारचेंहि उत्पन्न वाढलें; हमरस्त्यांची योजना सर्वच दृष्टींनी खऱ्या काटकसरीची ठरली. योग्य माणसाला भरपूर मोबदला देणें, नोकरांना व कामगारांना किमान सुखसोयी उपलब्ध करून देणें, जुनीं यंत्रें बदलण्यासाठी मोठा भांडवली खर्च करणें, तज्ज्ञ तयार करण्यासाठी त्यांच्या शिक्षणाची तरतूद करणें, देश स्वावलंबी बनविण्यासाठी आज महाग वाटणाऱ्या पण अखेर किफायतशीर ठरणाऱ्या योजना आंखणें, ह्या सर्व गोष्टी खऱ्या काटकसरीच्याच स्वरूपाच्या आहेत.

योग्य वेळीं योग्य खर्च करणें व अयोग्य खर्च टाळणें, त्याचप्रमाणे खर्चांचा योग्य अनुक्रम लावणें प्रत्येकासच नेहमी साधेल असें नाही. प्रत्येकाच्या आवडी-निवडीस व प्रयोगांस थोडाफार वाव मिळणें जरूरच आहे. पण सर्वसाधारण धोरण असें पाहिजे की, रुपयाचे किमान

सतरा आणे व्हावेत किंवा त्याच मोबदल्यासाठी कमी खर्च करावा लागावा. काटकसरीचा विचार करीत असतांना केवळ पैशाचाच हिशेब करणें मात्र चुकीचें होईल. समाधान हेंच आपलें ध्येय असावयास पाहिजे; तें प्राप्त करीत असतांना कांही वेळा आर्थिक दृष्ट्या काटकसर साधणारहि नाही. केवळ पैशानेच सुख लाभत नसलें तरी आर्थिक समाधान हाच बहुंशीं सर्व समाधानाचा पाया असतो आणि म्हणूनच त्यावर एवढा भरहि दिला जातो. आई, पत्नी किंवा अपत्य ह्यांच्याविषयी प्रेम अथवा समाजसेवा ह्यांचा प्रभाव इतका मोठा असूं शकेल की पैसा त्यापुढे तुच्छ वाटावा. अशा वेळीं पैसा गेला आणि हाल-अपेष्टा भोगाव्या लागल्या तरी मानसिक समाधानावर मनुष्य संतुष्ट असतो. ह्यालाहि खरी काटकसर म्हणणें रास्त होईल.

•

आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक बाबतींत विवेकी काटकसर अमलांत आणावयाची आणि व्यापक क्षेत्रांत मात्र हें धोरण सोडून द्यावयाचें, ही वृत्तिहि उपयोगी नाही. काटकसरीचे नियम सार्वजनिक जीवनांत, संस्थांत, म्युनिसिपालिट्यांत, सरकारी खात्यांत, एवंच सर्वत्र पाळण्यांत आले पाहिजेत. आपल्या वागण्यामुळे इतरांचाहि वेळ व पैसा वांचावा आणि सोय व्हावी; कामें चांगलीं व सत्वर व्हावींत असाच प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. सरकारी किंवा सार्वजनिक काम म्हणजे खर्चाचें व दिरंगाईचें, ही समजूत ह्यापुढे खोटी ठरावयाला पाहिजे. ह्या कामांत ज्या मानाने कार्यक्षमता निर्माण होईल त्या मानाने नवीं नवीं कामें हातीं घेण्यास वाव राहील आणि जनतेला करांचा व त्यागाचा जास्तीत जास्त मोबदला मिळेल. मोठ्या धरणाचें बांधकाम १० कोटि रुपयांऐवजी ८ कोटि रुपयांत पूर्ण झाल्यास २ कोटि रुपये दुसऱ्या एखाद्या कामासाठी उपयोगी पडतील; इतकेंच नव्हे तर व्याजाचा बोजाहि २०% कमी होईल. धरणाच्या बांधकामाचा भांडवली-खर्च कमी झाला म्हणजे त्यांतून शेतीसाठी सोडावयाचें पाणी कमी दराने देतां येईल आणि

बींजहि स्वस्त दराने पुरवितां येईल. स्वाभाविकच, शेतकऱ्यांच्या व कारखानदारांच्या उत्पादन-खर्चांत बचत होऊन आर्थिक प्रगतीस हातभार लागेल. तात्कालिक स्वार्थ बाजूला ठेवून काटकसरीचा हा व्यापक दृष्टिकोन सर्वांनीच ध्यानांत बाळगला पाहिजे.

ह्या सर्व विवेचनाप्रमाणे सर्व लोक काटकसर करूं लागले तर पैसा खेळता राहणार नाही आणि कित्येक लोकांना मिळणारा कामधंदा नाहीसा होईल, अशी शंका येण्याचा संभव आहे. परंतु, सरकारी खर्चांतील काटकसरीमुळे तशी आपत्ति केव्हाहि ओढवणार नाही. व्यक्तिगत काटकसरीचाहि अनिष्ट परिणाम होणार नाही. लोकांनी पैसा खर्च न करतां तो शिल्लक टाकावा इथपर्यंतच काटकसरीचा अर्थ मर्यादित घेऊं नये. जो पैसा उरेल तो इतर गरजा भागविण्यासाठी कार्यक्षमतेने वापरावयाचा आणि उपलब्ध संपत्तीचा अधिकाधिक फायदा घ्यावयाचा हाच खऱ्या काटकसरीचा हेतु आहे. त्यामुळे कोणाचाहि कामधंदा कमी न होतां, उलट बचतीच्या योग्य उत्पादक वापरामुळे रोजगारांत वाढच होईल. चिक्कूपणा, कंजुषपणा, कृपणपणा, कद्रूपणा, ह्या सर्वांचा अर्थ 'हाताचा जड' असा आहे. शक्यतो द्यावयाचें नाही, खर्च टाळावयाचा, असें धोरण त्यांत असतें. तातडीच्या वा गरजेच्या वेळीं-सुद्धा चिक्कू मनुष्य खर्च करीत नाही आणि त्यामुळे कधी कधी नुकसान पावतो. उलट, काटकसर ह्याचा अर्थ मितव्यय; मितव्ययी मनुष्य विचारपूर्वक खर्च करतो, त्याच्या खर्चाच्या इष्टानिष्टतेची व तारतम्याची छाननी झालेली असते आणि म्हणूनच चिक्कूपणांतील दूषण मितव्ययाला लागूं पडत नाही.

काटकसरीच्या मागे लागून प्रत्येक वेळीं हिशेबी वृत्तीने वागून चालत नाही. कधी कधी, कांही कांही बाबतींत जरा सैल हाताने खर्च करणें चुकीचें होत नाही; हितावहच ठरतें. आयुष्यांतील मौज नाहीशी करून केवळ कार्यक्षमतेवर भर दिल्याने जीवन रुक्ष व नीरस नाही का होणार?

तेव्हा खर्चाचा अनुक्रम थोडा-फार बदलून, प्रसंगविशेषीं चैन करून, विरंगुळा निर्माण करण्यासाठी थोडा रुचिपालट करून, विनोद व हौस ह्यांनाहि योग्य तो वाव दिला पाहिजे; माणुसकी सोडतां कामा नये. सामाजिक रूढ कल्पनांच्या आहारीं न जातां, योग्य मर्यादेंत वागून आपण आपलीं वैगुण्यें झाकूं शकतों. सिगारेटच्या झुरक्यांत आर्थिक आपत्ति विसरली जाणें शक्य असतें; त्यामुळे आपत्तींत भर मात्र पडतां कामा नये. देवघरांत समई लावल्याने, मंदिरांत देवापुढे पैसा ठेवल्याने, आंधळ्या–पांगळ्यांस अधूनमधून दान दिल्याने किंवा गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला पैशाची मदत केल्याने लाभणाऱ्या समाधानाची तुलना त्या पैशांत मिळणाऱ्या व्यावहारिक मोबदल्याशीं होऊंच शकणार नाही.

खरा प्रश्न तारतम्य सांभाळण्याचा आहे आणि हें ज्याला साधेल तो स्वतः सुखी होईल, कुटुंबियांना सुखी करील व देशाच्या उद्धारासहि हातभार लावील. प्रत्येकाच्या आवडीनिवडीप्रमाणे खर्चाच्या व काट-कसरीच्या बाबी वेगवेगळ्या असूं शकतील; पण त्या सर्वांच्या मुळाशीं विवेक आणि तारतम्य हीं असावयास पाहिजेतच. तत्त्व लक्षांत आणून त्यापासून एखाद्या वेळेस च्युत होणें निराळें आणि तत्त्वाकडे मुळीं दुर्लक्षच करून स्वैर वागणें निराळें; दोहोंत फार मोठें अंतर आहे.

—उद्यम

१०८०४

## हेकट म्हातारे आणि कडवट तरुण

आपल्या रोजच्या जीवनांत असे किती तरी प्रसंग येतात की, त्या वेळीं आपणांस दुसऱ्याच्या सहानुभूतीचा आधार हवा असतो. पोतीं भरलेली हातगाडी चढावरून वाहणाऱ्या मजुराचा शीण, त्याच्या गाडीस मागून एखाद्याने जरा हात दिला तर कमी होतो. शाबासकी व्यक्त केल्याने काम करणाऱ्यास उत्साह वाटतो. आपल्यापेक्षा वयस्कर माणसांना योग्य आदर दाखविला व त्यांच्या शारीरिक व मानसिक गरजांस जपलें तर ते संतुष्ट झाल्याविना राहात नाहीत. म्हाताऱ्यांनीहि तरुण-तरुणींच्या सोयी पाहिल्या, नव्या नव्या पद्धतीबद्दल आस्था दाखविली, एकसारखा विरोध करण्याचें सोडून दिलें, मुलांमुलींच्या राहणीवर सकाळ-दुपार-संध्याकाळ टीका केली नाही, त्यांना वास्तविक योग्य असणाऱ्या गोष्टी चोरून करण्याची त्यांच्यावर पाळी येऊं दिली नाही, तर तरुण पिढी तरी म्हाताऱ्यांना कां दोष देईल ?

"मागच्या पिढीपेक्षा आजच्या पिढीपुढील प्रश्न वेगळे व अधिक बिकट आहेत; तेव्हा आम्ही काय करीत होतों, हें उगाळीत बसून व नव्या पिढीने तसेंच वागलें पाहिजे, असा आग्रह धरून काय उपयोग?" ह्या जाणिवेचे म्हातारे आई-बाप तरुण-तरुणींना प्रिय झाल्याविना राहणार नाहीत. "आमचे दिवस जरा आरामाचे होते; बाबारे, तुम्हांला आता धकाधकीच्या जगांत टिकून राहावयाचें आहे. तेव्हा त्यांतील यशाचे मार्ग तुम्हीच शोधून काढा; जुन्या चाकोरींतून जाऊं नका" असेंच त्यांनी सांगून नव्या पिढीस प्रोत्साहन दिलें पाहिजे. पण तसें न करतां, म्हातारे लोक तरुणांच्या अडचणी जाणीत नाहीत व त्यांना न पटणारा उपदेश करीत राहतात, आणि मग त्यांची सहानुभूति गमावून बसतात.

लष्करांत दाखल होणारांमध्ये ज्या गुणावगुणांची अपेक्षा असते,

त्यांना सतत विरोध करणारे लोक उमद्या तरुणांची कुचंबणाच करतात, असें प्रत्ययास येतें. नव्या काळांतील प्रचलित गोष्टींच्या विरुद्ध वर्तन करावयास तरुणांना आग्रहाने सांगितलें, तर त्याचा परिणाम सहसा योग्य होत नाही. कांही नव्या गोष्टींचा अंगीकार तरुणांना करावाच लागतो. एखाद्-दुसरी व्यक्ति फार तर त्याला विरोध करण्याचें धाडस दाखवूं शकेल. घरीं धोतर नेसणारा, पूजा करणारा, चांगल्या स्थितींतील मुलगा माझ्या माहितीच्या एका कुरूप मुलीने नापसंत केल्याचें मला माहीत आहे; मुलगी बघावयास येणारे कांही तरुण तिची नऊवारी साडी पाहिली की, तिच्या गुणांची पुढे चौकशीहि करण्यास तयार होत नाहीत, असा अनुभव येतो! अशा परिस्थितींत 'जुनें सोडूं नका' असा आग्रह म्हाताऱ्या मंडळींनी धरणें व्यर्थ ठरतें.

जुन्याचा आणि नीतीचा संबंध म्हाताऱ्यांनी वास्तविक जोडूं नये. परदेशीय व परप्रांतीय मित्र-मैत्रिणी करण्यास त्यांनी आपल्या मुलामुलींना उत्तेजन द्यावें. आपल्या आशीर्वादाने त्यांना मिश्र समाजांत वावरूं द्यावें आणि त्यांचे प्रश्न त्यांनाचें सोडवितां येण्यास समर्थ करावें, हेंच श्रेयस्कर. मूलभूत गोष्टींबद्दल आईबापांनी अवश्य आग्रह धरावा आणि आपल्या उदाहरणानेच मुलामुलींना चांगल्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करावें. केवळ सोवळ्याने खरा धर्म टिकत नाही; त्याचप्रमाणे अंडीं खाल्ल्याने तो नाहीसा होत नाही. कौटुंबिक व सामाजिक जीवनाच्या धारणेस आवश्यक ते गुण अंगीं असणें ही बाब खऱ्या महत्त्वाची आहे; बाकीच्या गोष्टी केवळ दर्शनी स्वरूपाच्या आहेत. तेव्हा, तरुण-तरुणींच्या अडचणी व बदललेला काळ जाणून म्हाताऱ्यांनी आपले जुने पराक्रम पाल्हाळाने सांगत न बसतां नव्या जीवनाशीं समरस व्हावें व नव्या पिढीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रोत्साहन द्यावें.

तरुण पिढी आपलें ऐकण्यास तयार नाही, हें पक्कें समजल्यानंतरहि म्हाताऱ्या मंडळींनी स्वतःच्या स्वास्थ्यासाठी तरी निदान गप्प बसावयास

काय हरकत आहे ? जी गोष्ट दोन-चारदां सांगून मुलांना पटणार नाही ती हजारदां अधिकाधिक आग्रहीपणाने सांगण्याने पटण्याचा संभव नाही; उलट कडवटपणा मात्र वाढतो आणि घरांतील वातावरण बिघडतें. कित्येक म्हातारी मंडळी नव्या परिस्थितीचें इतकें अज्ञान दर्शवितात की त्यांची कीव वाटावी. नवे नवे बिकट प्रश्न समजले नाहीत तरी ते स्वतःच्या जुन्या-पुराण्या अनुभवाच्या आधारावर सोडविण्याचा उपदेश करण्याचा त्यांचा उत्साह टिकून राहतो. अशीं माणसें सत्प्रवृत्त असलीं तरी तेवढ्याने भागत नाही. आपली मर्यादा ओळखूनच सामान्य जनांनी विचार व आचार यांस कलाटणी दिली पाहिजे. पण तसें न करतां, किती तरी जुने लोक आत्यंतिक मतें, काळ-वेळ न पाहतां प्रदर्शित करतात; त्यांची प्रतिक्रिया म्हणून नवी पिढी कुत्सित उद्गार काढते. म्हणून, जुन्या पिढीने अधिक समजूतदारपणा व प्रसंगाची जाणीव दाखवावी.

सर्वच तरुण-तरुणींचा मार्ग नेहमी बरोबर असतो असें म्हणणें हास्यास्पद होईल. परंतु तरुण पिढीवर एकजात टीका करणाऱ्यांविषयी सर्वसामान्य तरुणाचा ग्रह प्रतिकूल होणें स्वाभाविक नाही काय ? केव्हा केव्हा, कांही म्हाताऱ्यांना असें आव्हान द्यावेसें वाटतें की, त्यांनी तरुण होऊन व स्वतःचा उपदेश स्वतः अमलांत आणून दोन वेळ पोटास देणारी एखादी नोकरी आणि बऱ्यापैकी बायको मिळवून दाखवावी !

बदललेल्या परिस्थितींत जुने सिद्धान्त लागू पडत नाहीत, हें पटवून घेण्यासच असे म्हातारे तयार नसतात. मात्र, त्यांच्या उपदेशामागील त्यांचा शुद्ध हेतु लक्षांत घेऊन, तरुणांनी त्यांचा अनादर न करणें श्रेयस्कर होईल.

—केसरी

## संसारांतील सारंगी

: ९

स्कॉटलंडमधील तीन गिर्यारोहक स्त्रिया हिमालयांतील जुगल-हिमल पर्वत-रांगेंतील २०,००० ते २३,००० फूट उंचीचीं शिखरें चढण्यासाठी निघाल्या आणि त्यांचीं चित्रें व प्रवासाच्या तयारीचीं वर्णनें वृत्तपत्रांत छापून आलीं, तेव्हा लोकांत बरीच कुतूहलपूर्ण चर्चा झाली. पाश्चात्य देशांतील स्त्रियांचें 'पुढारलेल्या' हिंदी स्त्रिया रंगसंगति व फॅशन एवढ्यापुरतेंच भ्रष्टानुकरण करतात; पण त्यांची धडाडी व कर्तबगारी हीं मात्र त्या विसरतात, अशी त्या संबंधांत टीका ऐकूं आली.

पाश्चात्य स्त्रिया पुरुषांशीं बरोबरी करतांना दिसतात, तें घराबाहेरच्या व्यापक क्षेत्रांत; घरांत पत्नीचा प्रयत्न पतीला संतुष्ट राखण्याचा सतत असतो हें आपल्या येथील कित्येक सुशिक्षित स्त्रियांच्या नजरेस येऊं शकत नाही. त्यांतील कांहीजणींच्या अविवेकी वर्तनामुळे सर्वच सुशिक्षित स्त्रियांबद्दल जनमत कलुषित होण्याची भीति असते, आणि त्या कारणाने स्त्रियांच्या इष्ट प्रगतीसहि मोठाच अडथळा निर्माण होतो. एखाद्या स्त्रीच्या चुकीचा दुष्परिणाम तिच्यापुरता किंवा तिच्या कुटुंबियांपुरता मर्यादित राहात नाही. तसें झालें असतें, तर बाकीच्यांना त्याबद्दल चर्चा करण्याची आवश्यकताच उरली नसती. पाश्चात्य स्त्रियांनीं आपलें सामर्थ्य वाढविलें, तरी लचक घालविलेली नाही आणि पुरुषांशीं वागतांना त्या त्यांच्या नैसर्गिक गुणदोषांचा विचार करूनच त्यांचा आधार मिळवितात; पुरुषाशीं बरोबरी न दाखवितां स्त्रीत्वाचा मारा करून त्यांचेकडून आपलें साधून घेतात. आपल्या इकडील फार पुढे जाऊं पाहणाऱ्या स्त्रियांनी पति-पत्नीच्या नात्याचें आकलन करून घ्यावें आणि नाजुक हत्यारांचें महत्त्व विसरूं नये; भलत्या महत्त्वाकांक्षेस बळी पडणें योग्य नाही. त्यांनी घरांत स्पर्धेपेक्षा सहकार्याचा मार्ग अवलंबिणें इष्ट होईल; पाश्चात्य स्त्रियांचें ह्या बाबतींत पुरें अनुकरण

२११३८ दि. १ कि० १५ १०५६३ नों० दि: ३/७/२१५६

केलें तर केवळ दोषच उचलले जाणार नाहींत आणि पुरुषांचीहि मग तक्रार उरणार नाही. पण तसें घडतेंच असें नाही.

गायक गाणें गातो, तेव्हा त्याला तबला, सारंगी, इत्यादि वाद्यांची साथ असते. गायकाच्या सुराबरहुकूम सारंगीवाला सारंगी वाजवतो आणि तबलजी तालाच्या आवर्तनाचे बोल काढतो. गाणें व साथ हीं एकरूप होऊन जातात. गायक आणि साथीदार ह्यांची एकतानता झालेली असते आणि त्यामुळे कोण कोणाचें अनुकरण करतो, हें अनभिज्ञाला समजतहि नाही. साथ अनुरूप नसेल, तर गायक चांगला असला तरी गाण्याचा विचका होतो. साथीचें इतकें मोठें महत्त्व असलें, तरी अखेर तिच्यापेक्षा गायकाचेंच श्रेष्ठत्व मान्य केलें जातें. बैठकीचें नेतृत्व गायकाकडेच असतें व त्याच्या कलानुसार साथीदार त्याला पुष्टि देत असतात, गायकाच्या सूचना ते पाळतात; गाण्याला साथ ही पोषक असते. म्हणूनच साथीदाराचें महत्त्व मान्य करूनहि गायकालाच बैठकींत मानाची मधली जागा दिली जाते.

पति-पत्नीच्या संबंधांत हा दाखला उपयोगी पडण्याजोगा आहे. संसारांत त्या दोघांचा पूर्ण एकोपा झाला पाहिजे व दोघांनीहि एकमेकास पुष्टि दिली पाहिजे. तरीपण, त्यांतल्या त्यांत एकालाच, बहुधा पतीलाच, गायकाप्रमाणे मार्गदर्शकाची भूमिका सामान्यतः मिळणें स्वाभाविक ठरतें. गायकाचें गाणें जरा अशुद्ध झालें, तरी साथ करणारे वाद्यकार स्वतःच मिळतें घेऊन गाण्याला अनुरूप असें वादन करतात व संभाळून घेतात; बैठकीचा बेरंग होऊं न देण्याची ते दक्षता बाळगतात. पत्नीने त्यांचें अनुकरण करून संसारांतील गोडी बिघडूं न देणें श्रेयस्कर होय.

ब्रिटिश व अमेरिकन मासिकांतील कौटुंबिक जीवनावरील लेखांची आपण छाननी केली, तर त्या लेखांपैकी बहुतेकांचा कल एकतर्फी दिसतो आणि पत्नीने पतीला संतुष्ट करण्यासाठी काय काय केलें पाहिजे ह्याचा पाढा वाचलेला असतो; पतीला त्या मानाने फारच कमी

सूचना दिलेल्या असतात, असें आढळतें. आपल्या येथील कित्येक अननुभवी, तरुण, सुशिक्षित स्त्रिया पति-पत्नीच्या समानतेचा आत्यंतिकपणें आक्रोश करीत असतांना पाश्चात्य मासिकांतून पत्नीलाच मिळतें घेण्याचा उपदेश केलेला पाहिला म्हणजे प्रथम जरा आश्चर्य वाटतें. पति-पत्नीचें नेहमी एकमत होणें जरूर आहे. दोघांनीहि तारतम्याने थोडें नमतें घेऊन तडजोड केली पाहिजे. पण दोघांमध्ये यदाकदाचित् एकमत होऊं शकलें नाही, तर पत्नीनेच पतीशीं आपण होऊन सहमत व्हावें, असा त्या मासिकांतील कित्येक लेखांचा आशय असतो. आपल्या कांही पुरोगामी स्त्रिया पुरुषांच्या सुसंस्कृतपणास आव्हान देऊन, त्यांनाच लज्जेखातर मिळतें घेण्यास लावण्याचा प्रयत्न करीत असलेल्या दिसतात. पुरुषाने त्याबाबत थोडीशी तक्रार केली की, त्यास पुराणपुरुष ठरवून त्याला त्या दोष देत राहतात.

स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांच्या बालेकिल्ल्यांतच, स्त्रियांना लवचिकपणाचा कानमंत्र सांगितला जातो, हें वरवर पाहणारांस चमत्कारिक दिसतें. पाश्चात्यांमधील विवाहपूर्व जीवन कसेंहि असलें, तरी पति आणि पत्नी हे मात्र एकमेकांना विशेष जपतांना आढळतात. वैवाहिक जीवनांत दोघेहि एकमेकास एकटे सोडण्याला मुळीच तयार नसतात. कोणीहि एकजण दुसऱ्याच्या भावना निष्कारण दुखवूं लागला, तर त्या दुसऱ्याला सुटका करून घेण्याचा मार्ग मोकळा असतो. तेथील स्त्रियांना नोकरी करून स्वतंत्रपणें, मानानें, सुखांत राहतां येणें शक्य असल्यामुळे त्या बाणेदारपणा व स्वाभिमान दाखवूं शकतात. असें असूनहि तेथील स्त्रियांनाच पुरुषांसाठी नटण्याची, त्याला आकृष्ट करण्याची, त्याची सदान्कदा मर्जी संभाळण्याची आवश्यकता असते व त्या दिशेने मार्मिक मार्गदर्शन व तपशीलवार सूचना तिकडील मासिकांतून नेहमी येत असतात, असें कां व्हावें ?

पति आणि पत्नी या दोघांच्यामध्ये श्रेष्ठ कोण व कनिष्ठ कोण

ह्याची चिकित्सा करणेंच चुकीचें होईल. ते दोघे एकमेकांचे स्पर्धक नसतात; तर पूरक, न्यूनता घालविणारे सहचर असतात. असें असलें तरी, कांही नैसर्गिक व परंपरागत कारणांमुळे पत्नीलाच पतीच्या आधाराची आवश्यकता जास्त भासते; आणि त्याचे पडसाद रोजच्या व्यवहारी जीवनांत उमटल्याविना राहात नाहीत. अमेरिकन स्त्रीला तिच्या पतीची जेवढी गरज, तिच्यापेक्षा हिंदी स्त्रीला तिच्या पतीची गरज किती तरी पटींनी अधिक असणार. कारण, येथे बहुधा पतीच फक्त पैसा मिळवूं शकत असल्याकारणाने आणि पत्नी ही सामान्यतः अर्थोत्पादनास असमर्थ असल्यामुळे तिचें पतीवरील अवलंबन स्पष्ट दिसून येतें आणि पतीहि ह्या परिस्थितीचा अवास्तव फायदा घेऊन नवरेपणा गाजवूं शकतो. " आम्हीं बाहेर कामें करून पैसा कमावतों, तेव्हा आमची मिजास पत्नीने संभाळलीच पाहिजे," अशा थाटाचे उद्गार कित्येक पतिराज काढीत असतात आणि पत्नीला अगदी दुय्यम स्थान देऊन तिला राबवितात. सुसंस्कृत पति ही भूमिका लपवूं शकतात, पण कधीकधी सत्य बाहेर पडल्याविना राहात नाही. पत्नीचे दोष पति बेगुमानपणें वाढवून दाखवतो, पण पतीविरुद्ध बोलणें पत्नीला सहसा शक्य होत नाही.

पति कसाहि असला, तरी पत्नीला त्याच्याशीं मिळतें घेणें भागच पडतें; पतीखेरीज तिला दुसरा कोणीच त्राता नसतो. पतीशीं पत्नीचें जमलें नाही व त्याबद्दल ती स्वतःच्या आई-वडिलांकडे तक्रार करूं लागली, तर माहेरालाहि ती अंतरते, असें कित्येक ठिकाणीं आढळतें. घटस्फोट कांही विशिष्ट परिस्थितींत कायद्याने शक्य असला, तरी घटस्फोटित स्त्रीला नवें आयुष्य सुरू करणें अत्यंत अवघड; अशा परिस्थितींत पत्नी पतीच्या अपेक्षेप्रमाणे लवचिक राहिली नाही, तर तें हितावह ठरतेंच असें नाही.

कित्येक सुजाण पति आपल्या पत्नीला योग्य तें स्थान देऊन

संसारांतील तिच्या भूमिकेच्या महत्त्वाची जाणीव दाखवितात, हें खरें आहे. तथापि जेथे फक्त पुरुषच पैसा मिळवूं शकतात व स्त्रियांना त्यामुळे त्यांची लहर संभाळण्याची पाळी येते, तेथे कसोटीच्या वेळीं हें नातें टिकाव धरणें कठीण. बेकारी आणि हलाखी वाढली, म्हणजे मिळवत्या पतीचा भावहि वाढतो आणि त्याच्यांत सुसंस्कृतपणाचा अभाव असेल तर पत्नीला तिच्या दुबळेपणाची जाणीव वरचेवर करून दिली जाते, असें कित्येक कुटुंबांतून चालतें. वास्तविक, पुरुषांनी ह्या परिस्थितीचा अवास्तव फायदा घेऊं नये व स्त्रियांना न्याय्य मान व महत्त्व द्यावें हें इष्टच आहे. पण पुरुष हा स्वभावतःच स्वैर वागणारा व बेजबाबदार असतो, तर स्त्री ही सामान्यतः पतिनिष्ठ व प्राप्त परिस्थितींत समाधान मानण्याचा प्रयत्न करणारी असते. पतीला पत्नीची जेवढी गरज त्यापेक्षा पत्नीला पतीची गरज अधिक असते, हें त्यांच्या वागण्यावरून सहजच दिसून येतें.

अमेरिकेसारख्या देशांतहि पुरुषाचा नैसर्गिक अडदांडपणा लक्षांत घेऊन, पत्नीलाच अधिक समजूतदारपणें वागण्याची पाळी येते, तर आपल्या समाजांत ती तशी न आली तरच नवल. जितका देश मागासलेला, तितका पुरुषाचा तोरा अधिक; स्त्रीचें त्यावरील अवलंबन जास्त. हें लक्षांत घेऊनच केवळ 'शिकलेल्या' म्हणूनच समान हक्कांच्या मागे लागलेल्या स्त्रियांनी आपल्या मागण्यांचा अतिरेक करूं नये व वागणुकींत तोल सोडूं नये, हें श्रेयस्कर होय.

पतीचा मान राखून त्याला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करणें आपल्या स्त्रिया धर्मच मानीत आलेल्या आहेत. पतीच्या मनोदयाप्रमाणे त्याच्या आज्ञेंत वागणें व त्याला देव मानून त्याची अखंड सेवा करणें, हें पातिव्रत्याचें लक्षण समजलें जात असें. प्रत्येक पत्नीने अशा रीतीने आताहि नेहमी वागावें, असें कोण म्हणेल? सुशिक्षित स्त्रियांना तें पटणार नाही व कित्येक पतींना त्यांच्या पत्नीने त्यांची गुलामाप्रमाणे

सेवा केली, तर आवडणारहि नाही. पत्नीचें स्वतंत्र व्यक्तित्व मान्य करण्यास सुसंस्कृत पति तयार असतात. पत्नीने स्वतःचें विरोधी मत व्यक्त केलें आणि कधी कधी पतीशीं हास्यविनोद-वाद करून त्याच्यावर तिने कुशलतेने मात केली तरी सुद्धा तें त्याला हवें असतें. तथापि, तें ठराविक मर्यादेपलीकडे गेलेलें त्याला सहसा खपणार नाही.

पत्नीचा तिच्या नोकरींत किंवा व्यवसायांत उत्कर्ष झाला तर पतीला त्याचा फायदा हवा असतो, पण त्या उत्कर्षाचें केलेलें प्रदर्शन त्याला सहजासहजीं सहन होत नाही असें आढळतें, त्याचें तरी रहस्य हेंच आहे. मुलीला चांगलें गातां येतें यासाठी तिची पत्नी म्हणून निवड केली, तरी तिचें गाणें विवाहानंतर तो बंद पाडून तिचा हिरमोड करतो व तिचा विकास थांबवतो. तोच पति कालान्तराने बिकट आर्थिक परि-स्थितीच्या दडपणाखाली तिच्या गाण्याचे कार्यक्रम ठरविण्यासाठी हेलपाटे घालूं लागतो, ही गोष्ट तरी काय दर्शविते ?

अमेरिकेंत, पत्नीने पतीच्या मनोदयाप्रमाणे वागण्यास व्यावहारिक तत्त्वज्ञानाचा मुलामा देण्यांत येत आहे. भारतीय पत्नीने पतीचा शब्द परंपरागत कर्तव्य म्हणून झेलणें आणि त्यांत हित आणि स्वार्थ आहे व तसें न करण्यांत नुकसान आहे ह्या शिकवणीने अमेरिकन पत्नीने पतीशीं लाडीगोडी करणें, ह्यांत परिणामाच्या दृष्टीने कांहीहि फरक नाही. जुना धोपट मार्ग आणि स्वतःचें हित साधण्यासाठी घेतलेलें सोंग हीं वस्तुतः एकच आहेत. तेव्हा, जुनी गुलामी वृत्ति सोडणाऱ्या आपल्या स्त्रियांनी कार्यकारण भावाचें ज्ञान करून घेऊन आपल्या आचारांस वळण लावलें पाहिजे, अशी गुप्त मसलत भरधाव पळणाऱ्या गृहिणींना द्यावीशी वाटते. मारक्या बैलाचीं शिंगें पकडण्याची धडपड करण्याऐवजी त्याला गवताची पेंडी दाखवून किंवा तळहातावरील पेंड त्याला चाटायला देऊनच काबीज करावें लागतें, हें काय सांगावयास पाहिजे ? संघर्ष टाळून, पतीला मोहून टाकूनच आपलासा करण्याची कला हस्तगत

करण्याचें बाळकडूच स्त्रियांच्या अंगीं सामान्यतः असतें; तें त्यांनी विसरतां कामा नये.

नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या पत्नीची मिळकत कुटुंबाच्या घरखर्चाला आवश्यक असली तरी पतीचें तेवढ्याने समाधान कसें होणार? त्याला तिचें स्त्रीत्वहि हवें असतें. समान हक्कांच्या खटाटोपांत स्त्रियांनी ह्या स्त्रीत्वास गमावून बसून चालणार नाही. त्यांचें पुरुषीकरण झालें, तर त्यामुळे संसारांतील रम्यता नाहीशी होऊन जाईल. मोठमोठ्या हुद्यांवरील हुशार व कर्तबगार स्त्रियांनीहि, पुरुषांशीं चर्चा व वाटाघाटी करतांना आपलीं बायकी हत्यारें वापरलीं नाहीत, तर त्यांचा प्रभाव पडत नाहीं, असाच अनुभव आहे.

पति आणि पत्नी ह्यांच्यामधील नर-मादीचा नैसर्गिक फरक कृत्रिम आवरणांनी कितीहि लपविला, तरी अखेर तो प्रभावी ठरल्याविना राहात नाही. पत्नीपेक्षा पति हा भारी, सशक्त आणि वरचढ असा असतो; आणि गर्भधारणेची जबाबदारी पत्नीवरच येऊन पडते. जनावरें, पक्षी, इत्यादींतील स्त्री-पुरुष जातींचे गुणदोष मानवांतील स्त्री-पुरुष जातीं-मध्येहि आढळणें स्वाभाविक आहे; सांस्कृतिक व आर्थिक प्रगतीमुळें स्त्रियांचा कमकुवतपणा लपला गेला तरी तो नाहीसा होऊं शकत नाही. तागडीच्या दोन पारड्यांइतका समतोलपणा पुरुषांनी मान्य केला तरी तो हिताचा व व्यवहार्य ठरत नाही.

बॅडमिंटन किंवा टेनिस खेळणारांच्या अनुभवाची गोष्ट आहे की, दोन्ही भिडूंपैकी एक जरा अधिक चांगला खेळणारा व नेतृत्व पत्करणारा असला तर दुसरा त्याच्याशीं स्वाभाविकच मिळतें घेतो व त्या दोघांचें सहकार्य चांगलें जमतें. क्रिकेटच्या सामन्यांत फलंदाजांच्या जोडींतील एक खेळाडू जेव्हा आवेशयुक्त खेळ खेळून धावांची संख्या भराभर वाढवितो, तेव्हा त्याचा तितकाच तरबेज जोडीदार जरा संथ खेळतो व त्याला मुद्दामच अधिक वाव देतो. संसारांत पति-पत्नींपैकीं एकाचाच

प्रभाव जास्त पडणें, ह्यांत अनिष्ट कांहीच नाही. कांही वेळा, कांही बाबतींत, एकाचा किंवा दुसऱ्याचा आलटून पालटून वरचष्मा राहूं शकतो. तथापि, पतीच्याच कलाने पत्नीला वागावें लागतें असेंच बहुधा आढळतें. त्याचीं कारणें निसर्गविहित व व्यवहारसिद्ध आहेत.

स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण घेतलें व नोकऱ्या–व्यवसाय केले म्हणून केवळ त्यांची नैसर्गिक कोमलता नष्ट होण्याची किंवा त्यांच्या स्त्रीविशिष्ट गुणांचा लोप होण्याची आवश्यकता नाही. कांही शिकलेल्या स्त्रियांची समजूत बनते, की गृहिणी म्हणून राहाण्यापेक्षा नोकरी करून हक्काने पैसे कमाविणें अधिक मानाचें आहे; पदवीधर स्त्रियांनी बंब पेटविणें आणि शेगडी सारविणें हा त्यांच्या पात्रतेचा अपमान आहे. द्रव्यार्जन करणाऱ्या प्रत्येक पत्नीचा दर्जा सुगृहिणीच्या दर्जापेक्षा श्रेष्ठ, हा भ्रम दृढमूल होण्यास कौटुंबिक अर्थकारणाबरोबरच सुशिक्षित स्त्रियांच्या मिळवतेपणाची व हातभाराची सर्वत्र होत असलेली जाहिरात हेंहि एक जबरदस्त कारण आहे. सुगृहिणीच्या कर्तबगारीची कीर्ति गावभर पसरत नाही; पण मिळवत्या स्त्रीची माहिती साहजिकच पुष्कळ लोकांना होते आणि गृहकृत्यें व मुलांची जोपासना ह्यांच्यापेक्षा पैसे मिळविण्याच्या कामांत व घराबाहेरील खऱ्या–खोट्या मान्यतेंत ती अधिक मोठेपणा मानूं लागते.

तथापि, ही विचारसरणी दीर्घकाळ टिकत नाही आणि पत्नीला कित्येक प्रश्नांच्या बाबतींत पतीच्या, म्हणजे हक्काच्या पुरुषाच्या, मार्गदर्शनाची गरज भासूं लागते. पतीपेक्षा अधिक शिकलेली पत्नीसुद्धा दोन तासांच्या रजेचा साधा अर्ज लिहितांना पतीचा सल्ला विचारते; पति, उलट परिस्थितींत, पत्नीला कितीतरी कमी वेळा विश्वासांत घेतो! पतीच्या आसऱ्याचें महत्त्व त्यांना हळूहळू पटूं लागतें, हेंच कित्येक यशस्वी व्यावसायिक व पगारदार स्त्रिया कालान्तराने विवाहबद्ध होऊं इच्छितात, याचें अंतस्थ कारण असूं शकतें.

स्त्रिया आणि पुरुष ह्यांना प्रगत राष्ट्रांत समान हक्क असले, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया सर्व तऱ्हेचीं कामें जबाबदारीने करूं लागल्या, हिमालयाचीं शिखरें काबीज करण्यास त्या निघाल्या, थोडक्यांत म्हणजे घराबाहेरील उद्योगांत त्यांनी पुरुषांशीं स्पर्धा व बरोबरी केली, तरी पति-पत्नी या संबंधांत त्यांची भूमिका स्वाभाविकपणेंच वेगळी राहते. दांपत्यामध्ये भांडण झालें व अबोला निर्माण झाला, तर पुनः सख्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न बहुशः कोणाकडून होतो, या प्रश्नाचें उत्तर महत्त्वाचें आहे. कुटुंबांतील बेदिलीचा बभा होत नाही, याचें कारण बहुधा पत्नीचा समजूतदारपणा, हेंच असतें; बाहेरचा नाद असलेल्या पतीची पत्नीसुद्धा त्याला दुखविण्याचें टाळतें; हा पति मात्र आपल्या सुखी कौटुंबिक जीवनाचें वर्णन सहर्ष करीत सुटतो, अशीं उदाहरणें कित्येकांच्या परिचयाचीं असतील !

पत्नीच आपण होऊन, लटकेपणाने, नसलेलीहि चूक कबूल करून, पतीला लाडक्या शब्दांनी आळविते. सारंगीची साथसुद्धा गायकाला सांभाळून घेऊन, त्याच्या चुका लपवून, त्याच्या गायनाशीं मिळतें घेऊन, बैठकीच्या यशांत भर घालीत असते. सारंगीचें महत्त्व मोठें असलें, तरी बैठकीचें नेतृत्व मात्र गायकाकडेच राहिलेलें दिसतें. संसारांत स्त्रीचें स्थानहि तशाच महत्त्वाचें आहे, हें स्त्री मनांत ओळखून असते; पण तिनेच तें वरचेवर बोलून दाखविण्याने उपयोग होत नाही. पतिनेच त्याची जाणीव बाळगावी व ती व्यक्त करावी, हें उचित होय. गायक आणि साथ ह्यांच्या स्वरांचा मेळ जमला नाही, म्हणजे बैठकीचा बेरंग झालाच म्हणून समजावें. संसाराच्या बैठकींत पति हा गायक व पत्नी ही त्याची साथीदार असें मानलें तर त्या दोघांच्या सहकार्याने पण गायकाच्या म्हणजे पतीच्या नेतृत्वाखाली बैठक रंगली पाहिजे. सारंगी म्हणजे गाण्याचा अनुध्वनि होय; अशा तऱ्हेचा एकोप्याचा संसार कितीतरी सुखाचा होईल !

—*सह्याद्रि*

## कॉलेजांतील मुली आणि त्यांचे आईबाप : १०

कॉलेजांत शिकत असलेल्या मुलींपैकी कांहीं मुली स्त्री-डॉक्टरांकडे मदतीची याचना करण्यासाठी तातडीने जाऊं लागल्या आहेत व समाजहितदक्ष डॉक्टरिणींनी त्यांना सरळ विवाहाचा सल्ला दिला, तर तो मानवत नाही, अशीं उदाहरणें घडूं लागलीं आहेत. पालकांच्या अपरोक्ष, मुली भलत्या आकर्षणाला किंवा थापांना बळी पडतात व कधी कधी आवाक्याबाहेर परिस्थिति जाते, असा अनुभव येत आहे. या गोष्टींची वाच्यता सहसा होत नाही, म्हणून त्यांचें अस्तित्व नाकारणें श्रेयस्कर होणार नाही. एखाद्या मुलाच्या मागणीस, आपण काय करीत आहों याची जाणीव न राहून, मुलगी होकार देऊन टाकते. त्या मुलाची घरची स्थिति, आई-वडील-भावंडें, त्याच्या कुटुंबाचा आर्थिक व शैक्षणिक दर्जा, ह्यांची चौकशीहि तिने केलेली नसते. वास्तविक, त्या मुलाच्या मनांत लग्नाचा विचार नसतोच मुळी; आणि ज्या मुलीबरोबर तो लाडीगोडी करतो, तिला मात्र दुष्परिणाम भोगावे लागतात. "मीं वचन दिलें आहे" असें ती घोकत बसते व पुढे तिला पस्तावण्याची पाळी येते. कितीतरी मुलींच्या बाबतींत असें घडून येत आहे.

बिचाऱ्या आई-बापांना या गोष्टी फार उशिरा कळतात, कांहींच न करतां येऊन ते असहाय बनतात व मुलीच्या दुःस्थितीने विव्हळ होऊन जातात. शेकडा नव्वद-पंचाण्णव मुलींच्या बाबतींत असा अनुभव येत नसेल किंवा अशी भीति वाटत नसेल; पण उरलेल्या पांच-दहा मुलींत सरल किंवा विमल किंवा सुशील सापडणार नाही कशावरून ? केवळ काळजी करीतच बसावयाचें किंवा जाणून बुजून दुर्लक्ष करावयाचें, या दोन्ही गोष्टी करण्याची पाळी जाणत्या आईबापांवर वास्तविक येऊं नये. त्यांनी तटस्थपणाची किंवा नैराश्याची

भूमिका न पत्करतां अधिक उपकारक अशी विवेकी भूमिका स्वीकारली पाहिजे आणि खरे व खोटे धोके ह्यांचा तारतम्याने विचार करून आपल्या मुलीस योग्य मार्गदर्शन केलें पाहिजे; निदान निष्क्रियतेनें किंवा हट्टीपणाने तिचें नुकसान होऊं देतां कामा नये. इतर मुलींपेक्षा आमची बबी शहाणी आहे, हें घरीं बसून कळेलच असें नाही; तिच्या शहाणपणावर मात करूं पाहणारीं मुलें तिला भेटणार किंवा हटकणार नाहीत कशावरून ?

कॉलेजांत मुली शिकायला जाऊं लागल्या म्हणजे त्यांच्या आई-बापांना, विशेषतः आयांना, एक प्रकारची काळजी वाटूं लागते; मुलींना तेथील मुलां-मुलींत वावरतां येईल का ? त्या स्वतःचें संरक्षण करूं शकतील का ? वास्तविक पाहतां, घराबाहेरचें जग माहीत नसणाऱ्या आयांना खरे धोके समजत नाहीत. उलट, त्या नसत्या धोक्यांचा बागुलबोवा करीत बसतात आणि प्रत्यक्ष अनुभवापेक्षा काल्पनिक भीतीनेच त्या गांगरून जातात. मुलीला घरीं येण्यास थोडा उशीर झाला की त्यांच्या मनांत नाना प्रकारचे विचार घोळूं लागतात.

मुलींचीं लग्नें जमणें कठीण जातें, ही गोष्ट आता नित्याच्या अनु-भवाची व चर्चेची बाब झालेली आहे. “मुलींनी आपलीं लग्नें स्वतःच जमवावीं; आम्ही कांही त्यांच्या आड येणार नाहीं,” असें कित्येक आईबाप म्हणूं लागले आहेत. परंतु, अशी इच्छा किंवा आशा नुसती प्रकट केल्याने लग्नें थोडींच जमणार आहेत ? मुलीची त्या दृष्टीने तयारी हवी, आईबापांचें लक्ष व सहकार्य हवें आणि लग्न जमण्याजोग्या ओळखी होण्याची शक्यता पाहिजे.

हायस्कुलांत मुलें व मुली हीं अलग असतात; कॉलेजमध्यें तीं एकदम एकत्र येतात. त्यामुळे, त्यांचा एकमेकांबद्दलचा ओढा निसर्गतः जेवढा असावयाचा, त्यापेक्षा तो अधिक असतो. मुलींना नात्यांतल्या मुलांशीं-सुद्धा बोलण्यास बंदी केलेली असेल किंवा असें बोलण्यास प्रोत्साहन

मिळालेलें नसेल, तर त्या मुली कॉलेजांत गेल्यावर गांगरून गेल्या नाहीत, तरच आश्चर्य ! अगदी अपरिचित वातावरण व अनुभवाचा पूर्ण अभाव अशा स्थितींत आक्रमक वृत्तीच्या मुलांशीं प्रसंग आला, तर भाबड्या मुलींची त्रेधा उडाली नाही, तरच नवल ! ओळख, मैत्री, प्रेम आणि विषयवासना या प्रत्येक पायरीमधील अंतर जाणणें अशा तरुणींना कितपत साधेल ?

पालक आपलीं मुलें परीक्षा पास होतात किंवा नाही, एवढेंच पाहतात; मार्क विचारण्याचीसुद्धा त्यांच्यापैकी कित्येकांना आवश्यकता वाटत नाही. वास्तविक, मुलांच्या हिताच्या दृष्टीने विचार केला, तर त्यांच्या आयुष्याचा हा काळ अत्यंत महत्त्वाचा असतो व त्यांच्या विकासाकडे पालकांचें लक्ष सतत असणें अगत्याचें असतें.

कॉलेजांत मुलें-मुली एकत्र शिकत असलीं तरी त्यांचा एकमेकांशीं संबंध, बाहेरील लोकांना वाटतो त्यापेक्षा, फारच कमी येतो. मुलें व मुली एकमेकांकडे कधी लांबून तर कधी जवळून पाहूं शकतात, एकमेकांबद्दल बोलूं शकतात, पण ते एकमेकांशीं मिसळण्याचे प्रसंग फारसे येतच नाहीत. त्या कारणाने मुलें व मुली ह्यांच्या विशेष ओळखी होऊन त्या ओळखींची आणखी प्रगति होण्याची संधि सहसा मिळतच नाही.

वर आणि वधू यांच्या वयांत जितक्या वर्षांचें अंतर असावयास हवें, तेवढें एकाच वर्गांत शिकत असलेल्या मुलांत व मुलींत आढळण्याचा संभव नाही. शिवाय, त्या वेळचें दोघांचेंहि वय, विवाहाचा अर्थ व त्याच्या जबाबदाऱ्या पूर्णपणें समजण्याइतकें प्रगल्भ असूंच शकत नाही.

मुलींशीं ओळख करूं इच्छिणारे व त्यासाठी नसता पुढाकार घेणारे तरुण अनेक दृष्टींनी योग्य नसतात, असेंच बहुधा आढळतें. अनुरूप, लायक आणि सद्गुणी मुलें मागे राहतात आणि कटविलें जाण्याचा व

अपमानाचा धोका पत्करणारीं मुलें पुढाकार घेतात. मुलींशीं तेच लगट करूं पाहतात, त्यांची अवास्तव स्तुति करतात, कॉफीगृहामध्ये किंवा सिनेमाला नेण्याचा प्रयत्न करतात. अशा मुलांचे दुर्गुण अर्थातच त्यांनी लपविलेले असतात आणि चांगल्या मुलांच्या स्वाभिमानी वर्तनामुळे, अशा लोचट मुलांतूनच मुलींना मित्र निवडण्याची पाळी येते. ज्या मुलांशीं आपली ओळख व्हावी, असें मुलींना मनांतून वाटतें तीं मुलें बाजूलाच राहतात. त्यांची ओळख करून घेण्याचा मुलींचा प्रयत्न एकीकडे सतत चालू असतो; पण साधारणतः मुलांच्या मानाने फारच कमी मुली स्वतः होऊन पुढाकार घेतात; बहुधा त्यांना मनांतील गोष्ट मनांतच ठेवण्याची पाळी येते. लोचट आणि बेजबाबदार मुलांचे प्रयत्न व प्रयोग इकडे चालूच राहतात!

अशा परिस्थितींत कांही मुलींच्या हातून चूक होण्याचा संभव नाही का? मुलींनी नावडीच्या मुलांशीं अजिबात न बोलण्याचें धोरण ठरविलें, तर गोष्ट वेगळी. पण चुणचुणीत, चलाख आणि उजळ मुलींनी असें बाजूला राहण्याचें म्हटलें, तरी त्यांना शक्य तें होणार नाही. बरें, अशा मुली किती मुलांशीं ओळख ठेवूं शकतील? जीं मुलें नाराज होतील, त्यांचे वाक्प्रहार व टीका सहन करण्याचें सामर्थ्य ह्या मुलींत कोठून येईल?

आईला ह्या बाबतींत एक महत्त्वाची भूमिका पत्करली पाहिजे. कोणतीहि गोष्ट तिच्यापासून लपवून ठेवण्याची मुलीला इच्छाहि होणार नाही असा विश्वास आईने निर्माण करणें जरूर आहे. मुलीच्या रोजच्या जीवनांतील घडामोडींत तिने आपुलकीने लक्ष घालून त्यांत आनंद मानला पाहिजे; ह्याचा अर्थ जरूरीपेक्षा जास्त उठाठेव करणें असा मात्र नाही. आईने स्वतःच्या कल्पना मुलीवर लादण्याचा प्रयत्न न करतां, तिला हळुवारपणें सूचना केल्या पाहिजेत. आईच्या सूचना मुलीला कदाचित् पसंत पडणार नाहीत; पण त्या सहानुभूतीने व

प्रेमळपणाने केलेल्या असल्या म्हणजे मुलीचा आईवरील लोभ कमी होणार नाही. आईजवळ कोणतीहि गोष्ट सांगितली, की मुलीला हलकें वाटावें, तिला संरक्षण मिळावें, तिला धीर यावा, अशीच आईची वागणूक हवी.

मुलीच्या ओळखीचीं मुलें घरीं आणण्यास तिला उत्तेजन दिलें, म्हणजे आईचा मुलांशीं परिचय होतो आणि ती त्यांची निर्विकारपणें चिकित्सा करूं शकते. ती मुलांशीं बोलून, त्यांच्यासंबंधी व त्यांच्या नातेवाईकांसंबंधी प्रश्न विचारून, माहिती काढूं शकते. मुलीला बाजूला सारून, आपणच गप्पा मारीत बसण्याची चूक मात्र त्यांनी करूं नये! मुलीने एखाद्याच मुलाबरोबर न हिंडतां, नेहमी मुला-मुलींच्या गटांत असावें, म्हणजे पुढचे धोके आपोआपच टळतात. मुलीला अनेक मुलांची तुलना करण्याची संधि जेवढी मिळेल तेवढें इष्ट असतें; आणि मग एकावरच सर्व मन आणि वेळ खर्च करण्यास सवडच मिळत नाही. कॉफीगृहांतील किंवा टेबलटेनिस हॉलमधील तात्कालिक मित्र जन्माचा सोबती चांगला होईलच, असें नाही हें आईने मुलीला पटवून द्यावयास हवें. दोन तास इतरांपेक्षा जो अधिक चांगला रमवूं शकतो, तो पति या नात्याने कसा वागेल, हें सांगतां येणार नाही. कॉलेजांतील मित्र व पति या भूमिका इतक्या भिन्न आहेत, की एकीवरून दुसरीची कल्पना करतां येणें अवघड आहे. आईच्या अनुभवी दृष्टीलाच हें अधिक चांगलें समजूं शकेल.

मुलाच्या एखाद्या फालतू गोष्टीवर खूष होणें आणि त्याच्याशीं जोडीदार म्हणून जन्म काढणें ह्यांत फार अंतर आहे. मुलीला वैवाहिक जीवन कसें असतें, ह्याची माहिती करून देण्यांत आली नाही, तर ती भलत्या आकांक्षा बाळगून बसावयाची व तिच्यावर पस्तावण्याची पाळी यावयाची. घर चालविण्यास किती खर्च येतो, ही साधी गोष्ट घ्या. प्रेमांत सापडलेली मुलगी पन्नास रुपयांत उत्कृष्ट संसार करण्याची

उमेद् बाळगते. तिला दोनशे रुपयांतहि किती त्रेधा उडते हें कळलें, तर तिचें प्रेमहि अधिक व्यावहारिक स्वरूपांत प्रकट झाल्याविना राहणार नाहीं. यासाठी, आईने मुलीला घरखर्च, प्रपंचांतील देणीं-घेणीं, संभाळावयाचीं नातीं, पडणाऱ्या जबाबदाऱ्या, इत्यादींपासून अलग न ठेवतां तिला ह्या सर्व गोष्टी वेळींच समजावून सांगितल्या पाहिजेत.

पति आणि पत्नी म्हणजेच सर्व कुटुंब होत नाहीं, उभय पक्षांच्या संस्कृतींत साधर्म्य जेवढें अधिक तेवढें श्रेयस्कर, ह्याची स्पष्ट कल्पना मुलीला आलेली असली पाहिजे. आईने आपल्या रोजच्या बोलण्यांत व वागण्यांत ही गोष्ट अप्रत्यक्ष रीतीने आपल्या मुलीला पटवून दिली पाहिजे. नातेवाईकांचा उपयोग कसा होतो, फायदा कसा घावा व घ्यावा, इत्यादि गोष्टी मुलीने माहेरींच शिकलेल्या असल्या, म्हणजे पतीला मूर्ख मुलीशीं लग्न केल्याचा पश्चात्ताप होणार नाहीं. योग्य मर्यादेंतहि नातेवाईकांच्या जबाबदाऱ्या न पत्करणारी पत्नी घराचा मूळ पायाच नष्ट करीत असते.

मुलीला योग्य मुलाची पति म्हणून निवड करतां यावी, या दृष्टीने तिला घरीं सूचना व शिक्षण मिळालेलें असलें म्हणजे बरें. कोणतीं मुलें किती जबाबदारीने वागतात व बोलतात, कोणाचा हेतु खऱ्या स्नेहाचा आहे आणि कोणाला नुसती मजा मारायला हवी आहे, हें चटकन समजण्याची हातोटी निर्माण झाली पाहिजे. विनोदाचे सभ्य-असभ्य प्रकार, खुषमस्करी, स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सामाजिक बंधनें पाळण्याची तयारी, इत्यादि गोष्टींवरून मुलाची परीक्षा होऊं शकते. अंगाशीं लगट करण्यास अधीर असलेल्या मुलाच्या प्रेमाचा आधार कितपत शाश्वत राहील, याची शंकाच आहे. स्वतःच्या गुणांपेक्षा, निंदेचें भांडवल वापरणारा मुलगा मुलीवर कदाचित् मोहिनी घालील, पण शाश्वत गुणांच्या अभावामुळे तो पति या दृष्टीने कदाचित् अयोग्यच ठरावयाचा.

एखादा सौदा फसवून केलेला असला, म्हणजे तो स्टँपावर लिहून काढून नोंदून टाकण्याची घाई करण्यांत येते. कारण, लबाडी मागाहून उघडकीस आली तर सौदा बिघडण्याचा संभव असतो. जो मुलगा मुलीला थापा देऊन बनवितो, तो आपल्या प्रेमाचें शिक्कामोर्तब करण्याची नेहमीच घाई करतो. मुलीला पळवाट राहूं नये यासाठी त्याचा प्रयत्न असतो. मुलीने चोरून प्रेम केलें म्हणजे वानरचेष्टांस वाव अधिक राहतो; आईला तिने विश्वासांत घेतलेलें असलें म्हणजे तिला विचारविनिमयास संधि मिळते व अनुभवी, सहानुभूतीच्या सल्ल्याचा फायदा मिळतो.

तरुण मुलीने आईचा सल्ला मानावा, तिच्या अनुभवाचा फायदा घ्यावा, आईने अशा मोकळ्या बोलण्या-चालण्यास पोषक असें वातावरण निर्माण करावें, हें सर्व ठीक आहे. पण यांत गृहीत गोष्टी फार धरलेल्या आहेत. किती आयांना हें शक्य होईल? किती आयांना बाहेरील जगाची, तरुण-तरुणींच्या मनावर परिणाम करणाऱ्या घटनांची, त्यांच्या आकांक्षांची, त्यांच्या मूर्ख-शहाणपणाची कल्पना असेल? मुंबईसारख्या शहरांत रस्त्यावरून जातांना जे नियम व संकेत पाळावे लागतात, ते माहीत नसणारी खेडेगावांतील आई मुलीला नुसता उपदेश करील, की रस्त्याने जपून जा. पण जपून कसें जावयाचें, दक्षता कोणती बाळगावयाची, खिसेकापूपासून सावध कसें राहावयाचें, रस्ता कोठे ओलांडावयाचा, बसमध्ये किंवा लोकलमध्ये कसें बसावयाचें, हें आई मुलीला सांगूं शकणार नाही. कॉलेजांतील मुलीलाहि केवळ 'जपून वाग' असें सांगणाऱ्या आईच्या उपदेशाचा फारसा उपयोग होणार नाही; कसें वागावें हें पटवून देऊं शकणाऱ्या गृहिणींची आज आवश्यकता आहे.

यासाठी आयांनीच स्वतःच्या सर्वांगीण शिक्षणांत वाढ करण्याचा वेळींच प्रयत्न केला पाहिजे. नव्या कल्पना, नवे रिवाज, नव्या अपेक्षा,

नवीं संकटें, ह्यांची माहिती करून घेतली पाहिजे व त्यासाठी अवलोकनाबरोबर आपलें वाचनहि वाढविलें पाहिजे. इंग्रजी भाषा येणाऱ्या स्त्रियांना अशा प्रकारच्चें वाङ्मय भरपूर प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतें. किती तरी मासिकांतून आयांना बोधप्रद अशी माहिती प्रसिद्ध होत असते. इतर समाजापुढील प्रश्न व ते सोडविण्याचे मार्ग आपल्या येथील परिस्थितीशीं जुळते करून घेण्याची हातोटी थोड्याशा विचाराने व सरावाने सहज साधण्याजोगी आहे. बाहेरील जगाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवितां आला नाही, तर निदान अप्रत्यक्ष रीतीने तरी त्यांनी तो मिळविला पाहिजे.

आईच्या भूमिकेबद्दल इतक्या विस्ताराने लिहिण्याचें कारण, मुलगी आणि आई ह्यांचाच विशेष जवळचा आणि विश्वासाचा संबंध येतो आणि कित्येक नाजूक बाबींची चर्चा त्या दोघींमध्येच मोकळेपणाने होणें शक्य असतें. पण वडिलांनीहि या बाबतींत एक महत्त्वाची कामगिरी पार पाडली पाहिजे. आईपेक्षा वडिलांनी बाहेरचें जग अधिक पाहिलेलें असतें; तें पाहण्याची संधीहि त्यांना जास्त मिळते. त्यांनी आपल्या मुलीच्या हिताच्या दृष्टीने, ह्या अनुभवांबाबत पत्नीशीं विचारविनिमय करून, तिला मुलीचें मार्गदर्शन करतां येईल, अशी स्वतः खटपट केली पाहिजे. याचा अर्थ, आईबापांनी सर्व गोष्टींची सर्वांगीण चर्चा करून कांही बाबी आईमार्फत तर कांही बाबी स्वतः वडिलांनी मुलीच्या कानावर घातल्या पाहिजेत. केवळ नकारात्मक टीकेचें धोरण उपयोगी पडणार नाही.

अनुभव नसलेल्या व तात्कालिक आकर्षणाला बळी पडूं शकणाऱ्या तरुणीला केवळ दोष दिला गेला तर ती व तिचे आईबाप यांच्यामधील अंतर वाढत जाईल. त्यांच्यामधील वैचारिक दळणवळणाची तार तुटूं न देणें अत्यंत आवश्यक असतें. आईबापांनी सांगितलेलें ऐकावयाचें म्हणूनच केवळ त्यांच्या इच्छेला मान देणाऱ्या मुलीच्या मनांतून तिचे

आई-बाप उतरल्याविना राहणार नाहीत; उलट, त्यांचें ऐकण्यांत फायदा आहे हें मुलीच्या प्रत्ययास आलें म्हणजे आईबापांच्या शब्दाची किंमत वाढेल. कांही झालें, तरी मुलीपेक्षा तिचे आईबाप अधिक शहाणे, व्यवहारी व दूरदृष्टीचे असावयास पाहिजेत. केवळ वडीलकीच्या आधारावर मुलीला ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याविना राहणार नाही.

दुर्दैवाने आईला आणि कित्येक बाबतींत वडिलांना स्वतःच्या मुलीच्या वाढीच्या व शिक्षणाच्या बाबतींत मार्गदर्शन करतां येईल अशी परिस्थिति नाही; आणि म्हणूनच कॉलेजांत शिक्षण घेणारी मुलें व मुली एकमेकांपासून आज अजिबात दूर तरी राहतात किंवा नसतीं मुलें-मुली एकत्र येऊन कोणाचें तरी नुकसान करतात. मुलीला मिळत असलेल्या संधीचा फायदा घेण्यास अनुकूल मार्गदर्शन किंवा पार्श्व-भूमि ह्यांचा बहुधा अभावच आढळतो. म्हणून, कॉलेजांत शिकणाऱ्या मुलींना आज भूमितीचे कोन चांगले शिकविणाऱ्या प्राध्यापकापेक्षा, त्यांची मनःस्थिति जाणून त्यांना योग्य तो दृष्टिकोन प्राप्त करून देऊं शकणाऱ्या आयांची गरज आहे.

मुलींचे शरीरधर्मसुद्धा त्यांना नीट समजावून सांगूं न शकणाऱ्या आया जेथे पालक म्हणून मिरवितात, तेथे आपलें कर्तव्य ओळख-णाऱ्या परंतु योग्य त्या शिक्षणाचा व अनुभवाचा फायदा न मिळालेल्या स्त्रियांना स्वतःच्या असहायतेबद्दल किती विषाद वाटत असेल बरें ! शाळा-कॉलेजांत मुली शिकावयास धाडल्या म्हणजे आपलें कर्तव्य संपलें, असें आयांनी न मानतां, स्वतःची त्यासंबंधांतील लायकी वाढविण्याचा फार आधीपासून प्रयत्न केला पाहिजे व त्यांत वडिलांनी आपला वांटा उचलला पाहिजे. शिकलेल्या मुलींना वर्गांतील शिक्षणापलीकडे दुसरें कांहीच येत नाहीं, प्रेमविषयक वाङ्मय वाचूनहि आणि सिनेमे पाहूनहि स्वतःच्या विवाहाचा प्रश्न सोडवितां येत नाही

आणि समाजाचा रोष मात्र सहन करावा लागतो, याचीं इतर कांहींहि कारणें असोत; आईबापांना त्यांची भूमिका पार पाडतां येत नाही हें त्यांपैकी एक महत्त्वाचें कारण आहे.

प्रत्येक नव्या गोष्टीबद्दल तिरस्कार दाखवून किती तरी आया स्वतःच्या मुलींपासून दूर जात असतात. कॉलेजांत जाणाऱ्या मुली व त्यांच्या आया यांच्यांत एका पिढीचें अंतर असतें आणि कॉलेजांतील वातावरण आईला परिचित असलेल्या वातावरणापेक्षा किती तरी वेगळें असतें. साहजिकच, आई व मुलगी ह्यांच्या मनोवृत्तींत व दृष्टिकोनांत तफावत राहते व ती वाढत जाते. नव्या पिढीला जुन्या पिढीबद्दल आदर वाटावा व तिची सल्लामसलत घ्यावीशी वाटावी, असें तिचें सहानुभूतीचें व प्रोत्साहनाचें धोरण हवें. परंतु, कुठल्या तरी मुलीच्या-बद्दल चार गोष्टी ऐकल्यामुळे कांही आयांना स्वतःच्या मुलीबद्दल उगीचच साशंकता व भीति वाटूं लागते; पुष्कळ वेळा ऐकलेल्या गोष्टीच मुळी खोटया किंवा अतिरंजित असतात! मुलाशीं ओळख म्हणजे धोका, असें सर्रास मानणें जसें चुकीचें, तसेंच प्राध्यापकाची मर्जी आणि कृपादृष्टि म्हणजे निश्चिती, हें समीकरणहि चुकीचें ठरूं शकतें.

आज कॉलेजांत ज्या मुली शिकत आहेत, त्यांच्या आयांपैकी फारच थोड्यांना कॉलेज–शिक्षणाचा फायदा मिळालेला आहे. त्यामुळें त्यांना कॉलेजमधील वातावरणाची कल्पनाहि असूं शकत नाही. अर्थात् हा त्यांचा दोष नाही. तथापि, त्याबाबत कुतूहल असावयास काय हरकत आहे? किती आयांनी, आपल्या मुली ज्या कॉलेजांत शिकतात तें कॉलेज स्वतः जाऊन पाहिलें आहे? किती आयांना आपल्या मुलीच्या कॉलेजांतील क्रीडा-स्पर्धांची माहिती आहे? किती आयांनी कॉलेजचें नियतकालिक तरी चाळून पाहिलें आहे? अशा परिस्थितींत त्यांना एकदम मार्गदर्शकाची भूमिका यशस्वी रीतीने पार पाडतां येणार नाही, हें कबूल; पण त्या दिशेने प्रयत्न केला जाणें

अगत्याचें आहे, हें त्यांनी मान्य केलें तरी पुढील प्रगति सोपी होईल. म्हणून, आईबापांनी आपलें कर्तव्य पार पाडण्याची तयारी करण्यास लागावें हें श्रेयस्कर होय.

तरुण मुलींचे पालक या नात्याची आईबापांची लायकी वाढली व त्यांनी आपल्या विकासास योग्य प्रकारें हातभार लावण्याचा प्रयत्न केला, तर मुलींच्या हातून घडूं शकणाऱ्या चुकांच्या सीमांतील अंतर कमी होईल, हें उघड आहे. अनुभव आणि मार्गदर्शन यांच्या अभावीं तरुण मुली अविचारानें वागण्याचाच संभव अधिक; पण त्यामुळे त्यांच्या हातून दुरुस्त होऊं न शकणाऱ्या घोडचुका होऊं लागल्या, तर कसें चालेल? त्या टाळावयाच्या असतील, तर केवळ निसर्गावर अवलंबून चालणार नाही. त्यांच्या खऱ्या हितासच प्राधान्य मिळालें पाहिजे व तें देण्यास मुली समर्थ कशा होतील याचा विचार झाला पाहिजे.

—*सह्याद्रि*

लग्नाचा मोसम आता सुरू झाला आहे. प्रत्येक मोसमांत हजारों लग्नें होतात; पण मथीचें किंवा वेणूचें मात्र कां जमत नाही, ह्याची छाननी करणें अत्यावश्यक आहे.

शेअर-बाजारांत तेजीचें वातावरण असलें म्हणजे खरेदीदार कोणत्याहि शेअरची खरेदी करण्यास तयार असतात आणि पडून राहिलेल्या शेअरलाहि अशा वेळीं किंमत येते. उलट, मंदीच्या काळांत चांगलें डिव्हिडंड देणाऱ्या शेअरलाहि कोणी विचारीत नाही. "शेअर विकणें आहेत" म्हणून जाहिरात दिली, तरी त्याचा उपयोग होत नाही; विकाऊ शेअर्सची संख्या वाढत जाते आणि खरेदीदारांच्या अभावीं शेअर्स धारण करणारे हताश होऊन जातात.

मध्यमवर्गीय मुलींची अवस्था निदान सध्या तरी मंदीच्या काळांतील शेअर्सप्रमाणेच झाली आहे. पुरेशा पगाराची कायम नोकरी असणारे तरुण शिकलेल्या, चलाख मुलींच्या संख्येच्या मानाने फार कमी आहेत. साहजिकच अशांपैकी कित्येक तरुणांना सुंदर, उंच, गोऱ्या मुली मिळूं शकतात किंवा निदान अशा मुली मिळण्याची त्यांना उमेद वाटत असते. बाकीच्या बहुसंख्य मुलींना हवी तशी बाजारपेठच उरत नाही. त्याची कारणमीमांसा करून प्रत्येकाने आपापला प्रश्न सोडविला पाहिजे.

गेल्या कांही वर्षांत मध्यमवर्गीयांची आर्थिक परिस्थिति अतिशय पालटली आहे, बिघडली आहे. परंतु मुलीला स्थळें शोधणाऱ्या पालकांना ह्या गोष्टीची जाणीव फार उशीरा होते. आपण ज्या राहणींत मुलीला वाढविलें तितकी तरी राहणी तिला विवाहोत्तरहि लाभावी अशी प्रत्येक पालकाची साहजिकच इच्छा असते. त्यामुळे स्थळें पाहावयास तो वरच्या पातळीपासून प्रारंभ करतो, नंतर त्याखाली थोडासा येतो,

नाइलाजाने अटी सैल करूं लागतो, तात्पुरती नोकरीहि बरी वाटूं लागते, पगाराचा आकडा विचारीनासा होतो आणि इतकें करीपर्यंत मोसमामागून मोसम लोटतात. दुर्दैवाने चांगलें स्थळ मिळालें नाही तरी आपल्या प्रयत्नांत कसूर झाली नाही एवढें तरी समाधान त्याला हवें असतें.

मुलगी देतांना ती सुस्थितीच्या घरीं पडावी, हें प्रत्येक पालकाने पाहणें आवश्यकच आहे; नव्हे तें त्याचें कर्तव्यच ठरतें. परंतु नव्या पिढीची आर्थिक परिस्थिति किती हलाखीची आहे आणि स्थळाबाबत अपेक्षा किती कमी करावयास पाहिजेत ह्याची बिचाऱ्याला कल्पनाहि असूं शकत नाही. कारण, बेकारी व हलाखी ह्यांचा कटु अनुभव त्याला प्रत्यक्ष आलेला नसतो.

चाळीस–पन्नास वर्षांपूर्वी जन्मलेल्या त्याला आजच्या पिढीच्या कुचंबणेची पुरेशी जाणीवच असूं शकत नाही आणि खाली जाण्याची त्याने कितीहि तयारी केली तरी ती अपुरी पडते. स्थळ हुडकण्यांत तीन–चार वर्षें सहज गेलीं म्हणजे त्या अवधींत मुलगी अधिकच निस्तेज बनते. नंतर, ज्या तरुणाने पूर्वी तिला कदाचित् मागणी घातली असती तोच तरुण आता तिला बघायला आला तर दोन मिनिटांत आटोपतें घेऊन बाहेर पडतो ! मुलगी उफाड्याची असतांनाच तिला पति लाभला नाही तर तिची लग्नाच्या बाजारांतील किंमत आणखी उतरते व हुंड्यासाठी अधिकाधिक रुपये खर्चण्याची तयारी ठेवली तरी त्याचा फारसा उपयोग होत नाही.

आय. सी. एस्. चें वैभव भोगलेल्या अधिकाऱ्याला आता फौजदार जावई मिळाला तरी समाधान मानावें लागतें, प्रोफेसरला कारकून जावईहि मिळत नाही आणि शाळामास्तरला “ कुकिंग कंपनी ”च्या चालकास मुलगी देण्याची पाळी येते. पैसे ‘ कमावून ’ इमारती उठविणाराला फॅक्टरींत दिवसपाळी--रात्रपाळी करणारा जावई शोधावा

लागतो; नव्हे तो विकत घ्यावा लागतो. एका बड्या जहागिरदाराला आपली कॉलेज-शिक्षण घेतलेली कन्या क्षेत्रोपाध्यायाला द्यावी लागल्याचें मला माहित आहे. अशा परिस्थितींत इतर बापांची काय अवस्था होणार हें स्पष्टच आहे.

ज्याला चालू अर्थानें बरी नोकरी आहे अशा मुलाच्या अपेक्षा वाढूं लागल्या नाहीत तरच मग नवल. बी. ए., एम्. ए. झालेल्या मुलींनाहि अर्धेशिक्षित तरुण नामोहरम करूं शकतो; कारण लग्नाच्या बाजारांत त्याचा भाव वाढलेला असतो. कापडाच्या टंचाईच्या काळांत जाडेंभरडें धोतरहि मिळणें कठीण झालें होतें. त्या समयीं तलम धोतरजोडीसाठी व पातळांसाठी रांगाच्या रांगा लागत असत; अशाच रांगा दीडशे-दोनशे रुपये नोकरीवाल्या तरुणाच्या बिऱ्हाडासमोर आता लागल्या, तर त्याचा फायदा घेण्याचा मोह त्याला कां नाही होणार? सुंदर मुली मिळण्याची महत्त्वाकांक्षा तो कां नाही बाळगणार? मोठा हुंडा कां नाही मागणार? तसें त्यानें केलें नाही तर तो व्यवहारी नाही असेंच ठरेल. हजार-दोन हजार रुपयांच्या नोटा एकाच वेळीं हातांत येण्याची त्या बिचाऱ्याला उभ्या आयुष्यांत ही एकमेव संधि असते. मुलीच्या बापाची मात्र इकडे असहाय स्थिति होते व पडतें घेऊन का होईना पण एकदाचें मुलीचें लग्न जमलें, तरीसुद्धा पुरेशा पैशाच्या अभावीं त्याची कुचंबणा होऊन बसते.

परिस्थितीचें आकलन झाल्यावर ह्यावर उपाय सुचेल हें खरें; पण तो अमलांत आणण्याची मानसिक तयारी व्हावयास हवी. कॉलेजांतील आजचें शिक्षण निरुपयोगी आहे हें पूर्णपणें माहित असूनहि मुलांचे पालक त्यांना कॉलेजांत घालतातच ना! "माझ्या मुलाला मी कॉलेजांत घालणार नाहीं, मॅट्रिक होतांच त्याला धंदेशिक्षण देणार, गवंडी किंवा सुतार करणार," असें घोकणारे बाप "त्याची मागाहून तक्रार नको" असें म्हणत मुलाला कॉलेजांत धाडतात आणि आपण कर्तव्य

केल्याचा तात्कालिक आनंद उपभोगतात. मुलींना नवरा बघतांना असेंच घडत असतें. " इतरांना स्थळ मिळणें अवघड गेलें तरी आमची बाबी हुशार आहे; पुण्यांत नोकरी असणारा जरा श्रीमंत नवरा पाहिजे एवढीच तिची अट आहे," ह्या विचारसरणीने मुलीचे आई-बाप परिस्थितीने हरभऱ्याच्या झाडावर चढविलेल्या भलत्या स्थळांच्या मागे लागतात हें कटु सत्य फार उशीरा त्यांच्या लक्षांत येतें.

ज्याप्रमाणे मुलगे मोठ्या नोकऱ्यांचा शोध प्रथम करतात व शेवटीं फिरत्या प्रचारकाचें काम मिळालें तरी धन्यता मानतात, त्याचप्रमाणे मुली व त्यांचे बापहि खोट्या आशेस प्रारंभीं बळी पडतात व मागाहून बिचारे पस्तावतात. तेव्हा वेळींच सावध होऊन इतरांच्या अगोदर त्यांतल्यात्यांत कमी वाईट स्थळ त्यांनी पटकावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रतिष्ठेच्या व स्वास्थ्याच्या रूढ कल्पना सोडल्या पाहिजेत; इतकेंच नव्हे तर ह्यापुढील काल अधिकच बिकट आहे ह्याच्या जाणिवेने योग्य वेळींच इष्ट तो निर्णय घेतला पाहिजे. अविवाहित मुलींना आपल्यानंतर दोन वेळ खाण्यास देण्याची ऐपत तरी आपल्या मुलांजवळ राहील काय व हे मुलगे बहिणींची अब्रू संभाळूं शकतील काय, हा अत्यंत भयानक प्रश्न उभा राहणार आहे.

जाणत्या व दूरदृष्टीच्या लोकांवर मात्र निराश होण्याचा प्रसंग येत नाही. एखाद्या मुलीचें लग्न योग्य वेळीं जमलें नाही, म्हणून तिने तिच्या नातलगावर जन्मभर पूर्णपणें अवलंबून राहिलें पाहिजे असें नाही. आर्थिक दृष्ट्या ती त्यांना थोडासा हातभार लावूं शकली तर तिला संभाळणें नातलगांना जड वाटणार नाही व तिलाहि स्वाभिमानाने आयुष्य घालवितां येईल. ह्या दृष्टीने मुलींना शिक्षण देण्यांत आलें पाहिजे. डॉक्टर, नर्स, शिक्षिका, शिवणकाम, पाकशास्त्र, संगीत, विक्रयशास्त्र, टंकलेखन, इत्यादींपैकी कोणत्या तरी एका किंवा अनेक व्यवसायांचें शिक्षण घेतलेल्या मुलींना जरूर पडली तर थोडें तरी

द्रव्यार्जन करतां येईल. हें द्रव्यार्जन करीत असतांना पुरुषांशीं ओळखी झाल्या व त्यांतून लग्नें जमलीं तर उत्तमच.

अशा रीतीने आपलें लग्न जमविण्यासाठी मुलींनी निःसंकोच प्रयत्न करावा; त्यांच्या पालकांनीहि योग्य त्या मार्गांनी मुलींना प्रोत्साहन द्यावें; अशीं लग्नें जातीबाहेर होण्याचाहि संभव असणार हें गृहीतच धरणें जरूर आहे. त्याबाबत विरोध किंवा अप्रीति बाळगणें मुलींच्या कितपत हिताचें होईल ह्याचा शांतपणें विचार केला पाहिजे. योग्य वेळीं विवाह झाला व व्यवसाय करण्याची आवश्यकता उरली नाही तर त्यांनी घेतलेलें शिक्षण खास वाया जाणार नाही. स्वतःचा संसार करण्यास व मुलेंबाळें वाढविण्यास तें निश्चित उपयोगी पडेल आणि नवऱ्याची प्राप्ति अपुरी पडली तर वेळीं तींत भरहि घालतां येईल. कांही अपप्रसंग आला तर हें शिक्षण तिला तारून नेण्यास मदत करील. मुलींना शिक्षण देतांना हा व्यावहारिक दृष्टिकोन ठेवला तर त्यामुळे सर्वांचेंच हित साधेल. ज्या मुलींची बुद्धिमत्ता असामान्य आहे व ज्यांना शक्यता आहे, अशांनी जरूर अणुसंशोधन करावें !

आहे ह्या परिस्थितींत सर्वसाधारण मुली व त्यांचे पालक ह्यांनी काय करावें एवढ्याचाच विचार येथे केलेला आहे. परिस्थिति सुधारण्याचा प्रश्न व्यापक स्वरूपाचा व सामान्य व्यक्तिमात्रांच्या आवाक्याबाहेरचा असल्याने तो तात्काल फलदायी नाही. मुलग्यांनी व त्यांच्या पालकांनी काय केलें पाहिजे हें सांगण्याचा व तसें करावयास लावण्याचा अधिकार वधुपक्षास नसतोच. म्हणून प्रत्येकीचा स्वतःचाच प्रश्न कसा सोडवला जावा, हाच मुद्दा महत्त्वाचा ठरतो व त्याच दृष्टींनी वास्तववादी भूमिका पत्करून आणि सारासार विचार करूनच तारतम्याने आपलें धोरण आखलें पाहिजे. नोकरी पाहतांना तरुणांनाहि व्यावहारिक दृष्टि ठेवावी लागते.

२०० रुपयांची अधिकारी दर्जाची नोकरी शोधणारांना बेकारींतच

दीर्घ काळ काढावा लागतो व पुढे कमी दर्जाची आणि कमी पगाराची नोकरी पत्करावी लागते. उलट, वेळींच योग्य तो निर्णय घेऊन लहान नोकरी पत्करण्याचें धैर्य दाखविणारे अशा बेकारांपेक्षा पुष्कळ वेळा जास्त सुखी होतात. तरुणांच्या ह्या व्यावहारिक दृष्टिकोनाचें अनुकरण मुली व त्यांचे पालक करतील व त्यास कार्यक्षमतेची आणि आचाराची जोड देतील तर कितीतरी कुटुंबांतील दुःख व विषण्णता कमी होईल.

आजूबाजूची परिस्थिति व त्यांत आपणांस मिळूं शकणारें स्थान ह्याचें यथायोग्य आकलन जितक्या लवकर होईल तेवढें बरें. सामान्य जनांस अनुरूप अशा ह्या सर्वसामान्य धोरणाविरुद्ध जाणारे कांही लोक यशस्वी होतील व आपल्या शहाणपणाचा टेंभाहि मिरवतील हें खरें आहे; परंतु ते अपवादस्वरूप समजले पाहिजेत. कारण, त्यांत दैवाचाच भाग वास्तविक मोठा असतो आणि त्यावर विसंबून बसणारांपैकी बहुतेकांना अपयशच येत असतें.

द्रव्यार्जनक्षम असें शिक्षण मुलींना देणें ही एक बाब झाली. दुसरीहि एक महत्त्वाची बाब म्हणजे मुलींच्या माहेरची राहणी व शिस्त अशी असली पाहिजे की तीमुळे सासरीं त्रास होऊं नये. मुलीच्या बापाला प्राप्ति चांगली आहे म्हणून त्याने मुलीचे गैरवाजवी लाड केले किंवा तिला आगामी परिस्थितीला तोंड देण्यास नालायक करून ठेवलें तर तें दूरदृष्टीचें होणार नाही. मुलीला अशाच संवयी लावल्या पाहिजेत की त्यामुळे तिचे पुढे कोठेहि अडणार नाही. स्वयंपाक, धुणींपोतेरीं, लहान मुलांच्या आंघोळी, आजारीपणांत शुश्रूषा, बाजारहाट, इत्यादि बाबतींत मुलीला आईबापांनी तरबेज करून सोडली पाहिजे आणि तिला काटकसरीचें महत्त्व पटवून देण्यांत आलें पाहिजे.

श्रीमंत बापाने मुलीला मोटार चालविण्यास शिकविण्याला कांहीच हरकत नाही; तिला तें जरूर शिकवावें. पण मुलीच्या सासरीं मोटार नसणार हें लक्षांत ठेवून, तिला सायकलींत पंपाने हवा भरतां आली

पाहिजे आणि व्हॉल्व ट्यूब बदलतां आली पाहिजे. कोणत्याहि परिस्थितींत सुखाने राहतां येईल अशी मुलीची वृत्ति आणि कार्यक्षमता बनविल्यानंतर मग बापाने तिच्यावर पातळांचा, सँडल्सचा व चॉकोलेटचा वर्षाव खुशाल करावा! मुलग्यांच्या बाबतींतहि हीच गोष्ट लागू आहे; बापाच्या राहणीचा दर्जा मुलामुलींच्या वाट्यास आला नाही तरी त्यांना संसार समाधानाने करतां आला पाहिजे हें शिक्षण आईबापांनी त्यांना योग्य वेळींच दिलें तर तें मुलामुलींच्या हिताचेंच होईल. "हें घर बाबांचें आहे, ही मोटारहि माझी नव्हे" असें विवेक-पूर्वक म्हणून कुंदाताईनी त्याबद्दल विरक्ति राखली आणि स्वतःच्या आयुष्यक्रमास योग्य असे विचार–आचार ठेवले तर त्यांना पुढे जड जाणार नाही. कारण, सुखाच्या व चैनीच्या सवयी मोडणें अवघड असतें. श्रमाच्या व कष्टाच्या सवयी असणारीला ऐपतवान पति मिळाला तर तिला श्रीमंतीचा उपभोग अधिक चांगला घेतां येईल.

आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून प्रवास करण्याची सवय असणारीला दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून जाण्यास मिळालें तर तिला त्या डब्यांतील गाद्या बोचणार नाहीत. पण नेहमी दुसऱ्या वर्गाची संवय असलेल्या मुलीला तिसऱ्या वर्गांत प्रवेशहि मिळवितां येणार नाही व आंत जागा मिळाली तरी तिचा तेथे कोंडमारा झाल्याविना राहणार नाही. पालकांनी कसें वागावें व कसें वागवावें ह्यावर कितीतरी अवलंबून असतें. मोठेपणीं त्यांना काबाडकष्ट करावे लागतील म्हणून आईबापांनी मुलामुलींना लहानपणापासूनच हालांत वाढवावें व स्वतः मात्र चैन करावी असा ह्याचा मुळींच अर्थ नाही. स्वतःच्या ऐपतीचा मुलामुलींच्या योग्य शिक्षणासाठी व वाढीसाठी त्यांनी मुक्त हस्ताने विनियोग केला पाहिजे. अर्थात् त्यांत एकांगीपणा असूं नये व दैवाने मुलीला हात दिला नाही तर तिचें अडूं नये ह्याची तयारी वेळींच करून ठेवावयास हवी, एवढेंच येथे स्पष्ट करून सांगण्याचा उद्देश आहे.

वड्या लष्करी अधिकाऱ्यांनाहि आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देतां यावें ह्याकरिता मुद्दाम सोशीक व टणक बनविण्यांत येतें व त्याच-बरोबर त्यांच्या करमणुकीसाठी लष्करी क्लब्सचीहि व्यवस्था केलेली असते; त्यांत त्यांना मुक्त हस्ताने व मुक्त जिव्हेने जीवनास ओलावा आणतां येतो. मुलींना वाढविण्याच्या बाबतींत इतक्या दोन टोकांना आईबापांनी जाण्याचें मुळीच कारण नाही; त्यांनी जाणीवपूर्वक वागावें व वागवावें एवढेंच. जे जागरूक आईबाप ह्या बाबतींत दक्ष असतात, त्यांना इतर कांहीजण नांवेंहि ठेवीत असतील, हसत पण असतील, पण अखेर कोण जिंकतो हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. शाळा-कॉलेजांतील शिक्षणाचा एक परिणाम मुलींच्या अपेक्षा वाढविण्यांत होतो पण तें अपरिहार्य आहे. ह्या अपेक्षा पूर्ण होण्याचा संभव नसेल तर घरगुती शिक्षणाने त्यांना ब्रेक लावण्यास हवा. हीं सर्व कर्तव्यें कटु आहेत, पण तीं करावयास हवींतच. नाहीतर, नुकसान कोणाचें होईल ?

—उद्यम

पति आणि पत्नी ह्यांच्यामध्ये सलोखा व आत्मीयता नसेल तर त्यांचें कौटुंबिक जीवन आनंददायक होणार नाही. एकमेकांनी एकमेकांच्या भावनांना व सोयींना जपलें पाहिजे. दोघांनाहि एकमेकांचा आधार वाटला पाहिजे; त्यांना एकमेकांच्या हार्दिक साहाय्याबद्दल दृढ विश्वास असला पाहिजे. केवळ नाइलाजानेच एकत्र राहण्याची पाळी त्यांच्यावर येतां कामा नये. मागच्या पिढीच्या मानाने आता पत्नीचें घरांतील स्थान कितीतरी सुधारलें आहे व तिचा दर्जा कितीतरी वाढला आहे, हें सर्वसाधारणपणें खरें असलें तरी प्रत्येक बाबतींत सुधारणेस वाव राहणार आणि कांही बाबतींत तर आमूलाग्र बदलाची आवश्यकता कायम असणार ह्यांत संशय नाही.

नव्या पिढींतील पत्नीला पतीकडून पुष्कळच सहानुभूति, साहाय्य, प्रेम, प्रोत्साहन, कौतुक, हीं मिळत असतात. परंतु इच्छा असूनहि आर्थिक दुर्बलतेमुळे पतीला पत्नीशीं हवें तितकें चांगलें वागतां येत नाही. प्रारंभींची चांगली पद्धत सोडून द्यावी लागते; कांही बाबतींत काना-डोळा करावा लागतो आणि कांही बाबतींत तर जाणूनबुजून दुर्लक्ष करावें लागतें. अशीं कितीतरी उदाहरणें देतां येतील. संसार वाढल्यावर तर त्याची बिचाऱ्याची फारच कुचंबणा होते. प्रेम व्यक्त करायलाहि पैसा लागतो आणि तो अपुरा पडला की, बाकीच्या गोष्टींवर आपोआपच त्याचा अनिष्ट परिणाम होतो.

ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊनहि, पतीला पति म्हणून सध्यापेक्षा अधिक चांगलें वागतां येणें शक्य आहे, असें पुढील प्रश्नांची स्वतःशीं चर्चा केल्यावर लक्षांत येईल. वय, आर्थिक परिस्थिति, कुटुंबांतील लहान-थोर घटक, इत्यादींनुसार प्रत्येकाच्या वागणुकींत फरक पडणार हें उघड आहे. तथापि, सर्वसाधारणपणें लागू पडणारे कांही निवडक

प्रश्न येथे दिले आहेत; त्यावरून प्रत्येक पति स्वतःच्या वर्तनाची तपासणी करूं शकेल.

ह्याचा अर्थ एकट्या पतीनेच पति-पत्नींच्या संबंधांतील सौख्य वाढविण्याचा मक्ता घ्यावा आणि पत्नीने मात्र आयतें लोळत पडून पतीला राबवावें असें होतां कामा नये. सारासार विचार करूनच अखेर पतीला आपलें धोरण ठरवावें आणि बदलावें लागेल.

पत्नीच्या सुखाची कल्पना व दर्जा वाढवून त्यासाठी पतीने जागरूकपणें प्रयत्न करण्यामागे त्याचाच अंतिम स्वार्थ आहे, हें स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाही. मानवी गरजा वाढवाव्या व त्या पुऱ्या पाडाव्या म्हणजे मनुष्याचा आर्थिक उद्धार होतो, असा अर्थशास्त्राचा एक सिद्धान्त आहे. आरोग्याच्या बाबतींतहि आपण भूक वाढवितों, ती भागविण्यासाठी अन्न खातों आणि तें पचवून आणि व्यायाम करून पुन्हा भूक निर्माण करतों, हें चक्र चालूच असतें; आणि जास्त भूक लागणारा व ती भागविणाराच सुखी ठरतो; अग्निमांद्य असणारा व चतकोर भाकरी खाऊन उठणारा आनंदी नसतो. कौटुंबिक राहणींतहि आपण एकमेकांच्या अपेक्षा वाढवाव्या व त्या पुऱ्या पाडाव्या, असें वरील विवेचनाचें सार काढतां येईल. अर्थात्, सर्व खटाटोप एकतर्फी उपयोगी नाही. पत्नीनेहि पतीच्या बाबतींत असाच उपक्रम केला आणि त्यांत तिला थोडें जरी यश आलें तरी पति खूष होईल आणि दोघेंहि एकमेकांच्या अधिक जवळ येतील.

१ स्वैपाकघरांत, चुलीवर लहान दिव्याने भागवून स्वतःच्या टेबलावर मोठा दिवा लावतां का ?

२ लग्न-मुंजीस जातांना पत्नीबरोबर जाण्याचें टाळतां का ?

३ पत्नीला आवडणारें मासिक किंवा वर्तमानपत्र घरीं सुरू करतां का ?

४ पत्नीबरोबर आगगाडीने गेलां, तर तिला एकटीच बसवून दुसऱ्या बाकावर किंवा डब्यांत मित्राशीं गप्पा मारीत बसतां का ?

५ पत्नीच्या नांवाने आलेलीं पत्रें तिला देण्याच्या अगोदर तुम्ही वाचतां अगर फोडतां का ?

६ पत्नीचे शनिवार, गुरुवार, उपास, एकादशा, इत्यादींची चेष्टा करतां का ? तिला उपासाचे जिन्नस आपण होऊन आणि पुरेसे आणून देतां का ?

७ आपली पत्नी इतर स्त्रियांमध्ये कमी प्रतीची राहूं नये ह्या दृष्टीने तिला कांही पूर्वसूचना करतां का ? ज्याच्याकडे जावयाचें त्याबद्दल व तेथील परिस्थितबिद्दल कल्पना देऊन ठेवतां का ?

८ घरांत सिगारेट ओढण्याचें शक्य तों टाळतां का ? स्वैपाकघरांत, देवाजवळ, सिगारेट ओढतां का ?

९ तुमच्या आर्थिक परिस्थितीची पत्नीला स्थूल मानाने तरी कल्पना देतां का ?

१० पत्नीला मात्र सासूचा प्रत्येक शब्द झेलावयास लावतां, पण स्वतः मात्र आईकडे दुर्लक्ष करतां, असें घडतें काय ?

११ तुमची पत्नी सासूचें सर्व कांही आनंदाने करीत असतांना तुम्ही पत्नीच्या बाजूने निष्कारण मध्ये पडून सुनेवर सासूचा राग ओढवूं देतां का ?

१२ सासू आणि सून ह्यांच्यामध्ये भांडण झालें तर पत्नीचीच बाजू बरोबर असें धरून वागतां का ? का सासूचीच बरोबर असें धरून चालतां ? का दोन्ही बाजूंचा सारासार विचार करून, प्रत्येकीची स्वतंत्रपणें समजूत घालतां ?

१३ तुम्ही इतरांबरोबर बाहेर जातां तेव्हा चांगले कपडे घालतां; पण

पत्नीबरोबर बाहेर पडतांना मात्र तुमचे कपडे गबाळे असतात, अशी तिची तक्रार आहे काय ?

१४ पत्नीने हौसेने एखादी लहानशी वस्तु विकत आणली तरी तिची किंमत, टिकाऊपणा, रंग, इत्यादींवर कडक टीका करून तिचा हिरमोड करतां का ?

१५ विजेचा पंखा लावतांना आपल्याप्रमाणे पत्नीलाहि उकडतें ह्याची जाणीव ठेवतां का ?

१६ तुमच्या वाचनांत पत्नीच्या उपयोगाची किंवा आवडीची एखादी बाब आली, तर ती पत्नीला दाखवितां का ?

१७ पत्नी माहेरीं गेल्यावर, परत येण्याचें ठरलें असेल त्याच्या आधीच पत्नीला निकड लावतां का ? तिला आणण्यासाठी, ठरलेल्या दिवसाआधीच आपण होऊन तिच्या माहेरीं जातां का ?

१८ इतरांच्या देखत पत्नीचें उणें काढतां का ?

१९ स्वतःच्या खर्चांत काटकसरीला वाव असतांना पत्नीच्या वाजवी खर्चांवरहि कडक टीका करतां, असें कधी घडतें काय ?

२० तुमचें घर हें उभयतांचें घर आहे, असें पत्नीला मनापासून वाटतें काय ? का सासऱ्याच्या किंवा तुमच्या घरांत ती राहते, असें तिला वाटतें ?

२१ पत्नीच्या माहेरच्या माणसांना तुमच्या घरीं येण्यास भीति वाटते काय ? संकोच होतो काय ?

२२ पत्नी आजारी असेल त्या वेळीं बाहेर जाणें रद्द करून तिची करमणूक करण्यासाठी तुम्ही घरीं थांबतां का ?

२३ डॉक्टरकडे किंवा दंतवैद्याकडे तुम्ही स्वतः पत्नीबरोबर जातां का तिला एकटीलाच धाडतां ?

२४ पातळांच्या खरेदीच्या वेळीं पत्नीस मदत करतां का ? पत्नीच्या आवडी-निवडीस वाव देतां का ? का तुमचीच आवड प्रत्येक वेळीं तिच्यावर लादतां ?

२५ जेवायला एकत्र बसत नसलां, तर पत्नीच्या जेवणाच्या वेळीं ती एकटी असल्यास तिला सोबत करतां का ?

२६ इतर स्त्रियांचें जातांयेतां कौतुक करून पत्नीला हिणवतां का ?

२७ सिनेमाला पत्नीस न नेतां वरचेवर एकटेच किंवा मित्रांबरोबर जातां का ?

२८ आधी न कळवतां, भलत्या वेळीं, नकोसे पाहुणे वरचेवर आणून पत्नीला त्यांच्यासाठी नवा स्वैपाक करण्यास लावतां का ?

२९ कपबशा विसळणें, सांडलेलें पाणी पुसणें, मोरी धुणें, इत्यादि कामें करण्यांत तुम्हाला कमीपणा वाटतो काय ?

३० मासिक अडचणीच्या दिवसांतील पत्नीची स्थिति लक्षांत घेऊन तुम्ही घरांत तिच्या मदतीस लागतां का ? मतभेद, बोलाचाली, वाद-विवाद, काथ्याकूट, इत्यादि त्या वेळीं टाळतां का ?

३१ मुलांच्या जोपासनेची जबाबदारी आईबापांची दोघांचीहि आहे ह्या भावनेने वागतां का ? खेळकर मूल तेवढें तुमचें, किरकिरें मूल मात्र आईचें, अशी तुमची वृत्ति आहे काय ?

३२ पत्नीची स्वच्छता, तिचा स्वैपाक, ह्यांची स्वतःच्या आईच्या स्वच्छतेशीं व स्वैपाकाशीं जातां येतां तुलना करून पत्नीला हिणवतां का ?

३३ तुमच्या विवाहाची आणि पत्नीच्या वाढदिवसाची तारीख तुमच्या लक्षांत राहते का ?

३४ पत्नीच्या मैत्रिणींपैकी एखादी जरा आकर्षक मैत्रीण तिच्याकडे आली, तर त्या मैत्रिणीविषयी तुम्ही विशेष औत्सुक्य दाखवतां का ?

त्यांच्या बैठकीजवळून निष्कारण ये-जा करतां का ? त्या मैत्रिणीला ह्यामुळे संकोच वाटतो हें तुमच्या लक्षांत येत नाही का ?

३५ तुम्हाला भात, पोळी, पिठलें, इत्यादि करतां येतें का ?

३६ सासरचीं माणसें चांगलीं व माहेरचीं वाईट, अशा अर्थी तुम्ही पत्नीला वरचेवर बोलून दाखवतां का ?

३७ सणावारीं किंवा कामाच्या इतर दिवशीं पत्नीला सकाळपासून एकसारखें खपावें लागतें, त्या वेळीं दुपारचा चहा तुम्ही करतां का ?

३८ पत्नीने आणावयास सांगितलेला जिन्नस न चुकतां, कबूल केल्याप्रमाणे आणण्याची दक्षता बाळगतां का ?

३९ पत्नी परगावीं जाईल त्या वेळीं तिच्याजवळ भरपूर पैसे देतां, का 'एवढे पुरतील' असें म्हणून तिची कुचंबणा करतां ?

४० मूल आजारी असलें म्हणजे पत्नीवर पडणारा ताण कमी करण्यासाठी तुम्ही तिला विश्रांति देण्याचा प्रयत्न करतां का ?

४१ विवाहाच्या वेळीं पत्नीच्या माहेरच्या माणसांकडून कांही करावयाचें राहिलें किंवा मानपानांत कमी पडलें, तर पत्नीवर त्याचा पुढे एकसारखा राग काढतां का ? सासऱ्याने किंवा सासूने त्या गोष्टी उकरून काढल्या, तर पत्नीची तुम्ही समजूत घालतां का ?

४२ जेवणाच्या किंवा चहाच्या वेळीं पत्नीसमोर वर्तमानपत्रांत तोंड खुपसून बसतां का ?

४३ इतरांच्या देखत पत्नीला अनावश्यक सूचना देतां का ? वास्तविक ती सर्व गोष्टी नीट करीत असतांनाच "बशी आण, चमचा दे !" असें म्हणून थोडक्यासाठी तिला नाउमेद करतां का ?

४४ तुमच्या कामांत मदत करण्याची तिची इच्छा असल्यास थोडी गैरसोय सोसूनहि तिची मदत स्वीकारून, तुम्हाला साहाय्य केल्याचा आनंद उपभोगण्यासाठी संधि तिला देतां का ?

४५ पत्नीच्या वृद्ध किंवा आजारी आई-वडिलांची तुम्ही विचारपूस करतां का? त्यांना भेटण्यास तुम्ही तिला शक्यतेप्रमाणे जाऊं देतां का? त्यांना तुम्ही अधूनमधून पत्रें लिहितां का?

४६ तुमचा दांत दुखूं लागल्यावर जितक्या तत्परतेने तुम्ही उपाय करतां, तितकी तत्परता पत्नीच्या बाबतींत दाखवितां का? पत्नीला चष्म्याची आवश्यकता आहे हें समजल्यावरहि तो घेण्याचें लांबणीवर टाकतां का?

४७ पत्नीच्या आजारीपणावर केलेल्या खर्चाचें तिच्या तोंडावर एकसारखें वर्णन करतां का?

४८ नोकरांच्या किंवा परक्यांच्या देखत तुम्ही पत्नीला चढ्या स्वराने हाका मारतां का?

४९ पाहुणे आल्यामुळे चहा, जेवण, निजण्याची व्यवस्था, इत्यादींबाबत तुमची गैरसोय झाली तर पत्नीला त्याबद्दल दोषी धरतां का?

५० आपल्या पत्नीची व स्वतःची प्रकृति आणि आर्थिक परिस्थिति ह्यांचा विचार करून अपत्यांच्या संख्येबद्दल व पाळण्यांतील अंतराबद्दल पत्नीबरोबर मोकळ्या मनाने चर्चा करतां का? ह्या संबंधांतील तुमची भूमिका दैववादी नाही ना?

—किर्लोस्कर

प्रसंगविशेषीं आपण दुसऱ्याच्या घरीं राहावयास व जेवावयास जातों किंवा आपल्याकडेहि असे पाहुणे येतात. कधी कधी स्नेह्यांना किंवा नातलगांना कांही दिवस राहण्यासाठी मुद्दाम बोलाविलेलें असतें. आलेल्या पाहुण्यांचें आदरातिथ्य करून त्यांची सोय पाहणें गृहस्थाश्रमीं लोकांचें कर्तव्यच ठरतें. बिनओळखीच्या माणसांचीहि प्रसंगानुरूप संभावना करणें योग्य, तेथे ऋणानुबंधी लोकांचा पाहुणचार शक्य तेवढा चांगला करणें केव्हाहि आवश्यकच नाही काय ? प्रश्न फक्त असे आहेत की, यजमानाच्या घरची परिस्थिति त्याच्या मनांतील सदिच्छा पूर्ण करण्याइतपत बरी असते का ? आणि यजमानाच्या चांगुलपणाला ज्यांच्यामुळे ताण पडेल असे लोक आगंतुक पाहुणे येतात किंवा काय ? अतिथीच्या सत्कारासंबंधींचे रीतिरिवाज पाळणें यजमानाला अशक्य होऊन बसतें की काय ? आणि असे प्रसंग वारंवार निर्माण झाले, तर त्याचे परिणाम यजमानावर काय होतात ?

शहरांतील रहिवाशांवर नेहमी तुटकपणाचा आरोप केला जातो. त्यांत सत्याचा अंश कदाचित् मोठा असेल. पण या पाहुण्यांच्या पायीं त्यांना किती त्रास सोसावा लागतो व ते हा त्रास शक्यतोवर न दाखवितां कसा सहन करतात याचा पाहुण्यांनीं आणि आरोप करणाऱ्यांनी विचार केला आहे काय ? कुटुंबांतील पुरुषापेक्षा स्त्रीलाच या त्रासाची झळ अधिक लागते आणि तिला तीं झळ सोसणें क्रमप्राप्त होतें. तरी देखील ती आपण होऊन कधी तक्रार करीत नाही. सर्व त्रास ती हसतमुखाने सहन करते असेंच बहुधा आढळतें.

पाहुण्यांचें वरकरणीं आदरातिथ्य करून भागलें असतें तर गोष्ट सोपी होती. पण सक्रिय आदरातिथ्य करावयास लागणारें पैशाचें पाठबळ बहुतेक लोकांना कमी असल्याने त्यांना अतिशय ताण सोसावा

लागतो, आणि ते बिचारे अगदी मेटाकुटीस येतात. रोजच्या गरजा भागवितां भागवितां जेथे नाकीं नऊ येतात, तेथे पाहुण्यांसाठी जादा खर्च करणें कसें शक्य होणार? जास्त खर्च करतां आला नाही म्हणजे साहजिकच कोठे तरी कात्री लावावी लागते व घरांतील कोणाची तरी गैरसोय करावी लागते; कोणाला तरी चिमटा सोसावा लागतो. बहुधा गृहिणीच्याच वाट्यास ह्या सर्वांचा मोठा भाग येतो.

पाहुणे आले म्हणजे दूध जास्त घ्यावें लागतें, पण तें विकत घेणें परवडत नाही म्हणून गृहिणी चहा पीत नाही व मुलांच्या रोजच्या पातळ कॉफींत आणखी पाणी घालते, पाव वाटी ताक पिण्यास मिळायचें तें बंद होतें, भाजी दिसेनाशी होते, आमटींतील डाळ बुडाशीं जाते, खरकटीं भांडीं जास्त पडून मोलकरीण भांड्यांची आदळआपट करील ह्या भीतीने जास्त भांडीं गृहिणी स्वतः घासते. धुण्याचेंहि तेंच! खाणारीं तोंडें वाढलीं म्हणजे त्या सर्वांना पुरेल इतकें अन्न-पेय देणें अशक्य होऊन बसतें. यजमानाचा रविवारचा 'मॅटिनी शो' बंद होऊन लॉँड्रींत जाणाऱ्या कपड्यांतहि घट होते. गृहिणीला स्वतःच्या गरजा, विश्रांति, पथ्यपाणी, सर्व कांही विसरावें लागतें. घरकाम वाढतें, पाहुण्यांबरोबर पातळ बदलून बाहेर जावें लागतें, परत घरीं आल्यावर स्वयंपाक तयार करावा लागतो, त्यांच्या लहरीं सांभाळाव्या लागतात व त्यांचे कार्यक्रम पार पडावेत यासाठी वेळीं-अवेळीं चहा-चिवडा-जेवण तयार ठेवावें लागतें; पाहुणे त्याची दखल घेवोत अगर न घेवोत.

पति घरकामांत पत्नीला नेहमी मदत करणारा असला तरी पाहुणे आले म्हणजे त्याला पूर्वीप्रमाणे कामास हातभार लावतां येत नाही. संकोच वाटून पत्नीच त्याला सांगते की, तुम्ही पाहुणे असेपर्यंत घरकाम करूं नका. पतीने कामास मदत केलेली पाहुण्यांनी पाहिली, की कुचेष्टेला सुरुवात झालीच म्हणून समजावें! पति बाईलवेडा ठरायचा, हें पत्नीला माहीत असतेंच. पाहुणे मात्र घरांत काम करण्यास सहसा तयार नसतात.

भाज्य कायम राहिलें, पण भाजक वाढला, की भागाकार कमी येणारच, या साध्या हिशेबाप्रमाणे प्रत्येकाचा वाटा कमी होतो. पण त्यांत पाहुण्यांना भरपूर द्यायचें म्हणजे घरच्या मंडळींचा वाटा अधिकच कमी होतो. एकादशीच्या घरीं शिवरात्र, अशी परिस्थिति निर्माण होते. पाहुण्यांपासून ही परिस्थिति लपविण्याचा शक्य तो प्रयत्न केला, तरी त्याचें चीज होतेंच असें नाही. पाहुण्यांना त्यांच्या गावीं न मिळणारे आंबे, अंजीर, काकड्या, मटार, खावेसे वाटतात. परंतु पाहुण्यांची ही साधी इच्छा तृप्त करणें यजमानाला अशक्य होतें; इतकेंच काय पण मोसमांत स्वतःच्या मुलांसाठी जे दोन-तीन वेळा जिन्नस आणले जात असत त्यालाहि चाट बसूं लागते. बिचाऱ्यांचे डोळयावर आलेले केस कापणेंहि पुढे ढकलावें लागतें. अशा परिस्थितींत जर घरीं दुखणेकरी असला तर त्याची आबाळ न झाली तरच आश्चर्य ! लहान मूल आजारी पडलें आणि त्याच्यासाठी एखादें मोसंबें आणलें तर मोसंब्याची फोड घेण्याचा जणू हक्कच गाजविण्यास पाहुण्यांचीं सशक्त मुलें आघाडीवर येतात.

गृहिणी तांदूळ, भाजी निवडत बसते तेव्हां तिच्यासमोर पाहुण्याबाई स्वतःच्या कौतुकाने युक्त अशा लंब्याचौड्या गप्पा मारीत बसतात. त्यांना ताक करण्याची, भाजी चिरण्याची अथवा मुलांना न्हाऊं घालायची स्फूर्ति सहसा कधी होत नाही. जेवण झाल्यावर गृहिणी एकटी सर्व भांडीं आवरते व चुलीकडे तोंड करून बिचारी जेवूं लागते. पाहुणे इकडे रेडिओ लावून वाचत बसतात. 'श्रुतिका' ऐकावयाची राहिली, तर त्यांची बौद्धिक भूक शमणार नाही ना ! पाहुणे घरांत आहेत तोपर्यंत घरांतील नेहमीच्या मंडळींना एकमेकांशीं बोलण्याचीहि संधि मिळत नाही आणि त्यामुळे पाहुण्यांविरुद्ध आलेला राग मनांत ठेवावा लागतो. त्या रागाला वाचा न फुटल्याने तो अधिकच तापदायक होतो. यजमान व गृहिणी यांची शांतपणें अशी भेट पडतच नाही व

त्यामुळे त्यांचा मानसिक तोल सुटण्याचा संभव बळावतो व त्याला अनपेक्षित लोक बळी पडतात; मुलांना तर विनाकारण मार बसूं लागतो.

पाहुणे एखाद्या कामासाठी आलेले असले, म्हणजे त्या कामाच्या मागे ते असतात व बराच वेळ ते घरांत नसतातच. पण चैनीकरिता, उन्हाळ्याकरिता, सुटीकरिता, लग्नाकरिता आलेले पाहुणे हमखास त्रासदायक ठरतात. कारण, त्यांचा मुक्काम ठोकण्याचा हेतूच मुळीं स्वतःचें स्वास्थ्य व सोय हा असतो; त्यांना कशाचेंच बंधन नसतें. केव्हाहि उठावें व निजावें, केव्हाहि जावें-यावें, केव्हाहि भूक लागली म्हणून सांगावें किंवा बाहेरून खाऊन येऊन ताटांत अन्न टाकावें, असा त्यांचा खाक्या असतो. घरांतील जिनसा ते वाटेल तशा वापरतील, पुस्तकें, मासिकें खराब करतील, पंख्याच्या सोबतीला रेडिओ मोठ्याने चालू ठेवून गप्पा मारीत बसतील, स्नानास लवकर उठणार नाहीत, बंबांतील पाणी संपवून टाकतील, अशा अनेक प्रकारें घराचें घरपण नष्ट करून टाकतील. त्यामुळे यजमान व गृहिणी वेडीं होऊन गेलीं, मुलांचे अभ्यास बुडाले, त्यांनी ‘ शुभं करोति ’ म्हणण्याचें सोडून दिलें, व्यायाम करण्याचें टाळलें, पाहुण्यांच्या बरोबर घरीं उशिरा येण्यास सुरुवात केली, तर घरची घडी कशी शिल्लक राहणार? वळण कसें टिकणार?

सत्प्रवृत्त आईबापांना आपल्या डोळ्यादेखत घराचे झालेले हे धिंडवडे पाहात बसण्याची पाळी येते; पण पाहुण्यांचें धोरण फक्त स्वतःपुरतें पाहण्याचें असल्याने त्यांना या परिस्थितीचा गंधहि नसतो. त्या बाबतींत ते आपण होऊन डोक्याला त्रास कां म्हणून करून घेतील? चैनीसाठी आलेल्या पाहुण्यांमुळे सुनियंत्रित घराचा खेळखंडोबा झाला नाही तरच नवल. प्रदर्शनाच्या गाळ्यांत बैल उधळला म्हणजे जी अवस्था व्हावयाची, तीच अशा घरांची होते. कोणतेहि नित्याचे कार्यक्रम पार पाडतां येत नाहीत; प्रत्येक कार्यक्रमाचा विचका होतो.

घरच्या सर्व गोष्टींत पाहुणे तोंड खुपसूं लागतात व त्यांच्यापासून कांहींहि लपवितां येत नाही.

गोविंदरावांच्या घरीं जेवणास प्रारंभ करण्यापूर्वी सर्वांनी "वदनिं कवळ घेतां" म्हणण्याची पद्धति आहे. परंतु पाहुण्यांनी त्याची चेष्टा केल्यामुळें मुलांना त्याची लाज वाटूं लागली व हें म्हणणें त्यांनी बंद केलें! गोपाळरावांच्या घरीं तेच एकटे चहा घेतात, परंतु पाहुण्यांनी त्यांच्या मुलांना चहाची दीक्षा दिल्यापासून घरांत जो चहा सुरू झाला, तो कायमचें ठाणें देऊन बसला आहे. विजयाताईंना पाहुणे असतांना स्वतःचें लेखन-वाचन कांहींहि करतां येत नाही; हें वाचन बंद पडल्या-मुळें त्यांच्या विकासांत साहजिकच व्यत्यय आला. शिवणकाम त्या घरीं करतात. पण आता त्यांना शिंप्याकडे कपडे शिवावयास टाकावे लागले. उन्हाळ्यांत हौसेने त्या पोहावयास जावयाच्या पण पाहुण्यां-मुळे पोहावयास जाणें अशक्य झालें; उलट, शेगडीपाशी घाम गाळत पोळ्या करून पाठ मात्र दुखूं लागली. मुलांचा अभ्यास घरीं करून घ्यावयाचा, तो अशक्य झाला व त्यांच्या रोजच्या कार्यक्रमाकडे लक्ष देणेंहि जमलें नाही. घराबाहेर जातांना सांगून जाण्याची मुलांची प्रथा पाहुण्यांच्या अनिर्बंध वागणुकीमुळे मोडली. सिनेमाला मुलांना नेले की, पाहुण्यांनी यजमानाचे उपकार फेडले अशा कल्पनेने मुलांना बोलपट दाखविले जातात; परंतु पाहुणे निघून गेले तरी सिनेमाची निर्माण झालेली आवड नाहीशी होत नाही.

आपल्या येण्यामुळे यजमानावर आर्थिक ताण पडत नाही, हें खुबीने दाखवूं पाहणारे पाहुणे तर अजबच म्हणायचे! यंदा आंबे स्वस्त दिसतात, आमच्यापेक्षा इथे भाजी चांगली मिळते, दुधाचा भाव जास्त असला तरी लोणी चांगलें निघतें, अशा शब्दप्रयोगांनी पाहुणे यजमानाचें दुःख हलकें करूं पाहतात; पण भाजी व दूध पाहुण्यांमुळे दुप्पट लागतें, त्याची वाट काय? ज्या घरीं उतरावयाचें, तेथील

नोकरांकडून कामें करून घ्यावयाचीं, पण त्यांना बक्षिसी अगदी थोडी द्यावयाची अगर अजिबात द्यावयाची नाही, असे करणारे कित्येक पाहुणे असतात. हे नोकर पाहुण्यांचें पडणारें जादा काम करतात, पण त्याचा त्यांना पाहुण्यांनी योग्य मोबदला दिला नाही तर ते नाराज होतात व स्वतःच्या नेहमीच्या कामांतहि हयगय करूं लागतात. खाष्ट पाहुण्याने बक्षिसी दिली नाही तर त्याची भरपाई मालकालाच करावी लागते व पाहुण्यांच्या नांवाने ती द्यावी लागते. म्हणजे पाहुण्यांना मात्र बक्षिसीचें पुण्य मिळतें. पाहुण्यांना बक्षिसीचें श्रेय देण्यास मालक तयार होतात, ह्याचें कारण पाहुणे निघून गेले तरी नोकर टिकवावा लागतो ना !

मिळवतीं माणसें पाहुणे म्हणून आलीं, म्हणजे त्यांना खर्चाची कांही कल्पना तरी असते. पण परीक्षेनंतरच्या सुट्टीसाठी पाहुणे म्हणून गेलेल्या मुलांमुलींना पैशाची किंमत नीट कळत नाही व त्यांच्या करमणुकीला व मनरंजनाला तर एकसारखा पैसा लागतो. पुण्यांत पोहण्याची सोय आहे म्हणून पोहावयाला गेलेंच पाहिजे; त्याचा जाण्यायेण्याचा बसचा खर्च, तलावाचें तिकीट आणि प्रत्येकी एक आण्याचे चणे, याला दिवसांनी आणि मंडळींच्या संख्येने गुणा, म्हणजे किती रक्कम होते, तें कळून येईल. असे कितीतरी इतर कार्यक्रम रोज चालू असतात. कांही पाहुणे सहली काढतात, त्याचाहि पुढाकार यजमानास घ्यावा लागतो. खर्च वाटून घ्यावयाचें आधी ठरलें, तरी अगाऊ रक्कम कोणी देत नाही व मागाहून मागत बसणें चांगलें दिसत नाही.

महिनाअखेरच्या दिवसांत रोजच्या खर्चासहि वाव नसतो, तेथे ह्या जादा खर्चाची व्यवस्था कशी करावयाची आणि पैसा पुरा कसा पाडावयाचा या चिंतेंत यजमान व गृहिणी हे असतात. स्वयंपाकाचे जिन्नस संपले, तरी गप्प बसणें गृहिणीला भाग पडतें व असेल त्यांत

कसें तरी भागविण्याचा ती प्रयत्न करते. अशा वेळीं तिनें स्वतःपुरती काटकसर केल्याने प्रश्न सुटूं शकत नाही; पण तिचे मात्र सर्व तऱ्हेने हाल होतात. वास्तविक पाहुण्यांनीच वाहन ठरवून यजमानाच्या घरच्या मुलांना बरोबर नेलें, तर यजमान पाहुण्यांचे आभारच मानतील. पण तसें सहसा होत नाही, आणि अमुक पाहावयाचें राहिलें अशी त्यांची हळहळ ऐकण्याचें मात्र यजमानाच्या नशिबीं येतें. रोजच्या जेवण्याखाण्याचा खर्च यजमान आनंदाने करील; पण जादा खर्चाचा बोजा पाहुण्यांनी नको का उचलायला ?

कोणतेच पाहुणे कधीच नकोत, असें म्हणणें हास्यापद होईल. यावेत असें वाटणाऱ्या, सोयी विचारून येणाऱ्या पाहुण्यांचें अगत्य-पूर्वक स्वागत होतें. हे पाहुणे अवेळीं आले व त्यामुळे आपली गैरसोय झाली, तरी त्याबद्दल दुःख वाटत नाही. त्यांचा पाहुणचार करण्यांत आनंदच वाटतो. यजमान व गृहिणी ह्यांच्या सोयींस प्राधान्य देणारे पाहुणे पाहिजेत; केवळ इतर ठिकाणांपेक्षा उतरायला बरी जागा आहे म्हणून येणारे पाहुणे नकोत. ज्यांचा कधी एकमेकांशीं पत्रव्यवहार नाही, जे एकमेकांच्या सुखदुःखांत कधीहि सहभागी होत नाहीत, असे लोक पाहुणे म्हणून हक्काने उतरण्यास मात्र तयार होतात; अधिक जवळच्या पण ज्यांच्याकडे आपली गैरसोय होईल अशा नातेवाईकांकडे ते उतरत नाहीत! ज्याच्याकडे जावयाचें त्याच्या कुटुंबाबद्दल यत्किंचितहि आस्था न बाळगतां हे पाहुणे आपले कार्यक्रम आखीत असतात व मुक्काम लांबवीत असतात.

घरगुती स्वरूपाचे, थोडक्यांत संतुष्ट होणारे पाहुणे संतोष देतात. पण चैनी करूं इच्छिणारे आणि ती करण्यास मिळत नसलेले पाहुणे फार त्रासदायक! यजमानाच्या घरच्या चांगल्या गोष्टी ते दडपून वापरणार, त्याची रेझर ब्लेड मागून घेणार, बाहेर जातांना त्याचे कपडे मागणार, सिनेमा-आइस्क्रिमची अपेक्षा बाळगणार. श्रीमन्तीणबाई,

बरोबर पोऱ्या आणि आया आणणार आणि त्याचें नीट होतें की नाही हें पाहण्यांत त्यांचा सर्व वेळ जाणार. हे नोकर फक्त त्यांच्या मालकिणीचें काम करणार, आयता चहा पिणार व जेवावयास बसणार. त्यांना गृहिणीने काम सांगावयाचें नाही; उलट त्यांना गाव दाखविण्याची व्यवस्था करावयाची! मुलांना आयाजवळ घरीं ठेवून, तिच्या मालकिणीने गावभर मोटारींतून हिंडावयाचें आणि दमून आली म्हणून तिने विश्रांति घ्यावयाची. गृहिणी व यजमान यांनी अशा पाहुण्यांचें, त्यांच्या मोटारींचें व नोकरांचें कौतुक केलें पाहिजे; पण त्यांचा त्यांना उपयोग मात्र कधी व्हावयाचा नाही.

माझ्या एका मित्राने मला सांगितलें, की पुण्यांत प्रत्येक घरीं पाहुणा आहे, पण माझ्या घरीं मात्र तुम्हांला पाहुणा आढळणार नाही! परवा एक जोडपें ओळख काढून व पत्ता विचारीत त्याच्याकडे रात्रीं १०–३० वाजतां अचानक उतरलें! मित्राने त्यांना पिण्यास थंडगार पाणी दिलें व झोपण्याची त्यांची सोय केली; गृहिणीला चूल पेटविण्याची तसदी दिली नाही. पाहुण्यांनी ट्रंकेंतून डबे काढले व त्यांतील फराळाचे जिन्नस खाऊन ते झोपीं गेले. दुसऱ्या दिवशीं पाहुण्यांना नीट जेवूं घातलें व दुपारीं दोन-तीन चांगल्या लॉजिंग हाऊसचे पत्ते त्यांना सांगितले, "आमच्या-तुमच्या सोयीप्रमाणे तुम्हांला आम्ही अगत्य बोलावूं" असें त्यांना मोठ्या खुबीने आश्वासन दिलें; परंतु हे पाहुणे पुनः परत आले नाहीत. पाहुण्यांना नाखूष करण्याची जबाबदारी पतीने पत्करली, तरच नकोसे पाहुणे टळूं शकतात; पत्नी साहजिकच अधिक सौजन्यपूर्ण व भिडस्त असते आणि तें योग्यच आहे.

पाहुण्यांनी यजमानाच्या व गृहिणीच्या भूमिकेचा थोडा जरी विचार केला व त्यांची गैरसोय न करण्याचा निर्धार केला, तर पाहुण्यांचें स्वागत कितीतरी पटीने चांगलें होईल! सुसंस्कृत पाहुणे समजूतदारपणाने

वागतात, पण बहुसंख्य पाहुण्यांचें वागणें बेजबाबदार व स्वार्थी असेंच असतें; त्यांचा बेतच मुळी सर्व कांहीं फुकटांत किंवा थोडक्यांत पाडावयाचा असतो. यजमान व गृहिणी ह्यांना अशा बिकट परिस्थितीस तोंड द्यावें लागतें व तें देण्यास आर्थिक, मानसिक व शारीरिक दृष्ट्या ते समर्थ नसतात. हें सत्य लपविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालतो, त्याचा गैरफायदा कांहीं पाहुणे घेत असतात. कुटुंबाच्या राहणींत, सोयींत, दैनंदिन जीवनांत व्यत्यय येत नाहीं, इतपत पाहुण्यांची संख्या व त्यांचें वर्तन असणें श्रेयस्कर. ह्या दृष्टीने पाहिलें, तर किती तरी पाहुण्यांना आपली सोय अन्य मार्गांनी करून घ्यावी लागेल, हें उघड आहे.

कुटुंबांतील घटकांच्या संख्येच्या मानाने पाहुण्यांची संख्या किती असावी, ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. कुटुंबांत माणसें तीन-चार आणि पाहुणे पांच-सहा, असें वारंवार झाल्यावर पाहुण्यांची व्यवस्था नीट कशी ठेवतां येणार ? आगगाडीने किंवा बसने आपण प्रवास करीत असतों आणि तिघांच्या बाकावर ओळखीचा आणखी एखादा आला, तरी आपण त्याचें आनंदाने स्वागत करतों; आणखी एखादी लहानशी मुलगी आली, तर तिला मांडीवर घेतों. पण तिघांच्या बाकावर सात-आठ लोक दाटीने बसूं लागले, तर कसे होईल ? प्रवास जवळचा असला, तर एक वेळ गर्दी सोसते; पण दीर्घकाल ताटकळत बसणें कोणालाच सोयीचें वाटत नाही. प्रवासांतील गर्दी टाळतां येत नाही. घरांतील पाहुण्यांची गर्दी तशा प्रकारची नसते.

भीड झुगारून देऊन, आपल्या परिस्थितींतील योग्य अशा व इतक्या सोईस्कर वेळीं पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्यास कोणीच नाही म्हणणार नाही. पण गंमत अशी होते की, आपल्याला हव्याशा पाहुण्यांची वाट पाहात बसावें लागतें, तर इतरच पाहुणे वारंवार येतात व राहतात. हवेसे पाहुणे लवकर परत जातात; इतर पाहुणे दीर्घकाळ

ठाण मांडून बसतात व आपल्या स्वतःच्या पोट-पाहुण्यांनाहि गोळा करतात. कोणताहि विशिष्ट पाहुणा हवा—नको असण्याचा प्रश्न नसून त्याचें येणें—जाणें यजमानाला सोयीचें आहे किंवा नाही ही गोष्ट महत्त्वाची आहे. घरच्या अडचणींत पाहुण्यांमुळे निष्कारण भर पडून कुटुंबियांची वरचेवर जाचणूक होता कामा नये. विशेष हवेसे न वाटणाऱ्या पाहुण्यांच्या सतत कटकटीमुळे कधीतरी येणाऱ्या चांगल्या पाहुण्यांचाहि वीट किंवा कंटाळा आला, तर त्याबद्दल बिचाऱ्या यजमानाला दोष देणें खरोखरच न्यायाचें होणार नाही.

माझ्या माहितीच्या एका सुशिक्षित बाईंनी दाखविलेलें धारिष्ट्य उल्लेखनीय आहे. त्यांची मुलगी त्यांच्याकडे सुट्टींत राहावयास येत असे. हळूहळू मुलीचा संसार वाढला व मुलीबरोबर तिचीं मुलेंहि येऊं लागलीं. जावईहि मागोमाग येणारच ! या सर्वांचें नीट करावयास पैशाची अनुकूलता सरस्वतीबाईंच्याजवळ पूर्वीइतकी राहिली नव्हती. त्यांनी माहेरवाशिणीस परिस्थिति समजावून सांगितली व दर माणशीं दररोज दोन रुपये याप्रमाणे तिने सरस्वतीबाईंना द्यावें असें ठरलें. त्यांत नित्याचा सर्व खर्च आला. ही व्यवस्था सर्वांनाच सोयीची झाली. वास्तविक त्यांच्या मुलीने आपण होऊन अशी व्यवस्था सुचविली असती, तर फार बरें झालें असतें; कारण सरस्वतीबाईंच्या या जावयाचें उत्पन्न कांही कमी नाही आणि सरस्वतीबाईंची स्थिति मात्र बऱ्याच अडचणीची आहे.

आई निवर्तल्यावर आणि वडील पेन्शनींत निघाल्यावरहि, त्यांच्या तीन-चार मुली आपल्या मुलांबाळांसह माहेरीं दीर्घकाल येऊन राहूं लागल्या म्हणजे काय अवस्था होते, हें कित्येक कुटुंबांतून पाहण्यास मिळतें. मग दूरच्या नातेवाईकांना तरी दोष कां द्यावा ? व्यवहाराच्या कसोटीस न उतरणारे जवळचे नातेवाईकहि जड होतात, हें त्यांनी समजून घेतलें पाहिजे. इंदिराबाईंची बहीण त्यांच्याकडे

२११३८ दि. ७/११/७५ १०५३ ३०/२२/१

महिनाभर उतरावयास येते, तेव्हा अगोदर पत्र पाठविते व त्यांत लिहिते, " माझ्यासाठी व मुलांसाठी अर्धा शेर दूध जास्त सुरू कर. " येतांना ती मुलांसाठी खाऊ घेऊन येते, बहिणीला ब्लाऊज शिवते, वरचा खर्च स्वतः सगळा ती करते. परत निघण्यापूर्वी सर्व हिशोब पुरा करून पैसे चुकते करते आणि इंदिराबाईच्या दोन्ही मुलांच्या हातांत प्रत्येकी पांच रुपयांची नोट ठेवते. नोकर, मोलकरीण, ह्यांना देण्यासाठी घरचे जुने कपडे घेऊन येते आणि शिवाय रोख बक्षींसहि देते. स्वतःच्या गावीं परत गेल्यावर सुखरूप पोहोचल्याचें पत्र पाठवून केलेल्या आदरातिथ्याबद्दल त्यांचे आभार मानते. असे पाहुणे क्वचितच आढळतात.

खरें सांगावयाचें म्हटलें तर पाहुण्यांचा प्रश्न हा आपल्या दारिद्र्याचा प्रश्न आहे. दुसऱ्याची गैरसोय करण्यास पाहुणे तयार होतात ते कांही मोठ्या उत्साहाने खास नव्हे. चांगल्या ' लॉजिंग हाऊस ' मध्ये उतरणें त्यांना अशक्य असतें व म्हणूनच जमेल त्याच्या घरीं ते उतरतात व मुक्काम करतात. आस्थेपूर्वक येणारे पाहुणे लॉजमध्ये उतरले तरी ते आपल्याला आवडणार नाही. यजमान-घरच्या खर्चास पुरेसा हातभार लावण्याचें सामर्थ्य, केवळ एक सोय म्हणून येणाऱ्या पाहुण्याजवळ सहसा नसतें; म्हणून शक्य तेवढे कमी पैसे यजमानाच्या घराच्या प्रीत्यर्थ ते खर्च करतात व कसेंबसें भागवितात; उलट त्यांच्याकडून कांही रक्कम उसनी मागतात !

यजमानाची तक्रारसुद्धा मुख्यतः अर्थमूलक असते. भागत नाही म्हणून पाहुणे जड वाटतात आणि ही असमर्थता झाकण्यासाठी पाहुण्यांच्या किरकोळ चुका वाढवून दाखवून त्यांचा एवढा बाऊ केला जातो. अगदी गरीब कुटुंबांत अन्न पुरें पडण्याचा प्रश्न निर्माण होईल, तर बऱ्या कुटुंबांतील मुलांचें दूध बंद होईल. त्याहिपेक्षा वरच्या कुटुंबांतील मंडळींना कोशिंबीर खातां येणार नाही किंवा

मधल्यावेळीं तिखट–मिठाचे पोहे मिळणार नाहीत अथवा रात्रीं मच्छरदाणी वांटणीस येणार नाही. कांही झालें तरी, प्रत्येकाच्या परिस्थितींत प्रतिकूल फरक पडणार, हें उघड आहे. म्हणून यजमान व पाहुणे ह्या दोघांनीहि एकमेकांची अवस्था ध्यानांत घेऊन एकमेकाला सांभाळून घ्यावें, हें उत्तम; एकट्या यजमानाचाच भिडेखातर बळी पडूं नये. माणुसकी आणि व्यवहार ह्यांचा मेळ आवश्यक आहे; आणि तोहि उभय पक्षांनी घातला पाहिजे.

माझ्या एका मित्राने पाहुण्यांची केलेली व्याख्या मोठी उद्बोधक आहे : "ज्याला आपण शिळी भाकरी किंवा भात, मनांत कोणताहि संकोच न धरतां आपल्याबरोबर वाढूं शकतो तो खरा घरगुती पाहुणा." तोच पाहुणा आपण ठेवून घेऊं शकूं; पोकळ देखावा किती वेळ टिकणार? घरच्या मंडळींची उपासमार करून पाहुण्यांना वेगळें जेवावयास किती दिवस घालणार? शिळ्या भात–भाकरींत सर्व सोयी–गैरसोयी आल्या हें उघड आहे. त्यांतील आपला वांटा भांडून मागून घेणारे पाहुणे यजमानाला खासच जड जाणार नाहीत.

पाहुणे दुसरीकडे उतरायला किंवा राहायला गेले म्हणजे त्यांनी तेथे पोंचल्याबरोबर यजमानाचा व गृहिणीचा चष्मा आपल्या डोळ्यांना लावून पाहावा व त्यांतून दिसणाऱ्या गोष्टींचें चिंतन व मनन करून वागावें, एवढेंच येथे सांगण्याचा उद्देश आहे. प्रत्येक पाहुण्याची त्याच्या स्वतःच्या घरांतील भूमिका यजमानाचीच असते; तेव्हा घरचा चष्मा त्याने बरोबर बाळगला तरी पुरें आहे !

—*सह्याद्रि*

## बॅडमिंटन कोर्टावरील शिष्टाचार

१००८४

आमचे विजयराव फार चांगले टेनिस खेळणार. त्यांना मिसेस् स्टीफन्सनी मोठ्या आग्रहाने टेनिस खेळावयास बोलाविलें. संध्याकाळची चार वाजतांची वेळ ठरली होती. खेळ अंधार पडेपर्यंत चालतो व आणखी इतर जण असतातच, ह्या नेहमीच्या रूढ कल्पनेप्रमाणे विजयराव साडेचारच्या सुमारास डुलतडुलत खेळावयास आले. आपण एवढे देखणे व उमदे टेनिसपटु; तेव्हा सर्वजण आपली वाट पाहात थांबले असतील, अशी त्यांची कल्पना. औपचारिक नमस्कार-चमत्कार झाल्यावर मिसेस् स्टीफन्स विजयरावांना म्हणाल्या, "माफ करा विजयराव, मी आपल्याला चार वाजतां बोलावलं होतं! आपल्याला ती वेळ सोईची नव्हती, तर आपण माझं आमंत्रण स्वीकारायचं नव्हतं." विजयरावांचा त्या संध्याकाळचा खेळ कसा झाला असेल, ह्याची कल्पनाच केलेली बरी! सुरुवातीचे सेट कोणत्या भिडूंनी खेळावयाचे, हें मिसेस् स्टीफन्सनी अगोदर ठरवून ठेवलेलें होतें; विजयरावांच्या अनौचित्यामुळे त्यांची योजना बिघडून जाऊन खेळाचा विरस झाला.

टेनिस, बॅडमिंटन, टेबलटेनिस, ह्या सर्वच खेळांची मौज खेळणाऱ्यांच्या क्रीडानैपुण्यापेक्षा इतरच कित्येक गोष्टींवर अवलंबून असते; त्याची प्रचीतीच घ्यावयास हवी. प्रत्येक बाब तेवढ्यापुरती पाहिली, तर किरकोळ वाटते. पण अशा अनेक बाबींचा एकत्रित विचार केला, तर आपल्या सुखांत कितीतरी भर आपण घालूं शकूं, हें सहज पटेल.

आपण भोजनास बसतों, त्यावेळचा दाखला येथे उपयोगी पडेल. आपलें रोजचेंच, भाजी-भाकरीचें जेवण असेना का; लहान-सहान गोष्टींनी त्याची गोडी कितीतरी वाढते. ताटवाट्या स्वच्छ व पुसलेल्या असल्या, पाट ओले नसले, सर्वांचे कपडे स्वच्छ धुतलेले असले, गृहिणीने स्मितवदनानें आणि नाजुकपणें वाढलें, जेवतांना भांडण-तंटा

झाला नाही, खेळीमेळीने सर्व जेवले, ताटांत हात धुऊन आणि चूळ भरून कोणी अगोदर उठला नाही, पाणी सांडलें नाही, एकमेकांची आस्थेने विचारपूस केली, तर साधी भाजी-भाकरीहि प्रसन्नता निर्माण करते. जेवणाचा आस्वाद केवळ पक्वान्नांवर आणि किंमतवान् चांदीच्या भांड्यांवर अवलंबून नसतो; तो एकंदर वातावरणाच्या रम्यतेने ठरत असतो. खेळांचेंहि असेंच आहे; त्यांचेंहि वातावरण जितकें उपभोगास पोषक, तितकें त्यांचें आकर्षण जास्त; त्यापासून मिळणारें समाधानहि अधिक.

बॅडमिंटनच्या प्रातिनिधिक खेळाचा येथे विचार करून, त्या खेळा-बाबत कांही अलिखित संकेत दिले आहेत, ते इतरहि कांही खेळांना लागू पडतील. हे संकेत अंगवळणीं पडल्याने सर्वांच्याच संतोषांत भर पडणार आहे. जितके जास्त लोक हे संकेत पाळतील, तितकें अधिक चांगलें वळण आपल्या क्लबांना लागेल व त्याचा अप्रत्यक्ष सुपरिणाम जीवनांत इतरत्रहि दिसूं लागेल.

खेळांचे नियम पाळावेच लागतात; त्यांत कोणाच्या इच्छेचा किंवा आवडीनिवडीचा प्रश्नच येत नाही. शिष्टाचाराचे संकेत वैकल्पिक व ऐच्छिक असतात; ते पाळण्याची सक्ति नसते. परंतु ज्यांना दुसऱ्याची सोय पाहून सुख मिळतें हें पटलें आहे, असे लोक शिष्टाचाराचे साधे संकेतहि कायदेकानूंप्रमाणे काटेकोरपणें पाळतात. साठ टक्के गुण मिळविणारा उमेदवार पहिल्या वर्गांत पास होतो, तद्वतच या संकेतांपैकी बहुसंख्य संकेत पाळणाराहि इतरांपेक्षा उठून दिसतो.

येथे दिलेले शिष्टाचाराचे व नीटनेटकेपणाचे संकेत पाळणारे स्त्री-पुरुष आत्मविश्वासाने कोठेहि वावरू शकतील; ते लोकप्रिय होतील; इतरांकडून त्यांना खेळण्यासाठी वारंवार बोलावणीं येतील. क्लबांतील चांगल्या खेळाडूने त्यांना सामन्यांत हरविलें तरी त्यांच्याच भोवती लोक जमतील व त्यांनाच मान देतील. हे संकेत एकदा अंगवळणीं

पडले, की ते आपोआप पाळले जातात; त्याच्यासाठी मुद्दाम प्रयत्न करावा लागतच नाही. पैसेवालाच फक्त चांगली रॅकेट घेऊं शकतो; शिष्टाचार मात्र कोणीहि आत्मसात् करूं शकतो. त्याला पैसा खर्चावा लागत नाही. एकदा रीत समजली, म्हणजे झालें.

' आम्ही खेळायला जातों; तेव्हासुद्धा आमच्यावर बंधनं कशाला? इच्छेप्रमाणं बोलायला, चालायला, वागायला जर आलं नाही तर क्लबांत जायचं तरी कशाला? " अशी शंका कोणीं विचारली, तर तिचें उत्तर अगदी सोपें आहे. सर्वांनाच जास्तींत जास्त अवसर मिळावा, म्हणून स्वतःवर थोडीं बंधनें घालणें जरूर असतें. सर्वच जण स्वैरपणें वावरूं लागले, तर कोणालाच आनंद मिळणार नाही; गोंधळ मात्र माजेल. आरडाओरडा, अंदाधुंदी, अव्यवस्था, अस्वच्छता, गैरशिस्तपणा, ह्यांचें स्वातंत्र्य हवें असणारांना शिष्टाचार सुचविणें अत्यंत धाडसीपणाचें ठरेल, हें मात्र खरें.

खेळावयास जातांना, आपण कशाकरिता व कोठे जात आहों, ह्याचा विचार करूनच निघालेलें बरें.

खेळतांना व्यत्यय येऊं नये, ह्यासाठी खेळास योग्य असा सुटसुटीत पोषाख करावा. पुरुष ह्या बाबतींत फारशा चुका सहसा करीत नाहीत. ज्या स्त्रिया पातळें नेसून खेळतात त्यांना तें एकसारखें आवरावें लागतें आणि पांचवारी नेसणारांची तर त्रेधाच उडते. आपल्या परकराचा दर्शनी भाग फारसा मळका नसल्याची खात्री करून घेऊनच, पातळ वरतीं खोवावें!

खेळतांना वापरण्याचे कपडे प्रत्येक वेळीं धुतलेले असावेत. वापरलेले कपडे डोळ्यांना दुरून पांढरेस्वच्छ व इस्त्रीचे दिसले, तरी शेजारच्या माणसांवर मात्र नाक मुरडण्याची पाळी येते.

कोर्टांवर खेळायला आल्याबरोबर सर्वांना नमस्ते करून, जरूरीप्रमाणे

कुशल विचारावें. वाद होणार नाही व सर्वांना भाग घेतां येईल असें मौजेचें व आनंदाचें बोलणें करावें. कानांत कुजबुजणें किंवा कांहींना टाळणें इष्ट नाही.

केसांच्या वेण्यांचे शेपटे खेळणारींच्या आड येतात. म्हणून केस कितीहि लांब असले तरी ते आटोपशीरपणें नियंत्रणाखाली ठेवले पाहिजेत. डोक्यांत खोवलेलीं फुलें, गजरे व आकडे ह्यांचा कोर्टांत सडा पडूं नये ह्याची दक्षता घ्यावी.

खेळून झाल्याबरोबर छातीच्या संरक्षणासाठी अंगांत कांहीतरी गरम घालणें आवश्यक असतें. त्यांत लाज वाटण्याचें कांहीहि कारण नाही. निदान इतरांचा संकोच टाळण्यासाठी तरी ओले कपडे झाकणें इष्ट असतें, असें सांगावेसें वाटतें.

बाकावर बसण्यापूर्वी, दुसऱ्याच्या रॅकेटचें कव्हर, टॉवेल, स्वेटर, इत्यादि आपल्याखाली किंवा पाठीखाली येणार नाही ना, हें काळजी-पूर्वक पाहावें.

कोर्टांत येतांना खेळण्यास आवश्यक तेवढ्याच गोष्टी बरोबर आणाव्यात. घड्याळ, किल्ल्यांचा जुडगा, पर्स, हातरुमाल, पिशवी, मासिकें, इत्यादि जिनसा बाकावर इतस्ततः टाकूं नयेत.

कोणीं खेळावयास बोलाविलें व खेळानंतर चहा, सरबत, वगैरे दिलें तर त्यांत दोष काढूं नका. चहा निवला असला, सरबत कोमट असलें, तरी बिनतक्रार त्यांचा आस्वाद घ्या.

आपण दुसरीकडे खेळावयास गेलों, तर तेथील व्यवस्था, फुलें, कोर्टाची जमीन, फरशी, जाळें, उजेड, वारा, इत्यादींबद्दल तक्रार करूं नये. उलट, जी बाब चांगली असेल, तिचाच मुद्दाम उल्लेख करावा. पाहुणे म्हणून खेळावयास जातांना बरोबर स्वतःची रॅकेट नेणें आवश्यक असतें, ही साधी गोष्टसुद्धा कित्येक वेळां पाळली जात नाही.

चूळ भरणें, इत्यादि प्रकार बसल्या जागींच न करतां, त्यासाठीं योजलेल्या सोयीचा उपयोग करावा.

आपण दुसऱ्याच्या रॅकेटची अपेक्षा न केलेली बरी. आपली स्वतःची रॅकेट मात्र प्रसंगानुरूप दुसऱ्यास देऊं करावी. ज्याने त्याने स्वतःच्याच रॅकेटने खेळणें श्रेयस्कर.

रॅकेटचा गट तुटला असल्यास, पॉइंट चुकण्याच्या प्रत्येक वेळीं "रॅकेटचा गट तुटला आहे" असें म्हणून चुकीचें समर्थन करूं नका. तुटक्या गटाच्या रॅकेटने खेळणें इतरांना अन्यायकारक आहे. तेव्हा, गट तुटल्यावर शक्य तितक्या लवकर आपला खेळ थांबवा.

बूट घामाने व धुळीने वरचेवर खराब होतात, म्हणून त्यांस पांढरा रंग न देणें योग्य नाही. पांढरे स्वच्छ कपडे व पांढरे शुभ्र बूट ह्यांच्यामुळे खेळणारांचा उत्साह वृद्धिंगत होतो.

बुटांचे बंद खेळास प्रारंभ करण्यापूर्वीच नीट घट्ट बांधलेले असावेत. खेळ मध्येच थांबवून, खाली वाकून बंद आवळले, तर व्यत्ययामुळे खेळाचा जम बिघडतो.

खुर्ची व बाक ह्यांवर बुटांचा तळ टेकवून उभे राहूं नका किंवा बंद बांधूं नका. त्याचप्रमाणे चहाचे पेले, पाण्याचे ग्लास, इत्यादि खुर्चीवर किंवा बाकावर शक्यतों ठेवूं नका. खराब किंवा ओल्या झालेल्या जागेवर लोकांनी कसें बसावयाचें ?

खेळ चालू असतांना, बाजूला बसलेल्यांनी एकमेकांत मोठ्यांदा बोलून, हसून खिदळून खेळणारांचें एकचित्त बिघडवूं नये. खेळणाराने बाजूच्या लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नये; त्यांत मधून मधून भाग घेऊं नये.

खेळ चालू असतांना, कोर्ट ओलांडून पलीकडे जाण्याचें टाळावें. जाणें भागच असेल, तर अगदी मागच्या बाजूने, पॉइंट संपल्यानंतर

लागलीच, चटकन् निघून जावें. बघतबघत, रेंगाळत, इतरांचें लक्ष वेधत चालू नये.

खेळण्यासाठी थांबलेल्यांनी एकसारखी स्कोअरची चौकशी करून खेळण्याची अधीरता दाखवूं नये. खेळणारांचें लक्षण ठीक दिसत नसलें व त्यांचा बेत गेम मुद्दाम लांबविण्याचा दिसला, तर मात्र असें विचारणें भागच पडतें.

शेजारशेजारच्या दोन कोर्टांवर खेळ चालू असला, तर एका कोर्टावर खेळणारांनी दुसऱ्या कोर्टावर जाऊन गप्पागोष्टी करूं नयेत; आपल्या कोर्टावरच बसून राहावें. शेजारच्या कोर्टांत चुकून फूल गेलें, तर तें आणण्यासाठी तेथील पॉइंट संपेपर्यंत वाट पाहावी; आंत घुसूं नये.

चुरशीचा मित्रत्वाचा सामना चालू असेल, तर बाकीच्यांनी तो नुसता बघावा. तशी विनंती केलेली असल्याखेरीज लाइन्समनचें किंवा रेफरीचें काम आगंतुकपणें करूं नये. चांगल्या शॉटला टाळ्या वाजवाव्या, त्या पॉइंट संपल्यानंतर. मिळवलेल्या पॉइंटला टाळ्या वाजवाव्या; चुकीच्या शॉटने पॉइंट मिळाला, तर नाही.

खेळण्यासाठी उतरतांना आपल्याआधीं दुसऱ्या कोणाचा क्लेम नाही ना, ह्याची खात्री करून घ्यावी. आपण कोर्टांत शिरल्यानंतर माघार घेण्याची पाळी येऊं देऊं नये. दुसऱ्या एखाद्याला लवकर जाण्याची घाई असेल किंवा तो फार दिवसांनी खेळावयास आला असेल, तर त्याला खेळण्याची संधि अगोदर द्यावी.

चांगलें खेळणारांचा खेळ आपल्यामुळे फार बिघडत असेल, तर आपण प्रेक्षकाचीच भूमिका पत्करावी आणि त्यानंतरच्या गेममध्ये आपण सामील व्हावें. चांगलें खेळणारांनी, उलट, नवशिक्यांच्या बरोबर खेळण्याची तयारी दाखवावी व त्यांना संभाळून घ्यावें; नाखुषी तरी लपवावी.

खेळाला प्रारंभ करण्यापूर्वी भिडूंनी कशा सहकार्याने खेळावयाचें, हें त्यांनी एकमेकांत ठरवावें. खेळ चालू असतांना त्याची चर्चा किंवा वादावादी केली, तर कधीकधी विनोद निर्माण होतो; पण खेळाचा बेरंग होण्याचा संभवच जास्त असतो.

सर्व्हिस टाकण्याच्या आधीं, प्रतिस्पर्धी खेळाडूची सिद्धता असल्याची खात्री करून घ्यावी. खुणेनेच हें साधावें. तो सज्ज होण्यापूर्वींच सर्व्हिस टाकली, तर पुन्हा प्रारंभ करावा किंवा निदान पुढचा पॉइंट खुबीने देऊन टाकून फुकट मिळालेल्या पॉइंटची फेड करावी. प्रतिस्पर्ध्यांच्या खेळाचा अंदाज घेऊन, त्याच्यां खेळाशीं जुळेल अशा रीतीने खेळावें. जो खेळाडू चांगला खेळणारा असल्याचें माहीत आहे, त्याच्याशीं कडक सर्व्हिसने खेळ सुरू करण्यास हरकत नाही. पण नवशिक्याला कमीपणा वाटेल, असें खेळूं नये. पळतां न येणाऱ्याचें हसें करण्यांत काय स्वारस्य आहे ?

आपल्या बाजूचें फूल बरोबर, का चूक, हें आपण सांगावयाचें असतें. फूल अगदीच आऊट असेल तर मुद्दाम इषारा देण्याचें कारण नाही. तें थोडेसेंच आंत किंवा बाहेर पडलें, तर मात्र हातांनी खूण करून काय तें कळवावें. ओरडण्याचें टाळावें.

प्रतिस्पर्ध्यांच्या एखाद्या पॉइंटबाबत त्याने चूक केली, तरी त्याबाबत चर्चा करूं नका. त्याचा निर्णय मान्य करावा. मात्र त्याने 'बरोबर' दिलेलें तुमचें फूल 'आऊट' असल्याचें तुम्हीं पाहिलें असेल, तर "तें फूल आऊट होतें" असें तुम्हीच सांगा.

स्कोअरमध्ये दुरुस्ती करावयाची, ती प्रतिस्पर्ध्यांच्या बाजूने होत असेल तरच सहसा करावी. आपला एखादा पॉइंट कमी मोजला गेला, तरी हरकत तडीस नेऊं नये.

फॉल्ट किंवा आऊट पडणाऱ्या फुलास रॅकेट लावूं नये आणि तंट्यास निष्कारण वाव देऊं नये.

प्रतिस्पर्ध्यांचा फुटफॉल्ट तुम्ही जाहीर करूं नका. त्याचा एखादा फुटफॉल्ट झाल्याने विशेष कांही बिघडत नाही.

ज्याचे कमी पॉइंट झाले असतील, त्यानेच आपण होऊन स्कोअर मोठ्यांदा सांगावा. गेमची वाट पाहात बसलेल्यांनाहि स्कोअर कळण्याची जिज्ञासा असते. ज्याचे फारच जास्त पॉइंट झाले आहेत, त्याने ते एकसारखे पुकारणें बढाईच्या स्वरूपाचें वाटण्याचा संभव आहे.

खेळतांना मधूनमधून प्रतिस्पर्ध्याच्या व भिडूच्या चांगल्या शॉटला जरूर शाबासकी द्यावी. पण एकसारखें 'वेल प्लेड' म्हणत राहणें हास्यास्पद होतें.

प्रतिस्पर्ध्यानें चांगला मारलेला शॉट किंवा टाकलेला ड्रॉप अगदी थोडक्याने चुकला, तर 'बॅड लक्' म्हणण्याची पद्धत आहे. पण असें म्हणणाराच्या चेहऱ्यावर मात्र आनंद दिसतां कामा नये!

दुसऱ्यांच्या खेळांत प्रेक्षकांनी मध्ये तोंड घालून त्याचा स्कोअर दुरुस्त करण्याचा किंवा फूल बरोबर का चूक हें सांगण्याचा उपद्व्याप करूं नये.

निरोप सांगण्यासाठी दुसऱ्याच्या खेळांत व्यत्यय आणूं नये. कांही लोक अशा निरोपांची इतकी लांबण लावतात, की बाकीच्या खेळाडूंना उलट दिशेने तोंडें करून आपली नाखुषी व्यक्त करावी लागते.

फुलाबद्दल तक्रार न करतां खेळास सत्वर प्रारंभ करावा. फूल आऊट गेलें, की "किती फास्ट आहे!" अशी तक्रार करण्याची कित्येकांना खोड असते. अशा बडबडीने फुलांत सुधारणा होऊं शकत नाही, हें अनुभवी खेळाडूसुद्धा विसरतात.

फुलामध्ये रॅकेटच्या हँडलचा खालचा भाग एकसारखा खुपसण्याची सवय जडूं देऊं नये.

खाली पडलेलें फूल हाताने उचलून घ्यावें व भिडूला काळजीपूर्वक द्यावें किंवा प्रतिपक्षाकडे सावधगिरीने मारावें. रॅकेटने ढकलून टाकूं नये.

जाळ्यांत फूल अडकल्यास, रॅकेटने त्यास थप्पड मारूं नये. पिसें खराब होणार नाहीत अशा बेताने तें सोडवून घ्यावें.

भिडूच्या आवाक्यांतलें फूल आपण आक्रमण करून मारणें गैर आहे. अशी चूक झालीच, तर सौम्यपणें माफी मागावी.

गेम संपल्यावर "थॅंक यू" म्हणण्याचा शिरस्ता ठेवावा.

स्त्री-पुरुषांच्या मिश्र क्लबांत, पुरुषांनी आपण होऊन स्त्रियांच्या सोयीस प्राधान्य द्यावें. स्त्रियांनी मात्र ह्या सौजन्याचा गैरफायदा घेऊं नये. संकोच न होतां, मनमोकळेपणाने सर्वांस वागतां येतें, अशा विश्वासाचें वातावरण निर्माण केलें पाहिजे.

—स्त्री

कमलकुमारी आज सकाळीं आमच्याकडे आल्या, तेव्हा त्या नेहमीपेक्षा कितीतरी उठून दिसल्या. थोड्याच दिवसांपूर्वी त्यांनी आपले केस मुखवट्याला साजेसे कापून, कुरळित 'करून' घेतले होते आणि त्यामुळे त्यांच्या सौंदर्यांत डौलदार भर पडली होती.

माझ्या माहितीच्या कांही मुलींना व स्त्रियांना केस कापून घेऊन नवी केशभूषा करण्याची मनांतून उत्कट इच्छा आहे. केस कापून नव्या पद्धतीने ते राखले, म्हणजे आपण सुधारक, अद्ययावत् असल्याची ती निशाणी आहे, असें त्यांना वाटतें. कॉलेजांतील कांही मुलें सुंदर मुलींपेक्षाहि केस बॉब केलेल्या मुलींकडे अधिक आकृष्ट झालेलीं दिसतात. अशा मुलींकडे त्यांच्या नजरा वळतात. ह्या मुलींच्या जवळ जाण्यांत धोका नाही; साध्या शिष्टाचाराने त्या भिऊन जाणार नाहीत व त्यांच्याशीं मोकळेपणाने वागतां येईल, अशी त्या मुलांची समजूत होते. तेव्हा केस कापून घेणें हा लोकप्रियतेचा एक मार्ग आहे, अशी त्या दृष्टीने विचार करणाऱ्या मुलींची कल्पना होणें असंभवनीय नाही. पण, घरीं हा प्रश्न काढण्याचीहि सोय नसते. कांही मुलींनी, समजा, तशी इच्छा व्यक्त केली, तरी " तूं लग्न झाल्यावर, नवऱ्याला विचारून वाटेल ते प्रकार कर " असेंच उत्तर मिळतें.

केसांच्या ह्या नव्या रचनेने स्वरूपांत अनुकूल फरक पडेल, अशी कित्येक जणींची ठेवण असूं शकेल. त्याचप्रमाणे कांहीजणींचें कापलेल्या केसांचें 'सोंग' पाहिलें, म्हणजे त्यांचे मूळ लांबसडक केसच त्यांना कितीतरी अधिक शोभून दिसत होते व त्यांनी केस कापून घेण्याचा विक्रम केला नसता तर बरें झालें असतें, असें वाटतें. कांही झालें तरी, स्त्रियांच्या केसांना कात्रीचा स्पर्श होणें ही कल्पनाच मुळीं बहुतेकांना जबर धक्का देणारी आहे; संप्रदाय व रूढि त्याच्या विरुद्ध आहे. पण

पांच वारी पातळें, स्कर्ट, पंजाबी पोषाख, इत्यादींनी एका मागाहून एक असा कित्येक घरांतून प्रवेश मिळविलेला आहे, तोहि रूढीस बाजूला सारूनच की नाही ? सुटसुटीत केशरचनाहि कांही घरांत त्याचें अनुकरण करूं पाहात आहे.

कमलकुमारींनी केसांची रचना एवढी कां बदलली, त्याची मीमांसा उद्बोधक आहे : " आपल्या आवडीच्या गोष्टी तरुणपणीं करावयाच्या नाहीत, तर केव्हा ? केसांच्या अंबाड्या झाल्यावर ? पतींची संमति असल्यावर जगाला भिण्याची काय गरज आहे ? 'तुला केस कापून घेणं सोयीचं वाटत असलं, तर माझी हरकत नाही बरं का ' असें माझ्या सासूबाईंनी मला केव्हाच सांगितलें होतें. मग इतर नातेवाइकांचें मत कशाला विचारायचें ? ज्या समाजांत व वस्तींत आपणास प्रतिष्ठेने राहावयाचें, त्यांत आपण मिसळून जाऊं ह्याची खात्री करून घेतली, म्हणजे झालें. मी सामान्यतः कोणत्याच बाबतींत घरच्यांचें कुणाचेंहि मन मोडीत नाहीं; त्यांना बोलायला जागाच ठेवीत नाहीं. तेव्हा, आमच्या दोघांच्या एखाद्या विशेष हौसेच्या आड त्यांना तरी यावेसें कसें वाटेल ? "

सोयीखातर, आवडीखातर, गमतीखातर, एखादीने कांही गोष्टी केल्या, तर त्यांना बाकीच्यांनी उगीचच नांवें ठेवत राहावयाचें, असें सर्रास चालतें. नव्या पिढीला जरा मोकळेपणाने वावरावयास मिळतें, त्याचा जुन्या पिढींतील कित्येकांना हेवा वाटतो व त्याचेंच रूढिनिष्ठ लोकमत बनतें, त्याचा हा परिणाम असावा. यथायोग्य वावर करण्यास मिळणाऱ्या मुलींचा त्यांच्या बरोबरीच्या इतर मुलींना जर हेवा वाटत असला, तर मग त्यांत कांहीच आश्चर्य नाही.

रूढींचा एवढा बाऊ केला जातो, त्याने वास्तविक कोणीहि बुद्धि-वाद्याने घाबरून जाण्याचें कारण नाही. रूढि ही बदलत जाणारच. तिच्याविरुद्ध जाणारांना टीका सहन करावी लागते, एवढेंच. कांहीजणींनी

हौसेने केस ‘ करून ’ घेतले, तर त्यांपैकी कांही पुन्हा केस वाढूं देऊन वेणी घालण्यास प्रारंभ करतात, असें फॅशनचें रहाटगाडगें नेहमी चालू राहतें. आखूड उंचीच्या व लांब बाह्याच्या खणांच्या चोळ्या श्रीमंत व फॅशनेबल तरुणींच्या हृदयावर कबजा बसवितील, असें भविष्य दहा वर्षांपूर्वी कोणीं वर्तवलें असतें तर त्याला तेव्हा मूर्खांतच काढलें गेलें असतें. पण आज सर्वत्र काय दिसतें? परिस्थितीनुसार प्रघात बदलत जाणें, आवडीनिवडींचें आंदोलन होणें, हें समाजाच्या जिवंतपणाचें लक्षण आहे; युक्तायुक्ततेचा प्रश्न वेगळा! म्हणूनच केस कापून घेऊन केशरचनेंत नावीन्य आणणाऱ्या तरुणींची संख्या समाजाच्या सर्व थरांत पुरेशी वाढली, तर त्यामधील तऱ्हेवाईकपणाची व अनिष्टतेची भावना नाहीशी होईल. पारशी किंवा ख्रिस्ती मुलींनी जें केलेलें चालतें, तेंच दाक्षिणी मुलींनी केलेलें आपल्या अंगवळणीं पडण्यास अवघड पडतें. म्हणून अगदी लहानपणापासून आयांच्या सोयीसाठी मुलींचे केस कापण्यांत येऊं लागले व पुढेहि ती पद्धत टिकली, तर आपोआपच तिला मान्यता प्राप्त होऊं लागेल.

डोक्यावरील केस गळूं लागले किंवा आखूड झाले, म्हणजे कृत्रिम साहाय्य घेण्याची पद्धत पूर्वीपासून चालू आहे. म्हणजे, असतील त्या केसांवर स्त्रिया समाधान मानीत नव्हत्या व नाहीत. आपल्या आवडीच्या केशरचनेसाठी केसांची लांबी आवश्यक तेवढी वाढवून त्या घेत असतात. केस लांब असल्याचें खोटेंच दाखविणें व ते खरोखरच कापून आखूड करणें, ह्यांत तत्त्वतः कांहीहि फरक नाही. एक गोष्ट लपून केली जाते व सामान्यतः लपून राहतें; दुसरी गोष्ट उघड दिसते, एवढेंच. केस प्रत्यक्ष न कापतां त्यांची लांबी लपवून ते लहान करतां आले असते तर त्याला इतका विरोध खास झाला नसता. केशभूषेची कल्पना बदलली तरी नटण्याची हौस ही सनातन, अनादि कालापासून चालत आलेली आहे. हौसेचें फक्त स्वरूप बदलत जातें.

पुष्कळ स्त्रियांना स्वतःला हव्याशा कित्येक गोष्टी स्वतःसाठी करतां येत नाहीत; त्यांचे प्रयोग त्या आपल्या मुलींवर करतात व त्यांतच समाधान मानतात हें आपण नेहमी पाहतों. कित्येक लहान मुलींना केसांच्या लांब वेण्या हव्या असल्या तरी आईच्या हौसेसाठी त्या बिचाऱ्यांची हौस मारली जाते व त्यांच्यावर बॉब कट लादला जातो. कॉलेजांत जाणाऱ्या आपल्या एकुलत्या एक मुलीला केस कापून घेण्याचा आग्रह तिची सुशिक्षित आई करीत असतांना मीं पाहिलें आहे.

जी गोष्ट करणें चुकीचें नाही हें आपल्याला पटलेलें आहे व जी गोष्ट आपल्या अगदी जवळच्या कुणाचें हळुवार मन दुखविणारी नाही, ती करण्यांत कांहीच वावगें नाही. तारतम्य आणि विवेक हीं बाजूस ठेवून बेतालपणा करून मात्र चालणार नाही. कोणीं केस कसे ठेवावे, हा जिचा तिचा प्रश्न आहे. असेच इतरहि कित्येक वैयक्तिक प्रश्न असतात, की ज्यांच्या संबंधांत परक्यांच्या टीकेला भिण्याचें मुळीच कारण नाही. योग्य व इष्ट गोष्टींत जरूर तेवढा पुढाकार काळवेळ पाहून घेतल्याने सौजन्य, शालीनता व सभ्यता नष्ट होत नाहीत. आपल्याला सर्व दृष्टींनी काय परवडेल, हें मात्र पाहिलें पाहिजे.

एखादे दिवशीं गंमत म्हणून मित्र-मैत्रिणींच्या मेळाव्यांत नवलाईचा पोषाख करून कांही वेळ वावरणें आणि केस कापून घेणें, ह्यांत फरक आहे. हा पोषाख काढून त्याच्या जागीं नेहमीचा पुन्हा घालतां येतो; कापलेले केस तितक्या त्वरेने पूर्व स्थितीस येऊं शकत नाहीत. पूर्वी कॉलेज-शिक्षणासाठी पुण्या-मुंबईस येऊन राहणारीं मुलें वसतिगृहांत आल्यावर केस राखीत असत आणि सुट्टीमध्ये परत गावीं जातांना डोकें पूर्ववत् ' करीत ' असत. अशा तऱ्हेचा पालट स्त्रियांच्या बाबतींत कसा शक्य होणार ? केसांच्या रचनेंत वारंवार मूलग्राही फरक करून वावरणें शोभतहि नाही. सौंदर्यसाधनेंत अनुरूपतेबरोबर कांही सातत्यहि असावें लागतें.

नुसत्या केशरचनेंत नाविन्याची छटा आणली पण बाकीच्या बाबतींत मात्र सर्व कांही पूर्वीसारखें जुनें राहिलें, तर विसंगति निर्माण होते. केशभूषेला साजेल असा बाकीचाहि साज हवा. पाहण्याच्या सवयीमुळे कित्येक गोष्टींचें साहचर्य गृहीत धरलें जातें व त्यास मानावेंहि लागतें. आपलें नाक नकटें आहे, हें लक्षांत ठेवूनच लिप्स्टिकने ओठांची मेहरप किती मोठी करावयाची, हें ठरवावें लागतें. लिप्स्टिकचा रंग त्वचेला अनुसरून निवडावा लागतो आणि नखांचें पॉलिश लिप्स्टिकला जुळतें असावें लागतें. मेंदीचा रंग अनुरूप होत नाही. ओठांत गोड हास्य असेल तर सौंदर्यांत भर पडते. कापलेल्या केसांची खुलावट फ्रॉक किंवा स्कर्टवरती जितकी अनुरूप दिसेल, तितकी ती टोपपदरी इलकली नऊवारीवर दिसणार नाही हें सत्य आहे.

सुसंगतपणानेच सौंदर्य निर्माण होतें. फॅशनपेक्षा स्टाइलला कितीतरी अधिक महत्त्व आहे. म्हणून, नखशिखान्त अनुरूपता साधेल अशी ज्यांची नित्याची राहणी आहे, शरीराची व मनाचीहि ठेवण आहे, वागणें-बोलणें-चालणें आहे, त्यांनीच केसांना कात्रीचा स्पर्श करूं द्यावा, हें इष्ट आहे. पतीचा व्यवसाय, वृत्ति, वेष, स्वरूप, आर्थिक सुस्थिति व स्वातंत्र्य, इत्यादींचा पत्नीच्या हौसेशीं संयोग होत नसेल, तर मात्र बाकी सर्व अनुकूलता वायाच जावयाची. लक्ष्मीच्या तोडीचा नारायण असेल, तरच लक्ष्मी–नारायणाचा जोडा शोभून दिसणार, हें उघड आहे.

ह्या सर्वांचा अर्थ इतकाच, की इच्छा असणाऱ्यांपैकी कांहींनाच हा शौक करतां येण्यासारखा आहे. म्हणून, नशीबवान आणि त्याबरोबरच हौशी अशा कमलकुमारींचें मीं अभिनंदन केलें, तेव्हा त्या म्हणाल्या, "मैत्रिणींची कुचेष्टा व कुजबुज पुष्कळच ऐकल्यामुळे, पसंती दर्शविणारे तुमच्यासारखे भेटले, म्हणजे किती बरें वाटतें." त्यावर मीं

सांगितलें, " स्त्रिया व पुरुष ह्यांच्या दृष्टिकोनांत हा फरक पडणारच. पति खंबीर पाठीराखा असल्यावर तुम्हाला कशाची आहे भीति? तुमचें कौतुक करणाऱ्या पतीबद्दल तुम्हाला धन्यता वाटत असेल नाही ? " कमलकुमारींच्या अगदी मनांतलेंच मी बोललों. कारण, त्या लागलीच म्हणाल्या, " अहो, कां नाही अभिमान वाटणार? मीं केस कुरळे करून घेतल्यापासून त्यांनी मला चकित करून सोडलें आहे! माझ्याबद्दलची आस्था त्यांच्यामध्ये पुन्हा जागृत झाली आहे. माझ्यासाठी खुर्चीवरील उशी ते जरा सारून नीट करूं लागले आहेत आणि जेवण झाल्यावर त्यांचें एकटें उठून जाणें बंद झालें आहे. लग्नाच्या आसपासचे दिवस मला पुन्हा आठवूं लागले आहेत. "

कमलकुमारी आमच्याकडे येऊन गेल्या, त्याच दिवशीं नंतर सिंधूताईंची भेट झाली. त्यांच्या केशरचनेने मला आश्चर्याचा धक्काच दिला. कारण, त्यांनी कित्येक वर्षें बॉब-कट केस ठेवले होते व इंग्लंड-अमेरिकेचा दौरा करून त्या नुकत्याच परत आल्या होत्या. पण आज पाहतों, तो त्यांनीं डो-नटची सुंदरशी वेणी घातली होती ! त्यांच्या ह्या परिवर्तनाचें कारण सांगतांना त्या म्हणाल्या, " केस कापून घेण्याची माझी हौस आता पूर्ण झाली आहे आणि मला लांब केस आवडूं लागले आहेत. लांब केसांच्या रचनेंत किती विविधता आणतां येते आणि त्यांत किती मनमुराद आनंद असतो, ह्याची मला पूर्वी कल्पनाच नव्हती. केस कापून घेणें सोपें असतें; पण त्याचे नंतरचे सोपस्कार पुष्कळच असूं शकतात व ते करावयाचे म्हटले, तर त्यांना खर्चहि बराच येतो. केस कापून साधे ठेवायचे असले तरी ते वरचेवर कापून घ्यावे लागतात व मृदु-मोहक राखावे लागतात. त्यांत आळस केला किंवा नवशिक्या मैत्रिणींच्या मदतीने घरींच कापण्याचें काम उरकलें, तर तें नीट साधेलच असें नाही. कित्येकींच्या डोक्यावरील जंगली, अस्ताव्यस्त किंवा वेडेवाकडे, कुरतडलेले केस त्याची साक्ष देतील.

" दुसरी गोष्ट अशी, की जी केशरचना मिश्र क्लबांत खपून जाईल, ती चाळींतील हळदीकुंकवाच्या वेळीं किंवा सत्यनारायणाच्या पूजेच्या प्रसंगीं शोभणार नाही. अशा सामाजिक व धार्मिक समारंभांना मी गेलें, की माझीच आरास तेथील बायका बघत राहावयाच्या ! असे समारंभ टाळणें श्रेयस्कर नसतें आणि त्याचबरोबर लोकांच्या संस्कृतिविषयक भावना न जुमानण्याइतकें महत्त्व माझ्या केशकर्तनास आहे, असें मला आता वाटेनासें झालें आहे; तरुणपणची गोष्ट वेगळी ! ज्या लोकांनी सर्व प्रकारच्या केशभूषा व वेशभूषा अनेक वेळा अनुभवलेल्या, निदान जवळून पाहिलेल्या असतात, त्यांची त्याबद्दलची आश्चर्याची कल्पना नष्ट झालेली असते. पण समाजांतील बहुसंख्य लोकांची दृष्टि तशी मरून गेलेली नसते.

"अनोळखी स्त्री-पुरुषांची कांहीच कदर बाळगली नाही तरी चालते. आप्तमित्र आपलींच माणसें असतात. पण लांबच्या नातलगांच्या आणि लुडबुड्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या कुत्सितपणापुढे व गैरसमज पसरविण्याच्या वृत्तीपुढे मात्र कधीकधी नमण्याची पाळी येते. ज्यांच्यांत आपणांस वावरावयाचें, ज्यांच्या अनुकूल मताची अपेक्षा करावयाची, त्यांच्या दृष्टीची मुरवत राखणें मला जरूरीचें वाटूं लागलें. अर्थात् वयाचा हा परिणाम आहे. कारण, माझी मुलगी आता मोठी झाली आहे; तिला स्थळें पाहण्यास लवकरच सुरुवात केली पाहिजे. माझे छाटलेले केस त्याच्या आड येतां कामा नयेत. "

कमलकुमारींच्या इतकी अनुकूलता आणि अनुरूपता सर्वांच्या वांट्यास येणें शक्य नाही. त्यांची नवजवानींतील विचारसरणी आणि सिंधूताईंचा व्यापक, प्रत्यक्ष अनुभव, ह्यांचा मेळ घातला, तर काय बोध निष्पन्न होतो ? प्रत्येकीच्या प्रकृतीवर व परिस्थितीवर सर्व कांही अवलंबून राहील हेंच खरें. आज जें पचेल तें उद्या कदाचित् मानवणार नाही आणि आज जें पचणार नाही तें प्रकृति बदलल्यावर उद्या

मानवेलहि. खाणेंपिणें, कपडेलत्ते, इत्यादीप्रमाणे केशभूषेच्या बाबतींतहि वयोमानाप्रमाणे सौम्यता आवडूं लागते आणि समाजाला धरून राहण्याचें महत्त्व अधिकाधिक पटतें. तसें विशेष कारण नसतांना सामाजिक रूढींना धक्का देण्याला आवश्यक ती ईर्ष्या प्रत्येकीजवळ उरत नाही.

केस कापून घेणाऱ्या कित्येक स्त्रियांना त्यांत आपण विशेष कांही करतों, असें मुळीच वाटत नाही. गंगावन वापरून वेणीची रचना करणाऱ्या स्त्रियांसारखीच त्यांची वृत्ति असते. केसांची नव्या पद्धतीने निगा ठेवणें ही त्यांची नित्याची मामुली बाब झालेली असते. फॅशनचें वाहवत जाऊन अनुकरण करणाऱ्या कांही स्त्रिया असतात, तर कांहीजणींना समाजाला जरा धक्का देण्यांतच आनंद वाटतो. समाजाला डिवचण्याचें सामर्थ्य त्यांच्याजवळ असतें. आर्थिक स्वातंत्र्य व सत्ता ह्यांची जोड असली म्हणजे हा बेडरपणा खपून जातो. कांही थोड्या स्त्रिया केस कापून घेतात, त्याचा हेतु मात्र संसारसुख टिकविण्याचा प्रयत्न करणें किंवा गमावलेलें संसारसुख शोधणें हा असतो ! ह्यासाठी सुचेल त्या किंवा सुचविले जातील त्या मार्गांचा अवलंब केला जातो. वेशभूषा आणि केशभूषा बदलून त्या पाहूं लागतात; त्यांची धाटणी व लकेरी ह्यांची हुकमत ह्या अभागी स्त्रियांच्या हातीं राहातच नाही ! कोणाचा काय उद्देश आहे हें बाकीच्यांना कसें कळणार ? अजाण लोक केस कापून घेणाऱ्या सर्वच स्त्रियांना एकाच पातळीवर आणून ठेवतात. ह्या स्त्रियांना वाटतें, की आपण प्रियदर्शिनी झालों आहोंत. पण बहुसंख्य लोकांच्या मनांतून त्या उतरतात, हें सत्य असतें. स्त्रियांचे केस ही चाळा करण्याची बाब नव्हे. त्या केसांशीं अत्यंत नाजूक भावना निगडित आहेत अशी रूढ कल्पना आहे. तेव्हा तिला न जुमानतां अशक्य मानली जाणारी क्रिया करून घेणारणींनी जननिंदेला दोष न दिलेलाच बरा. टीकेची उपेक्षा करून भागत नाही. विपरीत परिणाम होऊन घायाळ झालेल्या पुरुषांना कोण आवरणार ?

खरें पाहिलें, तर केस कापून घेणाऱ्या स्त्रियांपेक्षा मद्यपान निषिद्ध नसणाऱ्या स्त्रियांची संख्या कितीतरी अधिक भरेल. पण त्यांची जाहिरात होत नाही. केसांचा शौक कितीहि सात्त्विक वाटला तरी ती फक्त घरींच उपभोगण्याची बाब नाही. उजळ माथ्याने हिंडल्याने तो शौक जगजाहीर होतो. कित्येक पुरोगामी पुरुष ओळखीच्या स्त्रियांना केस बॉब करण्यास प्रोत्साहन देतात; पण स्वतःच्या पत्नीच्या बाबतींत ते जरा लगामच घालूं इच्छितात, त्याचें तरी रहस्य हेंच आहे. कांही पुढारलेल्या स्त्रिया मुलासाठी वधू निवडतांना "मी माझ्या सुनेला तिच्या इच्छेप्रमाणे केस ठेवण्यास मोकळीक देईन; पण आधींच केस बॉब केलेली वधू मला तितकीशी पसंत नाही," असें कां म्हणतात, हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

केस कापून घेतल्यामुळे वेगवेगळ्या स्वरूपांत त्याची जी किंमत द्यावी लागते, तिच्या मानाने सोय, सौंदर्य, समाधान, निश्चिंति, हीं भरपूर मिळतात ना हें पाहिलें पाहिजे. हा हिशेब जिनेतिने स्वतःच्या मूल्यांप्रमाणे करावयाचा असतो आणि हीं मूल्यें स्थायी नसतात. परिस्थितीप्रमाणे तीं बदलत जातात. साहजिकच, व्यक्ती-व्यक्तीचें गणित वेगवेगळें होऊं शकेल. अर्थात् आपणांस कुटुंबाचे व समाजाचे घटक म्हणून राहावयाचें असल्याकारणाने सर्व घटकांच्या मंथनांतून जीं मूल्यें निष्पन्न होतात, त्यांपासून व्यक्तीने ठरविलेलीं मूल्यें फार वेगळीं राहूं शकत नाहीत. म्हणून, एखादीच्या मूल्यांना इतरांनी अवास्तव महत्त्व देण्याचें कारण नाही. त्याबाबत आग्रहाने, कटुतेने व मर्मभेदीपणाने मत व्यक्त करण्याचा मोह त्यांनी टाळणें हें युक्त आहे.

—स्त्री

स्त्री-पुरुषांच्या मिश्र जीवनाचे प्रसंग फारसे येतात तरी कुठे, असा प्रश्न कोणीं विचारला, तर त्याचें उत्तर सोपें आहे. असे प्रसंग अधिकाधिक येऊं लागले आहेत आणि कित्येक पुरुष मिश्र जीवनास व्यावहारिक यशाचें एक साधन मानूं लागले आहेत. नोकरीनिमित्त घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांना पुरुषांचा परिचय व त्यांची संगत टाळतां येणें अशक्य झालें आहे. परदेशांतील राहणीचें भडक चित्र सिनेमांत दिसतें, त्याचें अनुकरण कांहीं लोक करूं लागले आहेत. लष्करी अधिकारी विवाहाच्या बाजारांत इतर तरुणांना मागे सारूं लागले आहेत आणि त्यांच्यामध्ये मिश्र जीवनास तर मोठ्याच महत्त्वाचें स्थान आहे. काय करावें, काय करूं नये, हें सांगणारे अनुभवी व सत्प्रवृत्त इंग्रज अधिकारी आता लष्करांत उरलेले नाहीत आणि मिश्र जीवनाचें नेतृत्व भलत्याच लोकांच्याकडे गेलें आहे. त्यामुळे अनुभवी पुरुष व स्त्रिया अजिबात मागे राहण्याचा किंवा फार पुढे जाण्याचा धोका निर्माण होतो !

आम्ही खंडाळा व लोणावळा येथे सहलीस गेलों असतांना साहजिकच वाघदरी पाहावयास गेलों. कड्याच्या अगदी टोकाला जाऊन, पालथें पडून, खाली नजर टाकली म्हणजे या दरीची शोभा पाहावयास मिळते. बरोबरीच्या एका मित्राने मागे बसून खाली वाकून पाहणाराचीं पावलें धरून ठेवलीं म्हणजे खाली पडण्याची भीति उरत नाही. त्याखेरीज अगदी टोकापर्यंत जाऊन खालची शोभा बघतांच येत नाही !

स्त्री-पुरुषांच्या मैत्रीच्या बाबतींत असेंच कांहींसें होतें. तोल सांभाळतां आला तरच मिश्र जीवनाची गोडी चाखतां येते; डोकें गहाण न टाकतां व तात्कालिक भावनांस बळी न पडतां वर्तन केलें तरच उभय पक्षांस ही मैत्री हितावह होऊं शकतें; ती टिकूं शकते. आपल्याकडे मिश्र

समाजांत वावरण्याची बहुतेकांना फारशी सवय नसल्याकारणाने पुरुषच फक्त स्त्रियांशीं बोलतांना पुष्कळ वेळा मर्यादा ओलांडतात असें नाही; स्त्रियाहि परपुरुषांशीं बोलतांना देहभान विसरतात असें सुद्धा कित्येक वेळा आढळतें.

जोपर्यंत पत्नीला आपल्या पतीखेरीज इतर पुरुषांची जवळून माहिती नसते, तोपर्यंत तिला स्वतःच्या नवऱ्याची इतर पुरुषांशीं तुलना करण्याची पाळीच येत नाही. साहजिकच ती असमाधानी नसते. परंतु विजयराव दररोज दाढी करतात आणि त्यामुळे ते आकर्षक दिसतात हें तिच्या लक्षांत आलें की, तिला स्वतःच्या नवऱ्याच्या दाढीचे केस खुपूं लागतात! स्वतःच्या नवऱ्यापेक्षा कुमारचे कपडे ऐटदार असले, भाऊरावांचे दात स्वच्छ असले, आप्पासाहेब अधिक चांगले खेळत असले, बाबूराव जास्त रुबाबदार असले आणि गोविंदरावांना पगार जास्त असला, तर तिला नवऱ्यापेक्षा त्याचे हे मित्र वेगवेगळ्या वेळीं व निरनिराळ्या कारणांसाठी अधिक चांगले वाटले व त्यांच्याशीं बोलण्यासाठी ती उत्सुक झाली, तर त्यांत आश्चर्य नाही.

उलट, पुरुषांचीहि अशीच स्थिति होते. स्वतःच्या पत्नीपेक्षा इंदूताई पातळ अधिक चांगलें नेसत असल्या, माणिकताईचें हसणें अधिक मोहक असलें, कुंदाताईची रंगसंगती खुलावटीची असली आणि लताताईचा गळा जरा आकर्षक असला, तर राजाभाऊंनी अशा स्त्रियांशीं मैत्री वाढवूं पाहणें स्वाभाविक आहे. जेव्हा पुरुषाला फक्त पडद्यावरच नटी पाहावयास मिळतात किंवा परदेशीय, परप्रांतीय अथवा परजातीय स्त्रियांची व त्याची दृष्टादृष्ट व क्वचित् प्रसंगींच ओळख होते, तेव्हा त्याचा दुष्परिणाम फारसा होत नाही. पण आपल्याच शेजारच्या व ओळखीच्या स्त्रिया स्वतःच्या पत्नीपेक्षा जास्त खुलून दिसूं लागल्या, म्हणजे मात्र त्याचें चित्त दुसरीकडे जाऊं लागतें!

स्त्री-पुरुषांचा एकमेकांशीं परिचय वाढला म्हणजेच 'परस्त्री' व

'परपुरुष' निर्माण होतात! आणि मग याचे धोके कसे टाळावेत हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. वास्तविक पाहतां सर्व गुण फक्त आपल्या पतींतच किंवा पत्नींतच एकवटलेले आहेत असें खोटेंच मानणें शिकलेल्या स्त्री-पुरुषांना तरी अशक्य आहे. स्वतःच्या पत्नीमध्ये कांही गुण नाहीत म्हणून पति पत्नीवर नाराज होतो, तर पत्नीहि त्याच कारणांकरिता मधूनमधून पतीवर नाराज होते, असें घडलेलें कधीकधी आढळतें. कांही पति कित्येक वेळा ह्या बाबतींत फारच मोकळेपणाने बोलतात; दुसऱ्या स्त्रियांची स्तुति आपल्या पत्नीसमोर करण्यास त्यांना संकोच वाटत नाही! पत्नीला बिचारीला हें सर्व कांही ऐकून घेणें भाग पडतें. ती मात्र परपुरुषांची स्तुति पतीसमोर करण्यास धजत नाही; जें काय असेल तें फक्त मनांत ठेवते. परंतु पति-पत्नींचा कधी उघड, तर कधी अप्रकट, असा संघर्ष येथे सुरू होतो.

इतर स्त्रियांचें जातांयेतां कौतुक केलेलें पत्नीला कधीच आवडणार नाही; ह्या कौतुकाचा हेतु मग किती का उदात्त असेना! त्यापेक्षा इतर स्त्रियांच्या खऱ्या-खोट्या चुका जर पत्नीला दाखवून दिल्या, तर तिला रुचतील. तेव्हा दुसऱ्या स्त्रीचें गुणवर्णन करतांना तिचा एखादा दोष सांगितला, तर पत्नीला तें अधिक आवडेल. दोष सांगतां सांगतां हळूच गुणांचें वर्णन बेताबेताने केलें, तर तें चांगलें पटतें. दुसऱ्या स्त्रीची बाजू पत्नीलाच घ्यायला लावली, म्हणजे तर हुषार पतीने दोन्ही साधलें म्हणून समजावें.

स्वतःची पत्नी व इतर स्त्रिया ह्यांतील फरक पुरुषाने नीट ध्यानांत धरला पाहिजे. पत्नी ही जन्माची सोबतीण, रात्रंदिवस सहचारिणी. तेव्हा तिच्याशीं स्नेहाचे संबंध कायम राखणें हेंच केव्हाहि श्रेयस्कर. तिला दुखवून इतर स्त्रियांच्या मैत्रीचा अभिलाष धरणें व्यर्थ आहे. मित्रांच्या पत्नीबरोबर सिनेमास, खेळण्यास किंवा सहलीस जाणारे कांही पुरुष दुखण्यांतून उठलेल्या स्वतःच्या पत्नीला व्यायामाचें महत्त्व

वर्णन करून एकटीला कुडकुडत फिरावयास धाडतात, हें मीं पाहिलें आहे.

पुरुषाने आपण होऊन पुढाकार घेतला तर परस्त्री त्याला एखादे वेळीं नाखूष करणार नाही. पण स्त्रिया ह्या सामान्यतः पुरुषांपेक्षा जास्त लहरी असतात, आणि आज 'थँक्यू व्हेरी मच्' असें म्हणत मोटारचें दार लडिवाळपणें बंद करणारी स्त्री उद्या सकाळीं साधी ओळख दाखवील की नाही ह्याची शाश्वति नसते. स्वतःच्या पत्नीचा लहरीपणा पति सांभाळूं शकतो. कारण, थोड्या वेळाने कल बदलतो आणि पति-पत्नीं तात्काळ एकत्र येऊं शकतात. पण परस्त्रीचा लहरीपणा घातक ठरतो. पुन्हा तिची गाठ केव्हा पडेल ह्याची खात्री नसते. गाठ पडलीच तरी आजूबाजूची परिस्थिति अनुकूल हवी ना! आणि तिची हुक्की त्या वेळीं असेलच ह्याची तरी खात्री काय? पण पुरुषाला आणखी थांबायला सवड कोठे असते आणि त्याला धीर कोठे निघतो? कांही दिवसांपूर्वीच्या किंवा कांही महिन्यांपूर्वीच्या आठवणींच्या आधारावर तो खुषींत येऊन तिच्याशीं बोलूं पाहतो; पण कित्येक वेळा त्याच्या पदरीं निराशाच येते.

हें मात्र खरें, की लहरी स्त्रीच पुरुषांना हवी असते. इतरांना तिच्या लहरीपणाचा फटका बसावा, पण आपल्यावर मात्र ती खूष असावी, अशी त्यांची वेडी अपेक्षा असते! नेहमीच बऱ्या वागणाऱ्या स्त्रीकडून पुरुषास अपमानाची भीति नसली, तरी अशी स्त्री फार लाडांतहि येत नाही आणि त्यावर तो समाधानहि मानूं शकत नाही.

पाश्चात्य देशांतहि पुरुषाने स्त्रीला दाक्षिण्य दाखवून नमस्कार केला तरी त्याच्या भावनांचा अनादर होणार नाही ह्याची त्याला खात्री असल्याखेरीज तो तिच्या अधिक जवळ जात नाही, असें सांगतात. एकमेकांची आठवण ठेवून 'नमस्ते' करणें ही ह्या व्यवहारांतील पहिली पायरी आहे; आणि कोणतीहि सुसंस्कृत स्त्री साधी ओळख दाखविणाऱ्या पुरुषाचा — तसेंच कांही कारण घडलें असल्याखेरीज —

अनादर करणार नाही. अर्थात् ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की त्याच दोन व्यक्ती वेगवेगळया ठिकाणीं, वेगवेगळया समाजांत व वेगवेगळया परिस्थितींत भेटल्या, तर भिन्न भिन्न तऱ्हेने वागतील आणि अशा वागण्याबद्दल त्यांपैकी कोणीहि गैरसमज करून घेण्याचें कारण नाही. खासगी मैत्री सार्वजनिक ठिकाणीं दाखवितांना जरा संयमच पाळावा लागतो. दररोज गप्पागोष्टी करणारे स्त्री–पुरुष कांही विशिष्ट वेळेस साधी ओळखहि एकमेकांस मुद्दामच दाखविणार नाहीत. त्यांची मैत्री जास्त टिकण्यास असें वागणेंच कित्येक वेळीं पोषक असतें.

पुष्कळ वेळा अगदी थोड्या ओळखीवरहि पुरुष स्त्रियांकडून फार सहकार्याची अपेक्षा बाळगतात; आणि त्यांचें लक्ष फक्त सुंदर व आकर्षक स्त्रियांकडेच असतें! अशा स्त्रियांना अनेक पुरुषांच्या ह्या वृत्तीचा बरा–वाईट अनुभव असल्याने त्यांना स्वतःचा बचाव कसा करावयाचा हें पूर्णपणें माहीत असतें. ज्या स्त्रीस फार मागणी नाहीं अशा स्त्रीला मात्र पुरुषांची संगत हवी असली तरी ती मिळत नाही !

केवळ सौंदर्यावर व आकर्षतेवर भुलणाऱ्या पुरुषांना एखादे वेळेस समाधान मिळालें तरी अपमानाचे प्रसंगच जास्त येणार, यांत काय आश्चर्य ? तरीपण अपमान सोसूनहि कांही वेळा तरी हवें तें सुख मिळण्याच्या अपेक्षेने त्यांचे प्रयत्न चालूच राहतात. ह्या दुर्मिळ सुखाची किंमत त्यांना इतकी मोठी वाटते, की त्यासाठी ते बिचारे निराश होण्याचें टाळत असतात !

लष्करी अधिकाऱ्यांत अशी चाल आहे म्हणतात, की एखाद्याच्य पत्नीस तिच्या पतीच्या दूर ठिकाणच्या नोकरीमुळे एकटें राहावें लागलें, तर इतर अधिकारी मित्र तिला भेटावयास जातात, तिचें कुशल विचारतात, तिचें एकाकी जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करतात. ह्या प्रथेमागील हेतु फार चांगला आहे ह्यांत शंका नाही; पण त्यांतील तारतम्याचा भाग बहुतेक जण विसरतात आणि अशा स्त्रिया हुडकून

काढण्याच्या खटपटींत त्यांच्याकडून कधीकधी अतिरेक होतो! बिचाऱ्या पत्नीला अधिकारी मित्रांना दुखवितांहि येत नाही व संतुष्टहि करतां येत नाही! परपुरुष हे मित्र नसले तरी चालतील, पण ते शत्रु मात्र होतां कामा नयेत, ही मिश्र समाजांत वावरणाऱ्या स्त्रियांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. साहजिकच तिला मोठ्या सावधगिरीने वागावें लागतें. पतीच्या लहान-मोठ्या अधिकारी मित्रांना योग्य त्या अंतरावर ठेवावें लागतें व स्वतःचा दर्जाहि संभाळावा लागतो. ह्या मित्रांना मात्र तिच्या बिकट परिस्थितीची जाणीव नसते. अशी स्त्री व्यवहारचतुर नसेल तर कोणत्यातरी एका दृष्टीने तिला अपयश आल्याविना राहणार नाही.

स्त्रियांचे डोळे हें त्यांचें फार मोठें प्रभावी हत्यार आहे. एखाद्या पुरुषास चारचौघांत थोबाडींत मारून त्यावर जो परिणाम होणार नाही, तो साध्या नजरेच्या द्वारां त्या घडवून आणूं शकतात. 'खबरदार' असें त्यांना ओरडून सांगावें लागतच नाही. पण कित्येक पुरुषांना ही भाषा समजतच नाही; ती समजून घेण्याचें त्यांना मुद्दाम टाळावयाचें असतें. तेव्हा स्त्रियांना त्यापेक्षाहि तीक्ष्ण हत्यार वापरावें लागतें, आणि पुरुषांना वाजवी परिस्थितीची जाणीव करून द्यावी लागते.

मित्र-मैत्रिणींचे संबंध सलोख्याचे कसे ठेवतां येतील आणि पति-पत्नीचें नातें लक्षांत घेऊन सगळ्यांना योग्य तो वाव कसा मिळेल हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. परस्त्री आणि परपुरुष ह्यांच्याशीं मैत्री करूं इच्छिणारांनी आपल्याकडील सामाजिक परिस्थितींत अशा संबंधास किती मर्यादित वाव आहे हें प्रथम समजून घेतलें पाहिजे. नातेवाईक, शेजारी-पाजारी ह्यांच्याकडे आपणास दुर्लक्ष करून भागणार नाही. ज्या गावांत किंवा चाळींत आपण राहतों, तेथील लोकांच्या रूढ कल्पनांच्यापेक्षा फार जास्त मजल त्यांच्यादेखत आपण गाठूं शकत नाही. ज्या समाजांत राहावयाचें, ज्यांत नांव मिळवावयाचें,

त्या समाजाला आवडणाऱ्या गोष्टीच साधारणतः केल्या पाहिजेत; निदान त्याच्या तीव्र नावडीच्या गोष्टी शक्यतों टाळल्या पाहिजेत हें अगदी उघड आहे. तेव्हा, स्त्री-पुरुष मैत्री वाढविण्यास व टिकविण्यास आजूबाजूची परिस्थिति प्रतिकूल असेल तर तो नाद सोडून दिलेला बरा. कोणालाहि तो संतोषकारक होणार नाही.

एखाद्यानें आपल्या मोटारींतून त्याच्या मित्राच्या पत्नीस दोन–चार वेळा आणलें किंवा नेलें की आजूबाजूचे लोक कुजबुजूं लागतात; कुचेष्टा करूं लागतात. 'आम्हांला त्यांच्याशीं काय करायचं आहे?' असें म्हणून तिकडे दुर्लक्ष करण्याचा मोह होणें स्वाभाविक आहे; पण प्रसंगानुरूप तो टाळला पाहिजे. आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचें आपल्या-बद्दल विनाकारण वाईट मत न होऊं देणें हें मिश्र समाजांत वावरणारांनी प्रथम जपलें पाहिजे.

कांही पुरुष त्यांच्या मित्रांच्या पत्नीबरोबर स्वैरपणें वागतात, त्यांच्याबरोबर सिनेमा–नाटकांचे आणि रमीचे कार्यक्रम करतात, त्यांनी आधुनिक जगांत कसें वागावें याचे पुरोगामी धडे त्यांना देतात, पण हे पुरोगामी मित्र स्वतःच्या पत्नीला मात्र कोठेच बरोबर नेत नाहीत! तिला टाळूनच आपली प्रगतिप्रियता ते इतरांना दाखवीत असतात. दुसऱ्याकडे चहाला जाऊन "वहिनी आंत काय करताहेत?" असें म्हणून त्यांना ते बाहेर यावयास लावतील; त्यांच्या खुर्चीशीं खुर्ची भिडवून गप्पा मारतील. पण स्वतःच्या घरीं मित्र आले म्हणजे मात्र आपल्या पत्नीचें दर्शनहि त्यांना घडूं देणार नाहीत; "तिचं चाललं असेल कांहीतरी स्वैपाकघरांत!" असें म्हणून तिच्या कामाची चेष्टाच करतील! स्वतःच्या मुलांना शिकविण्यासाठी येणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षकाशीं तो परत जातेवेळा पत्नी दोन शब्द बोलली तर पतीला सहन होत नाही, असें घडलेलें मीं पाहिलें आहे.

ह्या सर्व गोष्टी काल्पनिक किंवा अतिरंजित नाहीत, एवढेंच येथे

सांगून ठेवतों. मिश्र समाजांतील आपलें वर्तन आपल्या पत्नीपासून किंवा पतीपासून लपवून ठेवूं पाहणाऱ्या लोकांना इतरांनी त्यांच्या अयोग्य वर्तनाची जाणीव करून दिली नाही, तर ह्या लोकांचें जास्तच फावतें. कमी–अधिक प्रमाणांत अशा पद्धतीने वागणारे पुरुष आपल्या कल्पनेपेक्षा पुष्कळच जास्त आहेत.

जीवन हें स्पर्धामय आहे आणि त्या स्पर्धेत टिकाव धरण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. पतीने पत्नीच्या किंवा पत्नीने पतीच्या सौजन्यावर सदैव अवलंबून राहून भागणार नाही. आपल्या पतीचें लक्ष दुसऱ्या स्त्रियांकडे फार जाऊं नये ह्यासाठी स्त्रियांनी विचारपूर्वक योजना केली पाहिजे; पुरुषांनीहि तसेंच वागलें पाहिजे. पण चुकतें कोठे? तर, आपण एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं फार गुणांच्या समुच्चयाची अपेक्षा करतों. पत्नीने 'अ' सारखें सुंदर असलें पाहिजे, 'ब' सारखें मोहक दिसलें पाहिजे, 'क' सारखें खेळांत तिचें प्रावण्य हवें, 'ड' सारखें तिने फॅशनेबल बनलें पाहिजे आणि ह्या सर्वांबरोबर तिला अपत्यें कमी झालीं पाहिजेत, तिने नोकरी करून पैसे मिळवावेत, स्वैपाकहि चांगला करावा, माहेरीं कधी जाऊं नये. नवऱ्याच्या ह्या सर्व अपेक्षा प्रत्यक्षांत उतरणें शक्य आहे काय? त्याचप्रमाणे, कोणताहि पुरुष श्रीमंत, विद्वान्, खेळाडू, दिलदार, रुबाबदार, निर्व्यसनी, प्रेमळ, कौतुक करणारा, बिनटकलाचा, असा एकाच वेळीं असूं शकेल काय? शक्य नाही.

अशा परिस्थितींत पतीने किंवा पत्नीने पत्नीस किंवा पतीस आपलेसें कसें करावें? त्यांनी घरांतच अधिक रमावें ह्यासाठी काय योजना करावी? एकमेकांना नांवें ठेवण्याचें अगोदर बंद करावें व स्वतःमध्ये काय बदल घडवून आणतां येईल ह्याकडे प्रथम लक्ष द्यावें. मला वाटतें, प्रत्येकाने निदान एक–दोन गुण तरी प्रकर्षाने वाढीस लावावे व त्यांत आजूबाजूच्या लोकांच्या मानाने तरी असामान्यत्व मिळवावें. पति खूप

श्रीमंत असला तर तो काळा, खुजा चालतो. तो विद्वान् असला, तर त्याचा दरिद्रीपणा सुसह्य होतो. तो देखणा असेल, तर त्याचे कपडे फाटके असले तरी चालतात.

ह्याच्या उलट, पत्नीची इस्टेट मोठी असली तर ती तोंडाळ असली तरी चालते; ती सुंदर व आकर्षक असली तर तिला स्वैपाक करतां येत नाहीं ह्याचेंहि कौतुकच होतें ! तिला गाण्यासाठी किंवा वादनासाठी रेडिओवर बोलवणीं येऊं लागलीं म्हणजे तिच्या आळसाकडे पति दुर्लक्ष करतो; ती प्रेमळ असली म्हणजे खर्चिक असली तरी चालते. ती सुग्रण असेल तर तिच्या स्वरूपाचा अभाव पतीला फारसा जाणवत नाही. " केवळ आमटीवर मीं माझ्या यजमानांना ताब्यांत ठेवलं आहे " असें कमलाबाई अभिमानाने सांगत असतात ! प्रत्येक पतीने व पत्नीने इतरांपेक्षा कांही बाबतींत तरी आपण श्रेष्ठ आहों हें सिद्ध केलें म्हणजे पति-पत्नीचे संबंध दृढ होण्यास मदत होईल.

ह्याच संबंधांत आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. पतीचें लक्ष इतर स्त्रियांकडे जाऊं लागलें म्हणजे पत्नीला तें साहजिकच रुचत नाहीं आणि तिची धुसपुस सुरू होते. त्यासाठी वर सांगितलेला महत्त्वाचा उपाय चालू ठेवून त्याबरोबर आणखीहि कांही उपाय करीत राहिलें पाहिजे. विवाहापूर्वी बहुतेक मुली स्वतःच्या रूपाबद्दल जेवढी काळजी घेतात, तेवढी काळजी त्या विवाहोत्तर घेत नाहीत; त्याची आवश्यकता उरली नाहीं ह्या समजुतीने त्या आळस करतात. दोन-तीन मुलें झाल्यानंतर तर त्यांचें लक्ष स्वतःच्या नीटनेटकेपणाकडे मुळीच उरत नाही. नवरा कामाला जातांना त्या त्याला कोळशाने काळ्या झालेल्या हातानेच त्याचा फराळाचा डबा देतील आणि नवरा परत येण्याच्या वेळीं त्यांची वेणी सुटलेली असेल आणि तोंडहि धुतलेलें नसेल. दुर्गंधि साठण्याच्या ठिकाणीं नेहमी हात चालवून सहवास सुखकारक करण्याचें महत्त्व कांही स्त्रियांच्या अजूनहि लक्षांत येत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

पति घरांत असला म्हणजे पत्नीने जरा बऱ्यापैकी पातळ नेसण्यास काय हरकत आहे ? आणि पतीनेहि सुट्टीच्या दिवशीं दाढी करण्याचा आळस कां करावा ? पुरुष घराबाहेर ज्या स्त्रियांना भेटतो, त्या त्याच्या स्वतःच्या पत्नीपेक्षा अधिक चांगला पोषाख केलेल्याच असतात. ह्याचा व्हावयाचा तोच परिणाम होतो. म्हणून स्त्रियांनी आपल्या ऐपतीप्रमाणे घरींसुद्धा स्वच्छता व आकर्षकता ह्यांस महत्त्व दिलें पाहिजे. "आता पति दुसरा विवाह करूं शकत नाही; तेव्हा त्याच्यासाठी आकर्षक बनण्याचा प्रयत्न करून काय मिळवावयाचें आहे ?" ही त्यांची विचारसरणी चुकीची आहे. पतीच्या आवडीनिवडी लक्षांत बाळगून रोजच्या जीवनांत गोडी आणणें स्त्रियांना सहजसाध्य आहे. पण तिकडे लक्ष दिलें पाहिजे ना !

पति कामाला जातेवेळीं, तो येण्याच्या वेळीं आणि त्याच्या विश्रांतीच्या वेळीं वादग्रस्त प्रश्न टाळणें, कटकटी न सांगणें, मुलांना रडूं न देणें, घरांत शांतता राखणें, चेहरा प्रसन्न ठेवणें, इत्यादि गोष्टी करण्याची आवश्यकता सुशिक्षित स्त्रियांनाहि स्पष्ट करून सांगण्याची पाळी वास्तविक येऊं नये. नवरा दमूनभागून घरीं येतो तेव्हा त्याच्या स्वागतासाठी त्याची पत्नी सस्मित उभी राहिली, त्याच्या हातांतील कागदपत्रें, छत्री, टोपी, वगैरे ठेवण्यास मदत केली, त्याच्या जरूरीप्रमाणे पिण्याचें पाणी आणि चहाची सिद्धता ठेवली, दिवसभरांत झालेल्या एखाद्या चांगल्या प्रसंगाची माहिती त्याला सांगितली, एखादा जिन्नस आणण्यास तो विसरला तर त्याबद्दल दोष दिला नाही, शेजाऱ्याबद्दल तक्रार करण्याची घाई केली नाही, वर्तमानपत्रें जाग्यावर ठेवलीं, आलेलीं पत्रें तत्परतेने दिलीं, तर पति कचेरींतून तडक घरींच येईल; परस्पर दुसरीकडे जाणारच नाही.

पुरुषानेहि पत्नीच्या आस्थेचें कौतुक केलें पाहिजे व पत्नीच्या दैनंदिन कार्यक्रमाकडे लक्ष देऊन तिच्या काटकसरीची, चांगल्या

अनुक्र. 29130 दि. ...
वर्गीकरण ... 9043 ... नों. दि. ... 30

स्वैपाकाची, बोलण्यांतील चातुर्याची, मुलांच्या जोपासनेची, दखल घेतली पाहिजे. एकमेकांच्या चांगल्या गोष्टींची कितीहि वेळा गोड शब्दांनी प्रशंसा केली तरी त्याचा वीट येत नाही. पण तें न करतां कटु प्रसंगावर भर देण्याची वृत्ति सामान्यतः आढळते. स्तुतीचा, गौरवाचा, एकहि प्रसंग सहसा टळूं देऊं नये. पति-पत्नींचें एकमेकांवर केवळ प्रेम असून भागत नाही; तें एकसारखें दाखवावें लागतें!

स्त्रिया मुलाबाळांची काळजी घेतात; परंतु पतीच्या किरकोळ गरजां-कडे व आवडीनिवडींकडे त्यामानाने दुर्लक्ष करतात, अशीं पुष्कळ उदाहरणें आढळतील. सून, आई, भावजय, ह्या नात्यांच्या मानाने पति-पत्नीच्या नात्यास त्या फार कमी महत्त्व देतात. मिश्र सामाजिक जीवनांत हें चालणार नाही.

कांही पुरुष स्त्रियांना मिश्र समाजांत नेण्याचें टाळतात हें खरें असलें तरी ह्या प्रश्नास दुसरीहि एक बाजू आहे. पतीचा दर्जा किंवा व्यवसाय प्रगत होत जातो आणि त्यामुळे त्याला मिश्र समाजांत वावरण्याची संधि मिळते किंवा पाळी येते. अशा वेळीं पंधरा वर्षांपूर्वीच्या मथूचें मथूकाकूंत रूपांतर झालेलें असतें आणि तिच्याबद्दल पतीला कितीहि प्रेम वाटलें तरी तिला मिश्र समाजांत नेण्यास तो धजत नाही. तिला कधीकाळीं नेलें, तर तिचें हसें होईल, अशी त्याला भीति वाटत असते. वास्तविक त्याने आपल्या पत्नीसहि हळूहळू नव्या राहणीचे धडे वेळोवेळीं दिले असते, तर तीहि त्याच्याइतपत तरी मिश्र समाजांत वावरूं शकली असती.

स्त्रियाहि आपण होऊन शिकण्याचे कष्ट घेत नाहीत, हेंहि खरें आहे. त्यामुळेच विविध क्षेत्रांत पुढे आलेल्या कांही नामवंत हिंदी लोकांच्या पत्नीचें अस्तित्वहि इतरांना माहीत नसतें. मोठमोठ्या प्रसंगीं त्या उपस्थित झाल्या तर तें धाडसच ठरतें. आपल्या कांही रूढीहि अशा उपद्व्यापास पोषक होत नाहीत.

पति-पत्नीच्या नात्यांत इतर मंडळींच्या मैत्रीमुळे व्यत्यय येतां कामा नये; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या सौख्यांत भरच पडली पाहिजे. तरच मिश्र सामाजिक जीवन टिकाऊ व बहारदार होईल. परस्त्रियांना खूष करावयाचें व स्वतःच्या पत्नीकडे दुर्लक्ष करावयाचें हें समर्थनीय नाही. मैत्रिणी करणें, त्यांचा स्नेह वाढविणें, ह्या गोष्टी सुसाध्य नाहीत. तो अत्यंत अवघड असा तारेवरचा नाच आहे. स्त्रीस्वभावाची चांगली ओळख पटली तरी प्रत्येक स्त्रीचा स्वभाव वेगवेगळा असतोच आणि त्यामुळे चुका होण्याचा संभव असतो. कारण, प्रत्येक वेळेस तारतम्य राहूं शकत नाही. एकजण जरी सावध असला तरी तेवढ्याने भागत नाही. दुसऱ्याच्या अवधानाचाहि विचार करावा लागतो. नाहीतर घोटाळा निर्माण होण्याची पाळी येते!

ह्या बाबतींत पाळावयाचीं पथ्यें फार कडक आहेत आणि घ्यावयाची दक्षता अमर्याद् आहे. तथापि स्थूल मानाने असें म्हणतां येईल, की अकृत्रिम रीतीने वागावें; कोणताहि 'मोका' साधण्याचा प्रयत्न करूं नये; मुद्दाम उठावदारपणा आणण्याचा मोह टाळावा. काय बोलावयाचें तें चारचौघांत उघड बोलावें. मिश्रसमाजांत जातांना एकटें जाऊं नये; पतीला किंवा पत्नीला त्यांच्यापैकी कोणाच्याहि गैरहजेरींत स्वतंत्रपणें खूष करण्याचा प्रयत्न करूं नये.

थोडक्यांत म्हणजे मनावर डोक्याचा ताबा कायम राखा; पाय जमिनीवर रोखून ठेवूनच तोल गेल्यासारखा फार तर कधीकधी गमतीने दाखवा! लोणावळ्याजवळील वाघदरीची शोभा पाहावयाची म्हणजे काठापर्यंत तर जावें लागतें; पण पाय मात्र स्थिर ठेवावे लागतात. नाहीतर कडेलोट होण्याचा संभव असतो! मिश्र जीवनांतहि काठापर्यंत जाऊं पाहणारांनी प्रथम आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा सल्ला घ्यावा आणि नंतरच आपलें स्थान ढळूं न देतां जितक्या पुढे जातां येईल तेवढें अवश्य जावें!

वैयक्तिक व सामाजिक अशा मर्यादा सांभाळल्या, तरच मिश्र जीवनाचा खरा स्वाद मिळूं शकेल. तें ज्याला साधणार नाही त्याने त्या बाजूस वळूंच नये हें उत्तम. फारच थोड्या लोकांना मिळणाऱ्या ह्या सामाजिक यशामागील विचारांचा व आचारांचा मजबूत पाया इतरांना माहीतहि नसतो ! ते बिचारे भलत्या वेळीं भलतीकडे धडकतात व पस्तावा पावतात. इतरांना दोष देत व त्यांचा हेवा करीत बसण्यापलीकडे त्यांना मग दुसरें कांहीच उरत नाही.

मिश्र समाजांत नाइलाजाने कमींत कमी किती व कसें मिसळावयाचें हा खरा प्रश्न नसून सहजतेने त्यांत कसें वावरतां येईल हा आहे. सर्वच पुरुष स्त्रियांनी टाळण्याजोगे असतात असें म्हणणें मूर्खपणाचें होईल. कांही थोडे पुरुष मर्यादेबाहेर जाऊं पाहतात आणि क्वचित् प्रसंगीं एखादी स्त्रीहि त्यांचें अनुकरण करूं पाहते; परंतु तें अपरिहार्य आहे हें ओळखून स्त्री-पुरुषांनी साध्या बोलण्या-चालण्यांतील स्नेह वृद्धिंगत केला पाहिजे. स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्याहि एखाद्या कटु अनुभवावरून मिश्र जीवनास सरसकट नांवें ठेवणें बरें नव्हे. मामुली शिष्टाचार पाळल्याने कोणत्याहि सभ्य स्त्रीचें किंवा पुरुषाचें सहसा नुकसान होणार नाही. हे शिष्टाचार परिस्थितीस अनुसरून बदलतील किंवा वेगळे राहतील हें मात्र उघड आहे; आणि एका ठिकाणचा किंवा एका व्यक्तीबाबतचा नियम जसाच्या तसा दुसरीकडे लागेलच असें सांगतां येणार नाही.

—किर्लोस्कर

१०००५
REFBK-0010904